Reg. No. MCS/069/2018-20 R. N. I. Reg. No. 1591/57
वर्ष ७८, अंक ११९, ५ रुपये, शहर आवृत्ती, वृत्तान्तसह पृष्ठे १२

मुंबई, मंगळवार, ३ जून २०२५ WWW.LOKSATTA.COM

# लोकसत्ता

मुंबई, पुणे, नागपूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकमान्य, लोकशक्ती !

**अग्रलेख**

## कोणासाठी? कशासाठी?

आपण पाकिस्तानला धडा शिकवलेला आहे. मग या संघर्षात पाकिस्तानने आपले काही नुकसान केले असेल तरी ते मान्य केले तर इतका गदारोळ का?

**आतील पान**

**‘एमएचटी सीईटी’ फेरपरीक्षेतही गोंधळ**



46 YEARS OF EXCELLENCE

SRAMAYEVA JAYATHE
NARAYANA®
EDUCATIONAL INSTITUTIONS

# Narayana Champions
JEE-ADV. 2025

Open Cat. Ranks in Top 10 Classroom Programme **3**

Open Cat. Ranks in Top 100 Classroom Programme **21**

Parth Mandar Vartak
HT. No: 251110752
AIR 4
Classroom Student

Sahil Deo
HT. No: 251113172
AIR 7
Classroom Student

Vadlamudi Lokesh
HT. No: 256061276
AIR 10
Classroom Student



## All India Open Category Ranks in Top 100

| AIR | Name | No. | Programme |
|---|---|---|---|
| 3 | MAJID HUSSAIN | HT. No: 251134112 | (SIP) |
| 6 | AKSHAT CHAURASIA | Roll No. : 254065055 | (nPrep) |
| 17 | AAGAM JIGNESH SHAH | Roll No. : 251028008 | Classroom Student |
| 20 | ANIRUDH REDDY | Roll No. : 256132039 | Classroom Student |
| 21 | BHARAT CHANDRA | Roll No. : 256135120 | Classroom Student |
| 22 | MOHAN SATVIK | Roll No. : 252067014 | (nPrep) |
| 23 | AKSH GOGI | Roll No. : 252071075 | (nPrep) |
| 27 | SAMUDRA SARKAR | Roll No. : 252071105 | (nPrep) |
| 29 | PIUSA DAS | Roll No. : 257018096 | Classroom Student |
| 30 | OM PRAKASH BEHERA | Roll No. : 252021018 | (nPrep) |
| 31 | SANIDHYA SARAF | Roll No. : 251110106 | Classroom Student |
| 34 | DHRUBA JYOTI PANJA | Roll No. : 252048248 | (nPrep) |
| 37 | KARMANYA GUPTA | Roll No. : 252081477 | (nPrep) |
| 38 | ARNAV JINDAL | Roll No. : 257022050 | Classroom Student |
| 40 | GURURATNA UPADHYAY | Roll No. : 251108011 | Classroom Student |
| 43 | MANN HITESHKUMAR P | Roll No. : 251014049 | Classroom Student |
| 44 | VISHAD JAIN | Roll No. : 251108005 | Classroom Student |
| 46 | BHAVYA JETHANANDANI | Roll No. : 252065092 | Classroom Student |
| 49 | KUSHAGRA GUPTA | Roll No. : 251049046 | Classroom Student |
| 50 | ARITRO ROY | Roll No. : 255067325 | (nPrep) |
| 51 | BHANU CHARAN REDDY | Roll No. : 256050132 | Classroom Student |
| 52 | MOULIK JAIN | Roll No. : 252079407 | (nPrep) |
| 53 | ISHAN KUMAR | Roll No. : 256131118 | Classroom Student |
| 54 | GARV | Roll No. : 252056188 | (nPrep) |
| 56 | LARISSA | Roll No. : 252079071 | (nPrep) |
| 57 | VASU VIJAY | Roll No. : 252081242 | (nPrep) |
| 58 | SHIVEN | Roll No. : 251004388 | (nPrep) |
| 63 | SAMAYJYOTI BISWAS | Roll No. : 255058456 | (nPrep) |
| 64 | AARUSH ANAND | Roll No. : 251006176 | (nPrep) |
| 73 | BHAVISHYA MOTWANI | Roll No. : 251137318 | (nPrep) |
| 76 | CHERYL SINGLA | Roll No. : 257017394 | Classroom Student |
| 77 | BANI BRATA | Roll No. : 256147235 | Classroom Student |
| 80 | DIVYANT | Roll No. : 256096160 | (nPrep) |
| 82 | BHARADHWAJ | Roll No. : 256055222 | Classroom Student |
| 83 | HARSH | Roll No. : 252008090 | (nPrep) |
| 85 | YASH MESHIYA | Roll No. : 251015116 | (nPrep) |
| 87 | LAKSHYA SHARMA | Roll No. : 252070079 | (nPrep) |
| 88 | CHAITHANYA P SHIVAM | Roll No. : 251049019 | Classroom Student |
| 91 | AVNEESH BANSAL | Roll No. : 251113130 | (nPrep) |
| 98 | J VENKATA RAGHUVEER | Roll No. : 256057033 | Classroom Student |

nPrep Narayana Digital Learning Program
SIP School Integrated Program

ADMISSIONS ARE IN PROGRESS FOR ALL COURSES 2025-26

IIT-JEE/NEET Repeaters
First Batch : 05-06-25
Second Batch : 16-06-2025

Disclaimer: Any inadvertent error published in this advertisement could be brought to our notice

## Narayana Schools & Coaching Centers in Maharashtra

SCHOOLS - • ANDHERI - Ph: 8291993855, 8169569357, 7045938728. • THANE - Ph: 8291990064, 8291994802. • BHAYANDAR - Ph: 7021435506, 8779019098. • NALASOPARA- Ph: 9022929412 / 72080 15912. • BORIVALI - Ph: 77188 98931 / 932, 86929 38720. • KALYAN WEST - Ph: 7978960948, 8655413506, 7208016526. • DOMBIVLI - Ph: 7777032699, 7208015914. • ULHASNAGAR - Ph: 82919 95136, 77770 40179. • PARBHANI Ph: 8655950429. • NASHIK - SRI SRI RAVISHANKAR MARG. - Ph: 8655950431 / 8976764067. • WAGHOLI - Ph : 8976764062, 8657002764. • AMANORA - Ph : 7208025910, 8976764055. • UNDRI - Ph : 8976764061, 8976764068. • Ch SAMBHAJINAGAR (AURANGABAD) - Ph: 8291993863, 7777041542, 7777041658. • JALNA - Ph: 8976764057, 8976764058. • BEED - Ph: 8976764065, 8976764064. • YAVATMAL - Ph: 8657010747, 7777039485. • NAGPUR - Ph: 8956358414, 7777039861 (Sch.), Ph: 9527290280, 777741260 (Coll.) • AKOLA - Ph: 8291995132, 8655844058. • HINGOLI - Ph: 8291990552, 8655844064. • SOLAPUR - Ph: 8655844065, 86570 02760. • LATUR - Ph: 8291993860, 8655844066. • NANDED-MADHAVNAGAR - Ph: 8655844067, 8657002761. • NANDED - VISHNUPURI - Ph : 8655844067, 8291993862. NASHIK - GANGAPUR ROAD - Ph : 8976764066, 8976764067. • NASHIK - RAVISHANKAR MARG - Ph : 8655950431, 8976764067. | CO CAMPUS: • Andheri West : Ph: 8073549902, 7977628185. • Nerul West : Ph: 070459 38720, 91 70216 23743. • Andheri East : Ph: 7208438717, 70216 23743.
COACHING CENTERS - CH. SAMBHAJINAGAR - Ph: 9372233937, 9860077758. • NAGPUR - Ph: 7841904285, 9522200432. • NASHIK - Ph: 9522200410/413, • PUNE- CHINCHWAD - Ph: 9522200750, 9522200122.

SCAN QR FOR ADMISSION

Toll Free: 1800 102 3344 #YourDreamsAreOurDreams www.narayanagroup.com

सभी फ्लश टैंकों में वारंटी ५ साल *T&C Terms & Conditions Apply
स्लिम टॉप बटन | स्लिम ड्वेल फ्लश फ्रंट हैंडल | चैंपियन फ्रंट हैंडल | सुल्तान फ्रंट हैंडल | फ्लश फ्लो फ्रंट हैंडल
www.commanderwatertech.com कमांडर स्वच्छता बढाओ, तंदुरुस्ती बढे

# सुट्टीत गट्टी

## झेंड्यांचे फंडे — अवघड आहे बुवा!

आपल्या राष्ट्रध्वजाचे चित्र काढणे तसे सोपे आहे. त्यातल्या त्यात कठीण म्हणजे केवळ अशोकचक्रच... पण झेंड्यामध्ये एखादा प्राणी असला, तर तो काढण्यासाठी कसलेला चित्रकारच हवा, नाही का? आपले दोन शेजारी, श्रीलंका आणि भूतान यांच्या राष्ट्रध्वजांमध्ये अनुक्रमे सिंह आणि सोनेरी ड्रॅगन विराजमान झाले आहेत. असाच लाल ड्रॅगन वेल्सच्या झेंड्यात आहे. मेक्सिकोच्या झेंड्यात एका डोक्याचा आणि अल्बानियाच्या झेंड्यात दोन तोंडांचा गरुड आहे. सर्बियाच्या राष्ट्रध्वजातही दोन तोंडांचा, मात्र थोडा कार्टूनसारखा दिसणारा गरुड आहे. युगांडा आणि निकारगुआच्या राष्ट्रध्वजांमध्येही पक्षी विराजमान झालेले दिसतात. (संकलन-आर्या परांजपे, इयत्ता ६ वी)


श्रीलंका


भूतान

## कार्टून लाईफ

**श्रीबा** shriba29 @gmail. com

### जेरी

संपूर्ण जग उंदीर मारण्याचे औषध आणि पिंजरे बनवत असताना एका उंदराने जगाला स्वत:च्या प्रेमात पाडले. इतके की घाबरटदेखील त्यांचे पोस्टर, स्टिकर आपल्या कपड्यांवर लावतात. तो म्हणजे आपला जेरी.

जेरी या पात्राची निर्मिती विल्यम हॅना आणि जोसेफ बार्बरा यांनी केली आहे. जेरी पहिल्यांदा 'जिंक्स' नावाच्या उंदराच्या रूपात १९४०च्या 'पस गेट्स द बूट' या एमजीएम ॲनिमेटेड शॉर्टमध्ये दिसला होता. तो एक लहान, चलाख आणि अतिशय हुशार उंदीर आहे. दिसायला जरी छोटा असला तरी त्याच्या बुद्धीच्या जोरावर नेहमीच त्याच्या कट्टर शत्रू टॉम कॅटला आणि मालकिणीला भारी पडतो. असे आपण नेहमीच पाहत आलो. खरे तर त्याच्या जिवंत राहण्याच्या मार्गात येणाऱ्या अडचणीतून सहज किंवा कधी कधी इतर प्राण्यांच्या मदतीने मार्ग काढत असतो. आयुष्यातील अडचणी जेव्हा थेट जगण्याशी संबंधित असतात तेव्हा आपल्यापेक्षा मोठ्या आणि ताकदवान असलेल्या कुणालाही नडता येते, हा विश्वास तो आपल्याला देतो. जेरीच्या कारवाया केवळ स्वत:चा बचाव करणाऱ्या प्रतिक्रिया नसतात तर सूड घेण्याची, उगाच कळ काढण्याची मानवी वृत्तीही दिसून येते. जेरीचे घर म्हणजे भिंतीतल्या फटीतले इवलेसे बीळ. ते त्याने घरच्याच ढापलेल्या वस्तूंनी मस्त सजवले आहे. एकटाच राहतोय तर गचाळ राहा असा आळशीपणा तो करत नाही. आजूबाजूच्या कुठल्याही वस्तू वापरून जेरी स्वत:चा बचाव करत असतो. सापळे रचतो. यावरून तो मुळातच क्रिएटिव्ह असण्याचा पुरावा मिळतो. तो इतका बंडखोर आणि मनस्वी आहे की कधी कधी तो मोठ्या अडचणीतून टॉमला वाचवतो. मांजर उंदराला खेळवते त्या आजवरच्या कल्पनेला छेद देत उंदीर मांजराला खेळवतो. ही गंमत पाहायला आपल्याला आवडते, हे जेरीलादेखील माहीत असावे.



## शब्दखेळ

ज्योत्स्ना सुतवणी
jyotsna.sutavani@gmail.com

सूचक माहितीवरून चौकटीतील शब्दांच्या जोड्या ओळखायच्या आहेत. प्रत्येक जोडीतील शब्दांमध्ये फक्त एका कान्याचा फरक आहे. (उदाहरणार्थ समज व समाज)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | प्रात:काल | एकूणएक | २) | लबाडी | फडताळ |
| | | | | | |
| ३) | पोट | दानशूर | ४) | पंकज, मुलीचे नाव | जास्तीत जास्त |
| | | | | | |
| ५) | मेघाच्छादित | सैल | ६) | पीठ मळण्यासाठीचे पसरट भांडे | पुन्हा |
| | | | | | |

**उत्तर**
१) सकाळ / सकल ४) कमल / कमाल
२) कपट / कपाट ५) ढगाळ / ढगळ
३) उदर / उदार ६) परात / परत

# 'जेईई ॲडव्हान्स'चा निकाल जाहीर

## मुंबईतील तीन जण पहिल्या १० मध्ये

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** आयआयटीमध्ये प्रवेशासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या जेईई ॲडव्हान्स २०२५ परीक्षेचा निकाल सोमवारी जाहीर करण्यात आला. या परीक्षेत मुलांमधून रजित गुप्ता, तर मुलींमधून देवदत्त माझी प्रथम आले आहेत. जेईईच्या निकालमध्ये पहिल्या १० जणांमध्ये पार्थ वर्तक आणि साहिल देव या मुंबईतील दोन विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

यंदाच्या जेईईचे आयोजन आयआयटी कानपूरने केले होते. जेईई ॲडव्हान्स २०२५ चा निकाल सोमवारी सकाळी जाहीर झाला. या परीक्षेत आयआयटी दिल्ली झोनमधून परीक्षा दिलेला रजित गुप्ता हा ३६० पैकी ३३२ गुण मिळवून कॉमन रँक लिस्टमध्ये (सीआरएल) अव्वल आला. त्याचवेळी आयआयटी दिल्ली झोनमधील सक्षम जिंदाल हा ३३२ गुण मिळवून सीआरएलमध्ये दुसऱ्या स्थानावर आहे. आयआयटी खरगपूर झोनमधून परीक्षा दिलेली देवदत्त माझी ही ३६० पैकी ३१२ गुण मिळवून महिलांमध्ये अव्वल आली आहे. मात्र ती कॉमन रँक लिस्टमध्ये १६ व्या क्रमांकावर आहे.

सीआरएलमध्ये आयआयटी मुंबई झोनमधून परीक्षा दिलेला


रजित गुप्ता


देवदत्त माझी

माजिद हुसेन याने ३३० गुण मिळवत तिसरा क्रमांक पटकावला आहे. त्याचप्रमाणे या परीक्षेमध्ये पहिल्या १० जणांमध्ये मुंबईतून पार्थ वर्तक आणि साहिल देव यांनी बाजी मारली आहे. पार्थ वर्तक याने ३६० पैकी ३२७ गुण मिळवून चौथा क्रमांक पटकावला, तर साहिल देव याने ३६० पैकी ३२१ गुण मिळवून सातवा क्रमांक पटकावला आहे. या दोघांनीही आयआयटी मुंबई झोनमधून परीक्षा दिली होती.

आयआयटी कानपूरने १८ मे रोजी घेतलेल्या जेईई अडव्हान्स २०२५ परीक्षेच्या पेपर १ व २ साठी देशभरातून १ लाख ८७ हजार २२३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यातील १ लाख ८० हजार ४२२ विद्यार्थी परीक्षेला उपस्थित होते. यामध्ये १ लाख ३९ हजार ८५ मुले तर ४१ हजार ३३७ मुलींचा समावेश आहे. परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांपैकी ५४ हजार ३७८ विद्यार्थी पात्र ठरले. यामध्ये ९ हजार ४०४ मुली आहेत.

बँकिंग साक्षरता | १०८
दुसऱ्या बँकेने मागणी केल्यास खात्यासंबंधीची माहिती २१ दिवसात देणे बँकांवर बंधनकारक.
MSC BANK SCHEDULED BANK
संकल्पना व लेखन विद्याधर अनास्कर मुख्य विश्वस्त बँकिंग साक्षरता प्रतिष्ठान

# अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेला मुदतवाढ

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांना नाव नोंदवण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली असून आता ५ जून रोजी दुपारी २ वाजेपर्यंत नोंदणी करता येणार आहे. संस्थात्मक कोट्यातील जागा भरण्यासाठी आवश्यक बदल करण्याचे आदेश शासनाने दिल्याने मुदतवाढ देण्यात आली आहे.

अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये महाविद्यालयातील संस्थात्मक कोट्यातील जागा भरण्यासाठी आवश्यक बदलाबाबत शासनाने काढलेल्या पत्रानुसार आदेश दिले. या बदलाच्या अनुषंगाने संकेतस्थळावर कनिष्ठ महाविद्यालयांच्या संस्थांच्या शाळांचा बदल करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयाने केलेल्या बदलाच्या अनुषंगाने इन-हाऊस कोटामधील पसंतीक्रम आवश्यकतेनुसार बदल करण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयांना तसेच पालक, विद्यार्थी यांना पुरेसा वेळ मिळावा यासाठी विद्यार्थी नोंदणीसाठीची मुदत ३ जूनऐवजी ५ जून रोजी दुपारी २ पर्यंत करण्यात आली आहे.

## दिनदर्शिका

**मंगळवार, ३ जून २०२५**
भारतीय सौर १३ ज्येष्ठ शके १९४७
मिती ज्येष्ठ शुक्लपक्ष
अष्टमी २१ : ५७ पर्यंत.
नक्षत्र : पुर्वाफाल्गुनी २४ : ५९ पर्यंत.
चंद्र : सिंह
सूर्योदय : ०६ : ०२, सूर्यास्त : १९ : १२

- **मेष :** शुभ दिवस.
- **वृषभ :** सामाजिक क्षेत्रात संधी.
- **मिथुन :** ध्यानधारणेत मन रमेल.
- **कर्क :** स्थान मजबूत होईल.
- **सिंह :** प्रतिभा उंचावेल.
- **कन्या :** नियमांचे पालन करा.
- **तूळ :** विकास घडेल.
- **वृश्चिक :** कामाचा अंदाज येईल.
- **धनू :** हक्काचे यश मिळेल.
- **मकर :** काटकसर करा.
- **कुंभ :** भागीदारीत यश मिळेल.
- **मीन :** संयम ठेवा.

**शुभ राशी : तूळ , धनु**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
प्रस्तुत

लोकसत्ता मार्ग यशाचा ४८

तुमच्या उज्ज्वल भवितव्यासाठी गुंतवणूक करा, तुमचा व्यवहार वाढवा आणि तुमची व्यावसायिक स्वप्ने सहज साध्य करा.
व्यावसायिक कर्ज 9.25%* द.सा. पासून
डॉक्टर | वकील | अभियंता
टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
*अटी व शर्ती लागू
www.tjsbbank.co.in | Toll Free : 1800 266 3466 / 1800 103 466

# सायबर योद्धे

१. **गेल्या** काही महिन्यांत, सायबर गुन्हेगारांनी घातलेल्या धुमाकुळीच्या चर्चा, वेगवेगळ्या माध्यमातून केल्या जात आहेत. (पहलगाम घटनेनंतर १० लाखाच्या आसपास सायबर गुन्हेगारीच्या घटना घडल्याचे निदर्शनासे आले.) सायबर गुन्हेगारांपासून सावध आणि दक्ष राहण्याच्या सूचनेचा, मौखिक आणि मुद्रित संदेश, आपल्या स्मार्ट फोनवर सतत येतच असतो. यावरुनही सायबर गुन्ह्यांचे जाळे आपल्याभोवती कधीही पडू शकते, ही बाब स्पष्ट व्हावी. बँकिंग व्यवहारात, डिजिटल देवाणघेवाण वाढल्यापासून किंवा या व्यवहारांना अधिकाधिक प्रोत्साहन देणे सुरू झाल्यापासून, सायबर गुन्हेगारांची बुद्धिमत्ता आणखीनच तेजाळल्याचे दिसून येते.

सायबर गुन्हेबार, डिजिटल व्यवहारातील, आपल्या सूक्ष्म चूक किंवा त्रुटीकडे बारकाईने लक्ष ठेवतात. त्यामुळे सायबर गुन्ह्यांच्या घटनांमध्ये, भारतासह जगात मोठी वाढ झालेली दिसते. सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्नही केले जात आहेत. त्यासाठी उच्चप्रशिक्षित, सायबर सुरक्षा मनुष्यबळाची गरजही मोठ्या प्रमाणावर वाढलीय. त्यामुळे या क्षेत्रात करिअरच्या चांगल्या संधी मिळू शकतात, ही बाब ध्यानात घेऊन, या क्षेत्राशी निगडित, उच्च तांत्रिक शिक्षण घेण्याचा पर्याय विद्यार्थ्यांनी निवडायला हवा. डाटा सिक्युरिटी काउंसिल ऑफ इंडिया (डीएससीआय) या संस्थेच्या निरीक्षणानुसार, पुढील एकदोन वर्षातच भारताला ६४ हजाराच्या आसपास सायबर सिक्युरिटी तज्ज्ञांची गरज भासू शकते.

### अभ्यासक्रम

सायबर सिक्युरिटीच्या अनुषंगाने काही संस्थांनी पदवीस्तरीय अभ्यासक्रम सुरू केले आहे. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमही करता येतात. पदवीस्तरीय अभ्यासक्रमात सर्वसाधारणपणे, पुढील विषयघटकांचा समावेश असतो - पेनिट्रेशन टेस्टिंग, व्हलनेरॅबिलिटी ॲसेसमेंट, सायबर क्राइम, सायबर फॉरेंसिक, मालवेअर ॲनॅलिसीस, एआय फॉर सायबर सिक्युरिटी, एन्टरप्राइज सिक्युरिटी, नेटवर्क ॲण्ड डाटा सिक्युरिटी, थ्रेट इंटेलिजन्स, सॉफ्टवेअर सिक्युरिटी, सायबर सिक्युरिटी रेग्युलेशन.

### संस्था आणि अभ्यासक्रम

(१) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, श्री सिटी चित्तूर - बीटेक इन कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, (सायबर सिक्युरिटी), **संपर्क-** https:// www. iiits. ac. in

(२) नॅशनल फॉरेंसिक सायन्स युनिव्हर्सिटी- इंटिग्रेटेड बीटेक-एम.टेक इन कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनीअरिंग (सायबर सिक्युरिटी), हा अभ्यासक्रम संस्थेच्या गांधीनगर, दिल्ली, त्रिपुरा, धारवाड, गोवा यां कॅम्पसमध्ये करता येतो, **संपर्क संकेतस्थळ** – nfsu. ac. in/ admission

(३) एसआरएम इंस्टिट्यूट ऑफ सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी,तिरुचिरापल्ली- बीटेक इन कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी (सायबर सिक्युरिटी), **संपर्क-** https:// www. srmist. edu. in

(४) व्हेलोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी- बीटेक इन कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी (सायबर सिक्युरिटी), **संपर्क-** https:// vit. ac. in/ schools/

(५) मुकेश पटेल टेक्नॉलॉजी मॅनेजमेंट ॲण्ड इंजिनिअरिंग, मुंबई- बीटेक इन कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी (सायबर सिक्युरिटी), **संपर्क-** https:// engineering. nmims. edu/ btech- degree- programmes/ b- tech- computer- science- cybersecurity/

(६) एमआयटी पुणे- बीटेक इन कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी (सायबर सिक्युरिटी ॲण्ड फोरेंसिक), **संपर्क-** https:// admissions. mitwpu. edu. in/

(७) विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे- बीटेक इन कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी (इंटरनेट ऑफ थिंग्ज, सायबर सिक्युरिटी ॲण्ड ब्लॉक चेन टेक्नॉलॉजी), **संपर्क-** https:// www. vit. edu

(८) डी.जे संघवी कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग- बीटेक इन कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी (इंटरनेट ऑफ थिंग्ज, सायबर सिक्युरिटी ॲण्ड ब्लॉक चेन टेक्नॉलॉजी), **संपर्क-** https:// www. djsce. ac. in/

(९) सीडॅक (सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स्ड कॉम्प्युटिंग)- या संस्थेने, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन (१) सायबर सिक्युरिटी ॲण्ड फॉरेंसिक आणि (२) आयटी इन्फ्रास्ट्रक्चर, सिस्टिम्स ॲण्ड सिक्युरिटी हे प्रत्येकी सहा महिने कालावधीचे अभ्यासक्रम सुरु केले आहेत. अर्हता- आयटी/कॉम्प्युटर सायन्स/ इलेक्ट्रॉनिक्स/ टेलिकम्युनिकेशन/ इलेक्ट्रिकल /इंस्ट्रुमेंटेशन या विषयातील अभियांत्रिकी पदवी किंवा कॉम्प्युटर सायन्स/आयटी/ इलेक्ट्रॉनिक्स या विषयातील एम.एससी किंवा कोणत्याही विषयातील अभियांत्रिकी पदवी किंवा मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन (एमसीए) किंवा भौतिकशास्त्र/ गणित/ सांख्यिकी या विषयातील पदव्युत्तर पदवी. **संपर्क-** https:// www. cdac. in

याक्षेत्रात येण्यासाठी माहिती तंत्रज्ञान, संगणकशास्त्र किंवा यासारख्या अभ्यासक्रमांसोबतच पुढील काही प्रमाणपत्र प्रशिक्षणही महत्त्वाची, अर्हता ठरतात - यामध्ये, कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी इंडस्ट्री असोसिएशन सिक्युरिटी (कॉम्पिटीआयए सिक्युरिटी), सर्टिफाइड इन्फॉर्मेशन सिस्टिम्स सिक्युरिटी प्रोफेशनल (सीआयएसएसपी), सर्टिफाइड इथिकल हॅकर, यांचा ठळकपणे उल्लेख करावा लागतो. क्लाऊड सिक्युरिटी, रिस्क ॲनॅलिसीस, इंट्रुजन डिटेक्शन, माहिती सुरक्षेची साधने, ही कौशल्य प्राप्त केल्यास, याक्षेत्रात अधिक चांगल्या करिअर संधी मिळू शकतात.



### करिअर संधी

सायबर सिक्युरिटीच्या क्षेत्रात पुढील करिअर संधी मिळू शकतात- (१) सायबर सिक्युरिटी ॲनॅलिस्ट - या तज्ज्ञांचे वर्णन डिजिटल गार्ड किंवा डिजिटल सुरक्षा रक्षक असे केले जाते. हे रक्षक कोणत्याही संशयास्पद कृत्यांचा शोध घेतात. नेटवर्क सुरक्षेचे संनियंत्रण करतात. माहिती तंत्रज्ञानातील सायबर सुरक्षेच्या प्रवाहांबाबत संशोधन करतात. वापरकर्त्यांना सुरक्षा नियमावलीचे प्रशिक्षण देतात, (२) सिक्युरिटी टेस्टर- सायबर हल्ल्यापासून बचाव करण्याऱ्या यंत्रणेचा विकास करण्यासाठी, अशा हल्ल्यांचे सदृश्यीकरण करुन, संभाव्य धोक्यांचा शोध, हे तज्ज्ञ घेतात, (३) नेटवर्क सिक्युरिटी इंजिनिअर- कोणताही संभाव्य सायबर हल्ला थोपवण्यासाठी, नेटवर्कचे डिझाइन आणि संरक्षण, सुरक्षा हॉर्डवेअर आणि सॉफ्टवेअरचे एकत्रिकरण, जोखीम व्यवस्थापन, हे अभियंते करतात. (४) सायबर सिक्युरिटी कंसल्टंट- एकाच वेळी अनेक ग्राहकांना, सायबर सुरक्षेविषयी सल्ला आणि मार्गदर्शन करतात. प्रत्येक संस्थेच्या गरजेनुसार अतिशय भक्कम अशी सुरक्षा कार्यप्रणाली विकसित करतात. जोखीम विश्लेषणाचे कार्य करतात, (५) इन्फॉर्मेशन सिक्युरिटी सेपॉलिस्ट- संस्थात्मक पातळीवरील सायबर सुरक्षा यंत्रणा आणि प्रणाली हाताळण्याचे कौशल्य या तज्ज्ञांकडे असते. संस्थात्मक पातळीवर सायबर सुरक्षेविषयी प्रशिक्षण देतात. ॲण्टिव्हायरस सॉफ्टवेअरचे संनियंत्रण करतात, (६) सायबर सिक्युरिटी मॅनेजर- संस्थेतील सुरक्षा पथकाचे संनियंत्रण करतात. उच्च श्रेणीचे सुरक्षा नियोजन करतात, त्यासाठी निधीची उपलब्धता करुन घेतात. (७) चिफ इन्फॉर्मेशन सिक्युरिटी ऑफिसर- संस्थांतर्गत, सायबर सुरक्षा हाताळणारे सर्वोच्च अधिकारी म्हणून, हे तज्ज्ञ कार्य करतात. विविध पथकांचे संनियंत्रण करतात. कंपनीच्या किमती मालमत्तेच्या संरक्षणासाठी विविध धोरणे आखून, त्यांची अंमलबजावणी करतात, (८) सायबर सिक्युरिटी इंसिडेंट रिस्पॉंडर- माहितीच्या साठ्याचे संरक्षण करण्यासाठी, सायबर हल्ले कमी होतील, यावर लक्ष केंद्रित करणे, सायबर धोक्यानंतर कार्यप्रणाली सुरळीत करणे, ही कार्ये या तज्ज्ञांना करावी लागतात. (९) आयटी ऑडिटर- माहिती कार्यप्रणालीचे मूल्यांकन, लेखा परीक्षण, सुरक्षा, कार्यक्षमता आणि अनुपालनाची खात्री हा तज्ज्ञ करतो.

### संधी देणाऱ्या संस्था

पुढील संस्थांमध्ये सायबर सिक्युरिटी तज्ज्ञांना करिअर संधी मिळू शकते- (१) शासकीय संस्था, (२) डिफेन्स कॉन्ट्रॅक्टर, (३) कंसल्टिंग फर्म्स, (४) शिक्षण आणि संशोधन संस्था, (५) माध्यमे आणि मनोरंजन संस्था, (६) निर्मिती संस्था- (७) परिवहन आणि साहित्य पुरवठा, (८) विमा कंपनी, (९) औषध निर्माण संस्था, (१०) क्लाउड सेवा पुरवठादार, (११) वित्तीय संस्था, (१२) टेक जायंट्स, (१३) आरोग्यसुविधा (हेल्थकेअर), (१४) टेलिकम्युनिकेशन कंपन्या, (१५) ई कॉमर्स आणि रिटेल, (१६) उर्जा, (१७) स्टार्ट अप आणि इनोव्हेटर्स, (१८) गेमिंग उद्योग, (१९) अशासकीय संस्था, (२०) व्यावसायिक सेवा पुरवठादार कंपन्या.

### एथिकल हॅकर

सायबर हल्ल्याला परतवून लावणाऱ्या प्रशिक्षित मनुष्यबळास, एथिकल हॅकर म्हणून ओळखले जाते. संभाव्य सायबर धोके किंवा जोखिमेच्या घटकांचा शोध घेण्यासाठी, या तज्ज्ञास कायदेशीररित्या संगणकीय यंत्रणा किंवा नेटवर्कमध्ये शिरकाव करता येतो. त्यामुळे त्यांना यंत्रणेतील कमकुवत दुवे, बाजू लक्षात येतात व त्यावरचे उपायही करता येतात. परिणामी, संभाव्य धोके टळतात अथवा हल्ले झाल्यास, ते तत्काळ परतवून लावणे शक्य होते. या तज्ज्ञांना, डिजिटल कार्यप्रणालीची सुरक्षा करण्यासाठी, सायबर हल्ल्यांचा सामना करणे, संभाव्य धोके ओळखणे, जोखीम कमी करणे, यासाठी विविध कौशल्ये प्राप्त करावी लागतात. कार्यप्रणालीच्या सुरक्षेचे संनियंत्रण आणि विश्लेषण करण्यासाठी, हॅकिंग तंत्रज्ञानाचा वापर करावा लागतो. नेटवर्कची सुरक्षा भक्कम केल्यावर, कोणताही डाटा/माहितीची चोरी करणे, या माहितीचा दुरुपयोग करणे, यापासून हल्लेखोरांना थोपवू शकते. यामुळे ब्लॅकमेल, वित्तीय नुकसान, प्रतिष्ठेच्या नुकसानीचे जोखीम कमी होते. सायबर दहशतवाद्यांशी सामना करता येणे शक्य होते.

या क्षेत्रात (१) वेब ॲप्लिकेशन हॅकिंग, (२) सिस्टिम हॅकिंग, (३) वेब सर्व्हर हॅकिंग, (४) वायरलेस नेटवर्क हॅकिंग, या चार घटकांमध्ये स्पेशलायझेशन करता येते.

**- सुरेश वांदिले**

Reg. No. MCS/069/2018-20 R. N. I. Reg. No. 1591/57

मुंबई, मंगळवार, ३ जून २०२५ | WWW.LOKSATTA.COM

# लोकसत्ता

मुंबई, पुणे, नागपूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि दिल्ली येथून प्रसिद्ध
लोकमान्य, लोकशक्ती!

**तापमान**

कमाल ३३.०°से | किमान २६.०°से

हवामानाचा अंदाज
आकाश ढगाळ, पावसाची शक्यता.



**क्रीडा**
**बंगळूरु की पंजाब? नवविजेता कोण?**

नॅशनल एग कोऑर्डिनेशन कमिटी (बिगर-सरकारी सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट) | Vencobb — Vencobb No. 1 Tastiest Chicken

०३/०६/२०२५

| | | |
|---|---|---|
| ब्रॉयलर चिकनचा दर* (पोल्ट्रीफार्मवर) | ९८ रु. | प्रति किग्रॅ |
| किरकोळ विक्रीचा दर* जिवंत कोंबडी | १२६ रु. | प्रति किग्रॅ |
| ड्रेस्ड कोंबडी (स्किनसह) दर* | १५५ रु. | प्रति किग्रॅ |
| अंडी किरकोळ विक्री दर* | ७६ रु. | प्रति १२ अंडी |

ग्राहकांच्या हितासाठी *अटी लागू

# निवडणुकीवेळी जाहिरात... सत्ता येताच विश्वासघात?

**देवेश गोंडाणे, लोकसत्ता**

**नागपूर :** गतवर्षी नोव्हेंबरमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या काळात 'महायुती सरकारमुळे ओबीसी विद्यार्थ्यांचे परदेशी शिक्षणाचे स्वप्न पूर्ण झाले', असे सांगणारी जाहिरात करण्यात आली होती. या जाहिरातीमध्ये झळकलेल्या चंद्रपूरच्या रोहित दिवसे या विद्यार्थ्याला आता मात्र त्याच परदेशी शिष्यवृत्तीसाठी अपात्र ठरविण्यात आले आहे.

राज्यातील इतर मागासवर्ग (ओबीसी) आणि विमुक्त भटक्या प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना २०१८-१९ पासून परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. याअंतर्गत रोहितने इंग्लंडच्या बर्मिंगहॅम विद्यापीठात एम.एस्सी. ॲडव्हान्स इंजिनिअरिंग मॅनेजमेंट या एक वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला. प्रवेशपत्राच्या आधारे त्याने ओबीसी विभागाकडे शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला. कागदपत्रांची छाननी करून त्याला पात्र ठरवण्यात आले. २६ सप्टेंबर २०२४ च्या ७५ पात्र विद्यार्थ्यांच्या यादीत २४ व्या क्रमांकावर रोहितचे नाव आहे. त्यानंतर निवडणूक काळात रोहित आणि त्याच्या कुटुंबाची (पान २ वर)

**लो** विधानसभा निवडणुकीवेळी परदेशी शिष्यवृत्तीसाठी केलेल्या जाहिरातीचा चेहरा बनलेल्या विद्यार्थ्याला आता तांत्रिक कारणे देऊन ओबीसी विभागाने अपात्र ठरविले आहे.



सरकारने रोहितची निवड केली. त्याच्यावर विश्वास ठेवून त्याने कर्ज काढले. आता त्याला शिष्यवृत्ती देणे ही शासनाची जबाबदारी आहे. रोहित पात्र नाही, असे सरकार आता सांगत असेल तर तो आधी पात्र कसा ठरला? निवडणुकीदरम्यान सरकारने रोहितचा वापर केला. ओबीसींवर असा अन्याय सहन करणार नाही.
**– सचिन राजूरकर,** महासचिव, ओबीसी महासंघ

## काय चाललंय काय!

प्रशांत कुलकर्णी




मला वाटतं राजकारण्यानी थोडे दिवस 'मौनाची भाषा' वापरली तर समाजात बरीच शांतता निर्माण होईल!!

# 'एमएचटी सीईटी' फेरपरीक्षेतही गोंधळ

## एकूण ४० चुकांसाठी प्रत्येकी एक गुण बहाल

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून घेण्यात आलेल्या तंत्रशिक्षण, कृषी अभ्यासक्रमांच्या सामायिक प्रवेश परीक्षेत (एमएचटी सीईटी) चुकीच्या प्रश्नांमुळे फेरपरीक्षा झाल्यानंतरही आणखी ४० प्रश्न चुकल्याचे स्पष्ट झाले आहे. ज्या सत्रातील परीक्षेला चुकीचे प्रश्न होते त्या सत्रातील प्रत्येक विद्यार्थ्याला चुकीच्या एका प्रश्नासाठी एक गुण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

९ एप्रिल ते ५ मेदरम्यान एमएचटी सीईटी घेण्यात आली होती. २८ सत्रांमध्ये झालेल्या या परीक्षेमध्ये ४० प्रश्न चुकीचे असल्याचे आढळले आहे. त्यात सर्वाधिक चुकीचे प्रश्न (२८) गणिताच्या पेपरमध्ये आहेत. भौतिकशास्त्रात सात, रसायनशास्त्रात चार आणि जीवशास्त्रातील एक प्रश्न चुकीचा आहे. ज्या सत्रामध्ये प्रश्न चुकीचे असल्याचे निदर्शनास आले आहे, त्या सत्रातील प्रत्येक विद्यार्थ्याला चुकीच्या एका प्रश्नासाठी एक गुण देण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. एमएचटी सीईटी २०२५ परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांपैकी पीसीबी गटातील उमेदवारांसाठी १८ मे २०२५ रोजी आणि पीसीएम गटासाठी २१ मे रोजी सूचनेद्वारे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावर आक्षेप नोंदविण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली होती. त्यानुसार २९० विद्यार्थ्यांनी १ हजार ४१४ प्रश्नांवर आक्षेप नोंदविला होता. यामध्ये गणित विषयासाठी सर्वाधिक ८७२ आक्षेप नोंदविण्यात आले होते. त्याखालोखाल भौतिकशास्त्रासाठी २८८, रसायनशास्त्रासाठी २४५ आणि जीवशास्त्रासाठी ९ आक्षेप नोंदविण्यात आले होते.



### ...तर शुल्क परत

ज्या विद्यार्थ्यांनी नोंदवलेले आक्षेप योग्य आहेत, अशा विद्यार्थ्यांनी आक्षेप नोंदविण्यासाठी भरलेले एक हजार रुपयांचे शुल्क परत करण्यात येणार आहे. तसेच यापुढे कोणत्याही प्रश्नाबाबत आक्षेप स्वीकारला जाणार नसल्याचे सीईटी कक्षाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## 'नीट-पीजी' लांबणीवर

नवी दिल्ली : पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी १५ जून रोजी घेण्यात येणारी प्रवेश परीक्षा (नीट-पीजी २०२५) पुढे ढकलण्यात आली आहे. ही परीक्षा दोन सत्रांत न घेता एकाच सत्रात घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने गेल्या आठवड्यात दिले होते. त्यानंतर राष्ट्रीय वैद्यकीय परीक्षा मंडळाने १५ जूनची परीक्षा स्थगित करण्याचा निर्णय घेतला. परीक्षेसंबंधी नवी तारीख लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. नीट-पीजी २०२५ परीक्षा दोन सत्रांत घेण्याच्या अधिसूचनेला विविध याचिकांद्वारे आव्हान देण्यात आले होते. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने परीक्षेत पारदर्शकता आणण्यासाठी ती एकाच सत्रात घेण्याचे आदेश दिले होते.




## जगज्जेत्याची 'राजा'वर मात!

बुद्धिबळ जगज्जेत्या भारताच्या डी. गुकेशने सोमवारी नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत जगातील अव्वल क्रमांकाच्या मॅग्नस कार्लसनवर सनसनाटी मात केली. पराभवाच्या उंबरठ्यावर असताना कार्लसनच्या एका घोडचुकीचा फायदा उठवत गुकेशने बाजी उलटवली. पारंपरिक प्रकारात गुकेशचा कार्लसनवरील हा पहिलाच विजय ठरला. या डावाइतकीच गाजली कार्लसनची पहिली प्रतिक्रिया. पराभव सहन न झाल्याने सुरुवातीस कार्लसनने टेबलावर मूठ आदळून नाराजी व्यक्त केली. मात्र त्वरित स्वतःला सावरत गुकेशचे अभिनंदन करत माफीही मागितली. – संबंधित /क्रीडा

### सेल्फीच्या नादात दोघींचा बुडून मृत्यू

**सांगली :** सेल्फी काढण्याच्या नादात पाय घसरून तलावात पडल्याने नणंद-भावजयीचा बुडून मृत्यू झाल्याची घटना खानापूर तालुक्यात रविवारी सायंकाळी घडली. निशा आढगळे (२०) आणि मयूरी आढगळे (१७) अशी त्यांची नावे आहेत. तलावात उतरल्यानंतर छायाचित्र घेण्याच्या नादात त्यांचा तोल गेला. पोहता येत नसल्याने दोघीही बुडाल्या. स्थानिकांनी त्यांना विटा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र तत्पूर्वीच दोघींचा मृत्यू झाला होता.

### देशाच्या साखर उत्पादनात १८ टक्के घट



**मुंबई :** देशातील यंदाचा उसाचा गळीत हंगाम समाप्त झाला आहे. त्यात उसाची कमी उपलब्धता आणि कमी साखर उताऱ्यामुळे साखर उत्पादनात मोठी घट झाली आहे. १५ मेपर्यंतच्या आकडेवारीनुसार एकूण साखर उत्पादन सुमारे १८ टक्क्यांनी कमी झाले आहे. – पान २

### 'पाणी, रक्त एकत्र वाहू शकत नाही'

**क्वालालंपूर :** भारतात कोणत्याही प्रकारच्या दहशतवादाला थारा दिला जाणार नाही. त्याचबरोबर पाणी आणि रक्त एकत्र वाहूच शकत नसल्याची स्पष्टोक्ती 'ऑपरेशन सिंदूर'बाबत भारताची बाजू मांडण्यासाठी मलेशियाला भेट देणाऱ्या सर्वपक्षीय संसदीय शिष्टमंडळाने केली. – पान ३

### 'पुणे ॲग्री हॅकेथॉन'चे ढिसाळ नियोजन

**मुंबई :** राज्य सरकारच्या कृषी विभागाच्या वतीने पुण्यात देशातील पहिले आंतरराष्ट्रीय 'पुणे ॲग्री हॅकेथॉन' सुरू आहे. मात्र हॅकेथॉनचे नियोजन ढिसाळ झाल्याचे समोर आले आहे. राज्याबाहेरील, देशाबाहेरील सहभागींची संख्याही अत्यल्प आहे. सादर केलेले प्रकल्पही अत्यंत प्राथमिक पातळीवरील आहेत. – पान ९

विरोधकांना आव्हान देत सामाजिक न्यायमंत्र्यांची घोषणा

# 'व्हिट्स' व्यवहारातून शिरसाटपुत्राची माघार?

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** वादात अडकलेल्या 'हॉटेल व्हिट्स'च्या लिलाव प्रक्रियेतून आपला मुलगा सिद्धांत आणि त्याचे पाच भागीदार यांनी बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्याची घोषणा सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी सोमवारी केली. ज्यांना हॉटेलची किंमत ११० कोटी वाटते, त्यांनी लिलावात उतरावे, असे आव्हान देताना त्यांनी विरोधकांनाही लक्ष्य केले.

सिद्धांत आणि त्याच्या भागीदारांना व्यवहारातून बाहेर पडण्यासाठी कागदपत्रांची पूर्तता करण्यास सांगू, असे शिरसाट यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी १२ वर्षांपूर्वी ११० कोटी रुपये किंमत असलेल्या हॉटेलसाठी सिद्धांत शिरसाट यांनी अवघी ६४.८३ कोटींची बोली लावल्याचा आरोप केल्याच्या पार्श्वभूमीवर संजय शिरसाट यांनी ही घोषणा केली. ''त्यांनी (दानवे यांनी) हॉटेल घेतले तर त्यांच्याकडे पेढे घेऊन जाईन. मात्र त्यांची तेवढी पत नाही. मराठी (पान २ वर)



यापुढे वैयक्तिक आरोप करायचे असतील तर मला सुद्धा सर्व माहिती आहे. तुमच्या सर्व स्टोऱ्या माझ्याकडे आहेत. घराला आग लावायला कमी करणार नाही. माझ्या नादी लागताना राजकारणाच्या दृष्टीकोनातून आरोप कराल तर उत्तर देईन. व्यवसायामध्ये, मुलाबाळांमध्ये ज्या चर्चा केल्या जात आहेत. त्याचे परिणाम भोगावे लागतील.
**– संजय शिरसाट,** सामाजिक न्यायमंत्री



ईशान्य भारतामधील आसाम, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, त्रिपुरा, मेघालय, सिक्कीम आदी राज्यांना मुसळधार पावसाचा जोरदार फटका बसला आहे. गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आलेल्या पूर आणि भूस्खलनाच्या निरनिराळ्या घटनांमध्ये ३४ जणांचा मृत्यू झाला. राज्य प्रशासनांनी मदतकार्य सुरू केले असून विविध ठिकाणी मदत शिबिरे सुरू केली आहे. – संबंधित पान ३

# अकोल्यात दोन अपघातांत चार जण ठार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**अकोला :** पुलाचे कठडे तोडून चारचाकी खाली कोसळून झालेल्या अपघातात मोटारीतील तिघांचा जागीच मृत्यू झाला. तर अन्य एका घटनेत ट्रक अनियंत्रित होऊन दरीत कोसळून झालेल्या दुर्घटनेत एक जण ठार झाला.

जिल्ह्यातील बाळापूर-वाडेगाव रस्त्यावर कुपटा येथील पुलाजवळ रविवारी रात्री मोटार दरीत कोसळून कन्हैयासिंग ठाकूर (५५), विशाल सोलनकर (४५) आणि सुनील शर्मा (४५) या तिघांचा घटनास्थळी मृत्यू झाला. अपघातात आशीष ठाकूर हे गंभीर जखमी असून त्यांच्यावर अकोला येथे उपचार सुरू आहेत. तर, पातूर घाटात मालवाहू ट्रक दरीत कोसळल्यामुळे घडलेल्यादुर्घटनेत ट्रकचालकाचा जागीच मृत्यू झाला तर एक जण गंभीर जखमी झाला. चिंटू नंदलाल (२१, रा. कोटा, राजस्थान) असे ठार झालेल्या चालकाचे नाव असून त्याचा सहकारी साबिर खान (रा. कोटा) गंभीर जखमी आहे. अपघातानंतर घाट मार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. दोन्ही अपघातांबाबत पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला असून अपघाताच्या नेमक्या कारणांचा तपास सुरू आहे.




# परदेशातील भारतीय महिलाही कौटुंबिक छळाने पीडित

**अशोक अडसूळ, लोकसत्ता**

**मुंबई :** महिला संबंधित गुन्ह्यांची संख्या राज्यात दरवर्षी वाढत असतानाच महाराष्ट्रातील अनिवासी भारतीय महिलांचा छळाच्या तक्रारींचे प्रमाणही अधिक आहे. राष्ट्रीय महिला आयोगाकडे गेल्या पाच वर्षांत अनिवासी भारतीय महिलांच्या २,६२८ तक्रारी दाखल झाल्या असून त्यामध्ये महाराष्ट्रातील अनिवासी भारतीय महिलांच्या तक्रारींची संख्या २४२ आहे.

राष्ट्रीय महिला आयोगाकडे दरवर्षी महिला संबंधित २३ प्रकाराच्या अत्याचाराच्या सरासरी ३० हजार तक्रारी दाखल होतात. त्यातील अनिवासी भारतीय महिलांच्या तक्रारीची संख्या पाहून आयोगाने 'एनआरआय प्रकोष्ठ' विभाग स्थापन केला आहे. या विभागाकडे राज्यवार अनिवासी भारतीय महिलांच्या देशातील आणि विदेशातील तक्रारी नोंदवल्या जातात.

अनिवासी भारतीय महिलांच्या तक्रारीमध्ये सर्वाधिक तक्रारी दिल्ली राज्यांमधून येतात. दुसऱ्या क्रमांकावर हरियाणा असून तिसऱ्या क्रमांकाच्या तक्रारी महाराष्ट्रातील आहेत. महाराष्ट्रातील तक्रारींचे प्रमाण १० टक्के आहे. या तक्रारींमध्ये (पान २ वर)

**लो** राष्ट्रीय महिला आयोगाकडे गेल्या पाच वर्षांत अनिवासी भारतीय महिलांच्या २,६२८ तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्यात महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर असून महाराष्ट्रातील अनिवासी भारतीय महिलांच्या तक्रारींची संख्या २४२ आहे.



### महिलांच्या तक्रारी

| वर्ष | एकूण तक्रारी | महाराष्ट्रातील तक्रारी |
|---|---|---|
| २०१९-२०२० | ६०८ | ४७ |
| २०२०-२०२१ | ४८७ | ४२ |
| २०२१-२०२२ | ४६३ | ४५ |
| २०२२-२०२३ | ५३८ | ४९ |
| २०२३-२०२४ | ५२२ | ५९ |

आमच्याकडे परदेशातून आणि देशातूनही तक्रारी येतात. लग्न झाल्यानंतर पती परदेशात गेल्यानंतर पत्ता, ई-मेल, संपर्क क्रमांक बदलतो. पत्नीशी संपर्क तोडतो. त्याला नोटीस पाठवता येत नाही. त्याचे देशातले आई- वडील सहकार्य करत नाहीत. अनिवासी भारतीय महिलांच्या तक्रारींचा राज्यानुसार वेगवेगळ्या आहेत. हरियाणामध्ये पत्नीशी संपर्क तोडण्याच्या तक्रारी तर महाराष्ट्रात माहिती लपवण्याच्या तक्रारी अधिक आहेत.
**– विजया रहाटकर,** अध्यक्ष, राष्ट्रीय महिला आयोग

## रायगडच्या पालकमंत्री वादात मध्यस्ती : बावनकुळे



**नागपूर** : रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावरून राष्ट्रवादी (अजित पवार) आणि शिवसेना (शिंदे) या महायुतीच्या दोन घटक पक्षांत वाद वाढला आहे. हा वाद सुटावा म्हणून पक्ष म्हणून मी पुढाकार घेणार आहे, असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. ते सोमवारी नागपुरात पत्रकारांशी बोलत होते. महायुतीत कुठलीही ठिणगी पडू नये, अशी भाजपची इच्छा आहे. हा वाद लवकरच सुटेल अशी व्यवस्था मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. वाद चव्हाट्यावर आणण्यापेक्षा एकत्र बसून ते सोडवता येतात. जाहीररित्या टीका करण्याची गरज नाही. मी कुठल्याही पक्षाला सल्ला देणे योग्य नाही. पण, रस्त्यावर वाद करण्यापेक्षा पक्ष प्रमुखांशी चर्चा करून ते सोडवावे, असे बावनकुळे म्हणाले.

## ठाकरे गट संपविण्यास राऊतच पुरेसे : महाजन

**नाशिक** : शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्ष संपविण्यास खासदार संजय राऊत हेच पुरेसे आहेत.



त्यांच्या बडबडीला पक्षातील सर्व जण वैतागले असून हा गट आता जमीनदोस्त होण्याच्या मार्गावर आहे, असा दावा भाजप नेते तथा जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी केला. नाशिक दौऱ्यावर असणाऱ्या राऊत यांनी सत्ताधारी महायुतीवर केलेल्या आरोपांना मंत्री महाजन यांनी प्रत्युत्तर दिले. ठाकरे गटाचे पदाधिकारी अलीकडेच नाशिकमध्ये संघटनात्मक गोष्टींवर चर्चा करून गेले. परंतु, पुढील आठ दिवसांत या पक्षात कोण राहील, कोण नाही, अशी स्थिती आहे. राऊत हे नियंत्रणाबाहेर गेले आहेत. त्यांच्या बडबडीने पक्षातील सर्व त्रस्त असल्याकडे महाजन यांनी लक्ष वेधले. प्रसिद्धी मिळत असल्याने राऊत हे बेछुट विधाने करतात. त्यांना गांभीर्याने घेण्याची गरज नाही, असेही महाजन या वेळी म्हणाले.

# तुटीचा ताण, दायित्वाचे दुहेरी संकट

## ‘एमआयडीसी’चा सहा हजार कोटी रुपये तुटीचा अर्थसंकल्प

**जयेश सामंत, लोकसत्ता**

**ठाणे** : एकेकाळी १० हजार कोटी रुपयांहून अधिक मुदत ठेवींसह राज्यातील उद्योगधंद्यांना चालना देणाऱ्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा (एमआयडीसी) येत्या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सहा हजार कोटी रुपयांच्या तुटीचा दाखविण्यात आला आहे. पुढील दोन वर्षांतील आर्थिक दायित्वाचा भार वाढेल, असा अंदाज असल्याने या महामंडळाला एकीकडे कर्जाचे डोहाळे लागले असून,दु सरीकडे दायित्वाचा भार आणि तुटीचा ताण अशा दुहेरी संकटांनाही सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा येत्या आर्थिक वर्षाचा सहा हजार १३३ कोटी ४९ लाख आणि १२ हजार रुपयांच्या तुटीचा अर्थसंकल्प नुकताच संचालक मंडळापुढे सादर करण्यात आला. या अर्थसंकल्पात येत्या आर्थिक वर्षात ११ हजार १४२ कोटी ४९ लाख रुपयांचा खर्च तर पाच हजार नऊ कोटी रुपयांचा जमेची बाजू दाखविण्यात आली आहे. हा अर्थसंकल्प अंतिम मान्यतेसाठी राज्य सरकार आणि पुढे विधान मंडळापुढे मांडला जाणार आहे. गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत ‘एमआयडीसी’ची आर्थिक तूट यंदा वाढेल, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. गेल्या २०२४-२५ या आर्थिक वर्षात ही तूट २ हजार ९७८ कोटी २८ लाख इतकी होण्याचा अंदाज आहे.



### शासन अनुदान, कर्जावर मदार

- इतकी मोठी तूट भरून काढण्यासाठी ‘एमआयडीसी’ने यंदा शासनाकडे हात पसरले आहेत. अनुदाने, अर्थसहाय्य, कर्ज आणि आगाऊ रकमा मिळाव्यात यासाठी राज्य सरकारकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तसेच अर्थप्राप्तीसाठी मार्ग शोधताना हमीविना असलेली बंधपत्रे, रुणको, रोखे काढून अथवा खुल्या बाजारातून शासन मान्यतेने कर्ज काढण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.
- औद्योगिक क्षेत्रात विकसित करण्यात आलेल्या जमिनींचा भाडेपट्टा दर वाढविण्याचा प्रस्तावही यंदाच्या वर्षी तयार केला जाणार आहे. औद्योगिक पट्ट्यातून पुरविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा तसेच इतर सुविधा शुल्कांचे दर जुने असल्यामुळे यंदाच्या वर्षी त्यातही वाढ केली जाणार आहे.

### महसुली उत्पन्नात ०.२९ टक्के घट

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे आर्थिक वर्ष २०२५-२६ साठीचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक हे मंडळ तोट्याकडे जात असल्याचे स्पष्ट आहे. गेल्या आर्थिक वर्षात महामंडळाचे महसुली उत्पन्न १ हजार ५६६ कोटी २४ लाख इतके होते. तर येत्या वर्षात उत्पन्नाचा आकडा १ हजार ५६१ कोटी ७६ लाख इतका अपेक्षित आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत ०.२९ टक्के इतकी घट दर्शविण्याती आली आहे.

### भांडवली खर्चात वाढीची अपेक्षा

- भांडवली उत्पन्न जसे की जमिनीचे अधिमूल्य, जमिनीचे वार्षिक भाडे, ठेवींवरील व्याजातून महामंडळाला यंदा पाच हजार नऊ कोटी २० लाख येणे अपेक्षित आहे. यामध्ये गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत ५.९१ टक्क्यांची वाढ अपेक्षित असली तरी महामंडळाचा खर्च यंदाही वाढणार आहे.
- आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये पाणीपुरवठा योजना, मलनिःसारण व्यवस्था, अग्निशमन केंद्र, रहिवासी इमारती, अनिवासी इमारती आणि सयंत्रे यांच्या देखभाल दुरूस्तीवरील खर्चात गेल्या वर्षाच्या तुलनेत वाढ होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.
- गेल्या वर्षात हा खर्च २ हजार २५२ कोटी १८ लाख इतका होता. यंदाच्या वर्षात हा महसुली खर्च २ हजार ४३० कोटी ६५ लाख इतका अंदाजित आहे. यंदाच्या वर्षात ही निव्वळ महसुली खर्चातील वाढ ७.९२ टक्के अपेक्षित धरण्यात आली आहे.

### जमीन खरेदीवर मोठा खर्च

- गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत यंदा ‘एमआयडीसी’चा भांडवली खर्चही वाढणार आहे. यंदाच्या वर्षात भांडवली खर्च ११ हजार १४२ कोटी ६९ लाख इतका प्रस्तावित करण्यात आला आहे. गेल्या वर्षात हा खर्च एकूण ७ हजार ७०७ कोटी ९५ लाख इतका होता. त्यामुळे यंदाच्या वर्षामध्ये खर्चात तब्बल ४४.५६ टक्के वाढ अपेक्षित धरण्यात आली आहे. यामुळे तुटीचे प्रमाणही गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत १०५ टक्क्यांपर्यंत वाढणार आहे.
- यंदाच्या वर्षात भांडवली खर्चात ४४.५६ टक्क्यांची वाढ अपेक्षित धरण्यात आली असली तरी यातील बराचसा खर्च हा जमीन खरेदीवर करावा लागण्याची चिन्हे आहेत. जमिनीच्या मोबदल्यासाठी यंदाच्या आर्थिक वर्षात २८८६ कोटी ३९ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित धरला आहे. उद्योगांच्या स्थापनेसाठी महत्त्वाचा भाग असलेल्या जमीन खरेदीसाठी यंदा गेल्या वर्षीच्या तुलनेत ३१४ टक्क्यांनी वाढ अपेक्षित धरली होती. गेल्या आर्थिक वर्षात यासाठी ६१६ कोटी रुपये खर्च केले होते. पाणी पुरवठा योजनांवरही यंदा दोन हजार २३२ कोटींचा खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे. गेल्या आर्थिक वर्षापेक्षा या खर्चात ३६ टक्क्यांची वाढ अपेक्षित आहे.

## देशात साखरेच्या उत्पादनात १८ टक्के घट

### पुढील गाळप हंगामातील उपलब्धतेवर लक्ष



**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई** : देशातील यंदाचा उसाचा गळीत हंगाम समाप्त झाला आहे. त्यात उसाची कमी उपलब्धता आणि कमी साखर उताऱ्यामुळे साखर उत्पादनात मोठी घट झाली आहे. १५ मेपर्यंतच्या आकडेवारीनुसार एकूण साखर उत्पादन सुमारे १८ टक्क्यांनी कमी झाले आहे. मात्र, पुढील गाळप हंगामात उसाची उपलब्ध जास्त असल्यामुळे आशादायी चित्र निर्माण झाले आहे.

राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्या माहितीनुसार, २०२३-२४ मध्ये ३१५.४० लाख टन साखर उत्पादन झाले होते. त्यात ५८ लाख टनांची घट होऊन, चालू हंगामात ते २५७.४० लाख टनांपर्यंत खाली आले. प्रामुख्याने उसाची उपलब्धता घटल्याने आणि सरासरी साखर उतारा घसरल्याने साखर उत्पादनात घट झाली आहे. गतवर्षी १०.१० टक्क्यांवरून या हंगामात ९.३० टक्क्यांपर्यंत साखर उतारा घटला आहे. ऊस गाळपही २७६७.७५ लाख टनापर्यंत घसरले आहे, ते गत वर्षात ३१२२.६१ लाख टन होते. गतवर्षाच्या तुलनेत ५३४.८६ लाख टनांनी गाळप घटले आहे.

साखरेचा उत्पादन खर्च ४० रुपये प्रतिकिलो असून, त्यामुळे किमान साखर विक्री दर किमान ४० रुपये करावा. २०२५-२६ च्या हंगामात इथेनॉलसाठी ५० लाख टन साखर वळवण्याचे लक्ष्य जाहीर करावे. इथेनॉल खरेदीच्या किमतींमध्ये सुधारणा कराव्यात. प्रामुख्याने उसाच्या रसापासून आणि बी-हेवी मोलॅसेसपासून तयार होणाऱ्या इथेनॉलच्या दरात वाढ करावी.

**- हर्षवर्धन पाटील,** अध्यक्ष, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ

### राज्यात उसाचे उत्पादन ८०.९५ लाख टनांवर

- महाराष्ट्र, उत्तर प्रदेश आणि कर्नाटक या प्रमुख ऊस उत्पादक राज्यांमध्ये गतवर्षीच्या तुलनेत उत्पादनात मोठी घट झाली आहे. महाराष्ट्राचे उत्पादन ११०.२० लाख टनांवरून ८०.९५ लाख टनांवर आले आहे. उत्तर प्रदेशचे उत्पादन १०३.६५ लाख टनांवरून ९२.७५ लाख टनांवर आले आहे. कर्नाटकात ५१.४० लाख टनांवरून ४०.४० लाख टनांवर आले आहे.
- तामिळनाडू, बिहार, आंध्र प्रदेशमध्ये उत्पादन घसरले आहे. तथापि, गुजरात, उत्तराखंडमध्ये साखर उत्पादनात सुधारणा झाली आहे. गुजरातचे उत्पादन १०.३० लाख टनांवर गेले आहे.



राज्यात मोसमी पावसाचे आगमन झाले असून, शेती कामांना सुरुवात झाली आहे. याच पार्श्वभूमीवर सांगली जिल्ह्यातही पेरणीच्या कामांनी वेग घेतला आहे.

## ‘शिक्षणमंत्र्यांच्या मतदारसंघात बोगस शिक्षक भरती’

### माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचा आरोप

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर** : शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या मतदारसंघात बनावट कागदपत्रे तयार करून व त्याद्वारे तुकडीला मान्यता देऊन शिक्षक भरती करण्यात आली, असा आरोप माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी सोमवारी नागपुरात आयोजित पत्रकार परिषदेत केला.

नागपूर जिल्ह्यासह राज्यात बनावट शालार्थ आयडी घोटाळा समोर आला होता. त्या प्रकरणाची ‘एसआयटी’ चौकशी सुरू असतानाच भुसे यांच्या मतदारसंघातील मालेगाव येथे बनावट तुकडी दाखवून शिक्षक भरती झाल्याचे समोर आले आहे, असे सांगत देशमुख म्हणाले, नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथे १८ फेब्रुवारी २०१४ ला आदेश काढून जून २०१२ पासून विनाअनुदान तत्त्वावर नवीन तुकड्यांना मान्यता देण्यात आली. त्यासंदर्भातील शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने शासन आदेश काढला. काही सामाजिक कार्यकर्त्यांनी या विषयाची माहिती शालेय शिक्षण व क्रीडा विभागाला



माहितीच्या अधिकारात मागितली होती. त्यात प्राप्त तपशीलानुसार, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने नवीन तुकड्यांना मान्यता देण्याचा काढलेला आदेश बनावट आहे.

२८ ऑगस्ट २०१५ च्या शासन निर्णयानुसार नवीन तुकड्यांना मान्यता देता येत नाही. यामुळेच जुन्या तारखेचा बनावट आदेश काढून मालेगाव येथील १७ शाळांना नवीन तुकड्यांची मान्यता देण्यात आली. याच मान्यतेच्या आधारावर नंतर या तुकड्यांना अनुदानही देण्यात आले व १०० पेक्षा अधिक शिक्षकांची बनावट भरती करण्यात आली. नागपूर जिल्ह्यातील घोटाळ्याची चौकशी ‘एसआयटी’च्या माध्यमातून करण्यात येत आहे. परंतु संपूर्ण राज्यात हा घोटाळा झाल्यामुळे त्याची चौकशी सेवानिवृत्त न्यायाधीशामार्फत करण्यात यावी, अशी मागणी मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या पत्रात केली आहे, असेही देशमुख यांनी सांगितले.

## परदेशातील भारतीय महिलाही कौटुंबिक छळाने पीडित



(पान १ वरून)

पत्नीस सोडून देणे, घरगुती हिंसाचार, हुंड्यासाठी छळ, पारपत्र ताब्यात ठेवणे, बालकांचा ताबा न देणे, संपर्क तोडणे इत्यादीचा समावेश आहे.

**उपाययोजनेवर भर**

अनिवासी भारतीय महिलांच्या वैवाहिक तक्रारींचा निपटारा करणे किचकट प्रक्रिया आहे. त्यामुळे आयोग आता ‘एनआरआय’ विवाहसंदर्भात मार्गदर्शन करण्यावर भर देत आहे.

महाराष्ट्र, पंजाब, दिल्ली, तामिळनाडू, केरळ, तेलंगणा, हरियाणा या राज्यांच्या अनिवासी भारतीय महिलांच्या तक्रारी अधिक आहेत. त्यामुळे या राज्यांतील विद्यापीठांमध्ये ‘अनिवासी भारतीय विवाह : काय करा, काय करू नका?’ अशी शिबिरे घेऊन जनजागरण केले जात आहे.

तक्रारी सोडवण्यासाठी संबंधित देशातील भारतीय दूतावास, संबंधित देशाचा भारतातील दूतावास, परराष्ट्र मंत्रालय, केंद्रीय गृह विभाग, त्या देशातील स्वयंसेवी संस्था यांच्या समन्वयाने प्रक्रिया पार पाडली जाते. पीडित महिलांना कायदेविषयक आणि आर्थिक सहाय्य सूचीबद्ध स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने केले जाते.

> महाराष्ट्रातील तरुण-तरुणी परदेशात अधिक संख्येने आहेत. परिणामी महाराष्ट्रातील अनिवासी भारतीय महिलांच्या तक्रारी अधिक असणार. या तक्रारी राज्य महिला आयोगाकडेही येत असतात. माझ्या कारकीर्दीत मी ‘एनआरआय सेल’ स्थापन केला होता.
> **- निर्मला सामंत-** प्रभावळकर, माजी अध्यक्ष, राज्य महिला आयोग

## निवडणुकीवेळी जाहिरात... सत्ता येताच विश्वासघात?

(पान १ वरून) मुलाखत समाजमाध्यमांमध्ये प्रसृत केली गेली. ज्या रोहितला पुढे करून सरकारने स्वतःची पाठ थोपटून घेतली होती. मात्र आता यादी २०२४-२५ची आहे आणि रोहित जानेवारी २०२५मध्ये उत्तीर्ण झाल्याने त्याला लाभ देता येणार नसल्याचे ओबीसी विभागाच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. यादीत नाव आल्यामुळे रोहितने शिक्षणासाठी ५० लाखांचे कर्ज काढले आणि बर्मिंगहॅम विद्यापीठात गेला. मात्र आता अपात्र ठरल्याने त्याच्यासमोर गंभीर समस्या उभी राहिली आहे. यासंदर्भात इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या प्रधान सचिव विनीता वेद सिंगल यांनी याप्रकरणी सविस्तर माहिती घेऊन प्रतिक्रिया देणार असल्याचे ‘लोकसत्ता’ला सांगितले.

> विद्यार्थ्यांवर अन्याय होणार नाही. विभागाकडून माहिती तपासून योग्य कार्यवाही केली जाईल.
> **- अतुल सावे,** मंत्री, इतर बहुजन कल्याण

## कृषी उपाय योजनांसाठी उमेशचंद्र सारंगी यांची समिती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई** : शेतकऱ्यांना कृषी विषयक सल्ला, मार्गदर्शन, प्रशिक्षण, तंत्रज्ञानाबाबतची माहिती, निर्यात वृद्धी, विविध कृषी योजना आणि हवामान बदलाच्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी निवृत्त सनदी अधिकारी उमेशचंद्र सारंगी यांची एक सदस्यीय समिती स्थापन करण्यात येणार आहे.

सारंगी यांची समिती पीक उत्पादन, खत व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापनाबाबत सल्ला, अधिकारी, कर्मचाऱ्यांची क्षमता बांधणी तसेच इतर अनेक बाबींवर मार्गदर्शन करणार आहे. समितीचा कार्यकाळ चार महिने असून, त्यासाठी सहा लाख रुपये मानधन दिले जाणार आहे.

## ‘व्हिट्स’ व्यवहारातून शिरसाटपुत्राची माघार?

(पान १ वरून) माणसाला पुढे जाऊ न देणाऱ्या नेत्यांना त्याची किंमत चुकवावी लागेल,’’ अशा शब्दांत शिरसाट यांनी तोफ डागली. व्यवहारातून माघार घेण्याच्या शिरसाट यांच्या विधानाबाबत छत्रपती संभाजीनगरचे उपविभागीय अधिकारी व्यंकट राठोड यांच्याकडे विचारणा केली असता अद्याप कोणताही पत्रव्यवहार झालेला नसल्याचे ते म्हणाले. लिलाव घेण्यासाठी सर्वाधिक बोली लावणाऱ्यांना २५ टक्के रक्कम भरण्यासाठी २० जूनपर्यंत मुदत आहे. ती रक्कम भरली नाही लिलाव आपोआप रद्द होईल. मात्र बोली लावताना भरलेली २० लाख रुपयांची अनामत रक्कम मात्र जप्त होईल, असे राठोड यांनी स्पष्ट केले.

### संजय शिरसाट ‘लक्ष्य’

- ‘सिद्धांत साहित्य खरेदी व पुरवठा’बाबतचे वृत्त ‘लोकसत्ता’मध्ये प्रकाशित झाल्यानंतर हे प्रकरण उजेडात आले. व्यवहारात सर्वाधिक बोली लावणारे सिद्धांत हे आपले पुत्र असल्याची कबुलीही संजय शिरसाट यांनी दिली.
- नंतर या वादात उडी घेत अंबादास दानवे यांनी नवे आरोप केले. ज्या नावाने लिलावात भाग घेतला होता त्यांची नोंदणीच तीन वर्षांपूर्वी झाली आहे. त्यांची पत तपासली गेली नाही. लिलावाची जाहिरात राज्यस्तरीय दैनिकात प्रकाशित केली गेली नसल्याचे दानवे यांचे म्हणणे आहे. संजय राऊत यांनीही शिरसाट यांना लक्ष्य केले होते.

## चावडी

### रुमालाची भीती कोणाला?

**रायगडमध्ये सध्या** रुमालावरून राजकारण तापले आहे. शिवसेना शिंदे गटाचे नेते भरत गोगावले व रायगडचे खासदार तथा राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यातील विस्तव जात नाही. गोगावले यांचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या महाडमध्ये तटकरे यांनी खांद्यावर रुमाल टाकून त्यांची नक्कल केली. हाच धागा पकडून राष्ट्रवादीची सभा झाली त्याच मैदानात दोन दिवसांपूर्वी गोगावले यांनी सभा घेतली व उपस्थितांना रुमालांचे वाटप केले. गोगावले यांचे आगमन होताच रुमाल उंचावून त्यांचे स्वागत करण्यात आले. ‘गोगावले यांच्या रुमालाची तुम्हाला भीती किती’, अशा घोषणा तटकरेंना उद्देशून देण्यात आल्या. त्यामुळे महायुतीमधील या दोन नेत्यांमधील ‘रुमाला’चे राजकारण किती ताणले जाते, याकडे लक्ष लागले आहे.

### साखर संकुलातील ‘गोडवा’



**दोन्ही राष्ट्रवादी** काँग्रेस एकत्र येणार का, येणार असतील तर कधी, याची उत्सुकता आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार एकाच व्यासपीठावर दिसले, की एकीकरणाच्या चर्चांना उधाण येते. पुण्यातील साखर संकुल हे ठिकाण या चर्चेसाठी परवलीचे झाले आहे. त्या मागील कारण असे, की उसाच्या लागवडीमध्ये कृत्रिम प्रज्ञेचा (एआय) वापर कसा करता येईल, यासाठी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट (व्हीएसआय) आणि बारामती ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट यांच्यात करार झाला . या दोन्ही संस्थांशी शरद पवार आणि अजित पवार यांचा संबंध असल्याने दोघेही याबाबतच्या बैठकांना उपस्थित राहात आहेत. दोघे अनेक कार्यक्रमांच्या निमित्ताने एकाच व्यासपीठावर दिसले आहेत. ‘व्हीएसआय’ची वार्षिक सभा, रयत शिक्षण संस्था, अजित पवार यांचे चिरंजीव जय पवार यांचा साखरपुडा आदी मोजके प्रसंग आहेत. मात्र, साखर संकुलमधील बैठकांची विशेष चर्चा होते.

### अजितदादांचे जहाज बुडणार की?

**दोन्ही राष्ट्रवादी** काँग्रेसचे एकत्रिकरण होणार असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू असताना दोन्ही पक्षांचे नेते तशी शक्यता नाकारत आहेत किंवा त्याबद्दल माहीत नसल्याचे सांगत आहेत. राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे युवा नेते, आमदार रोहित पवार यांनीही तशीच प्रतिक्रिया देताना, आपले चुलते, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पक्षाला सावधानतेचा इशारा दिला आहे. अजित पवार पक्षाचे जहाज जेवढ्या क्षमतेचे आहे, प्रत्यक्षात त्यापेक्षा जास्त प्रमाणात माणसे बसली आहेत. भले या पक्षात जाणाऱ्या माणसांचा हेतू कोणता का असेना किंवा बहुसंख्य माणसे शरद पवार यांच्या पक्षातून गेलेली असोत, पण अजित पवारांच्या पक्षाचे जहाज क्षमतेपेक्षा दुप्पट माणसांनी टंब भरले आहे. त्यामुळे हे जहाज पुढच्या वाटचालीत कोणत्याही क्षणी माणसांचा भार न पेलता हेलकावे खाण्याची आणि पाण्यात बुडण्याची शक्यता वाटते. रोहित पवार यांनी दिलेला हा इशारा अगदी सहज म्हणायचा की त्याचा आणखी काही वेगळा अन्वयार्थ असू शकतो, हे दोघांनाच ठाऊक.

(**संकलन :** हर्षद कशाळकर, सुजित तांबडे, एजाज हुसेन मुजावर)

# करोनाबाबत राज्याचे दक्षतेचे पाऊल

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**पुणे** : देशभरात करोना संसर्गामध्ये वाढ होत असून, महाराष्ट्रातही रुग्णसंख्येतील वाढ कायम आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. या मार्गदर्शक सूचनांच्या कार्यवाहीचे पाऊल राज्याच्या आरोग्य विभागाने उचलले असून, वृद्ध, सहव्याधीग्रस्त आणि रोगप्रतिकारशक्ती कमी असलेल्या व्यक्तींनी गर्दीच्या ठिकाणी मुखपट्टी वापरावी, असे आवाहन केले आहे. याचबरोबर आरोग्य यंत्रणांच्या सज्जतेचा आढावा घेण्यासही सुरुवात केली आहे.

**करोना संसर्गाच्या वाढीच्या पार्श्वभूमीवर केंद्राने मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या . त्यांची कार्यवाही राज्य आरोग्य विभागाकडून सुरू करण्यात आली आहे .**

### तयारीचा आढावा घेण्याचे निर्देश

जिल्हा, उपजिल्हा पातळीवर तसेच वैद्यकीय महाविद्यालये, तृतीय सेवा संस्था, महापालिका व नगरपालिकांची रुग्णालये आणि इतर सर्व आंतररुग्ण सेवांतील रुग्णालयांच्या तयारीचा आढावा घेण्याचे निर्देश आरोग्य विभागाने दिले आहेत. रोगनिदान, आवश्यक औषधे, पीपीई कीट, विलगीकरण रुग्णशय्या, वैद्यकीय ऑक्सिजन, अतिदक्षता विभाग आणि व्हेंटिलेटर रुग्णशय्या यांची पुरेशी उपलब्धता ठेवण्याची सूचना देण्यात आली आहे. कृत्रिम ऑक्सिजन प्रकल्पांची सज्जता तपासण्यासाठी प्रात्यक्षिके घेण्यासही सांगण्यात आले आहे. याबाबतचा अहवाल सर्व वैद्यकीय सेवांना तातडीने आरोग्य विभागाला सादर करावा लागणार आहे.

### सरकारच्या सूचना

- सर्व श्वसन रुग्णांवर बारकाईने लक्ष ठेवणे, श्वसन रुग्णांचे सर्वेक्षण करणे.
- श्वसन रुग्णांपैकी ५ टक्के नमुने तपासणीसाठी पाठविणे.
- पॉझिटिव्ह रुग्णांचे नमुने जनुकीय क्रमनिर्धारणासाठी पाठविणे.
- व्यक्तिगत स्वच्छतेबाबत जनजागृती मोहीम राबविणे.
- वृद्ध आणि रोग-प्रतिकारशक्ती कमी असलेल्यांनी गर्दीच्या ठिकाणी मुखपट्टी वापरावी.

आरोग्य सचिव निपुण विनायक आणि वीरेंद्र सिंह यांनी याबाबतचे पत्र सर्व जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त आणि जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सोमवारी पाठविले. ‘देशाच्या काही भागांत करोना संसर्गामध्ये वाढ दिसून येत आहे.ओमिक्रॉनचे उपप्रकार जेन-१, एक्सएफजी आणि एलएफ ७.९ हे रुग्णसंख्या वाढीस कारणीभूत ठरत आहेत. रुग्णांमध्ये ताप, खोकला आणि घसा खवखवणे यासारखी



लक्षणे दिसून येत आहेत.

देशातील सक्रिय करोना रुग्णांपैकी ९० टक्के रुग्ण सहा राज्यांमध्ये आहेत. त्यात केरळ, महाराष्ट्र, दिल्ली, गुजरात, तमिळनाडू आणि कर्नाटकचा समावेश आहे. राज्यात सध्या ५०६ सक्रिय रुग्ण असून, मुंबईत सर्वाधिक रुग्ण आहेत. त्यामुळे केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांची कार्यवाही करण्यात येणार आहे,’ असे या पत्रात म्हटले आहे.

# संक्षिप्त

## राष्ट्रवादीला राष्ट्रीय दर्जा मिळविण्याच्या प्रयत्नांना खीळ

**मुंबई :** नागालँडमधील राष्ट्रवादी काँग्रेसच्या सातही आमदारांनी तेथील सत्ताधारी 'एनडीपीपी' पक्षात प्रवेश केल्याने राष्ट्रवादी काँग्रेसला राष्ट्रीय दर्जा मिळविण्याच्या उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या प्रयत्नांना खीळ बसली आहे. शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील एकत्रित राष्ट्रवादी काँग्रेसला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा होता. दोन वर्षांपूर्वी निवडणूक आयोगाने राष्ट्रवादीचा राष्ट्रीय दर्जा काढून घेतला होता. महाराष्ट्रापाठोपाठ नागालँडमध्ये पक्षाच्या आमदारांचे संख्याबळ चांगले होते. पण सर्व आमदारांनी दोन दिवसांपूर्वी सत्ताधारी 'एनडीपीपी' पक्षात प्रवेश केला. यामुळे नागालॅण्डमधील पक्षाचे अस्तित्वच धोक्यात आले आहे.

## छत्तीसगडमध्ये १६ नक्षलवादी शरण

**सुकमा :** छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात सोळा नक्षलवाद्यांनी सोमवारी सीआरपीएफ आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसमोर शरणागती पत्करली अशी माहिती पोलिसांनी दिली. यापैकी सहा जणांवर एकूण २५ लाख रुपयांचे बक्षीस होते. यामुळे आता सुकमा जिल्ह्यातील केर्लापेंदा हे गाव नक्षलमुक्त झाल्याचा दावाही पोलिसांनी केला. त्यामुळे हे गाव आता राज्य सरकारच्या नवीन योजनेनुसार विकास प्रकल्पांसाठी एक कोटी रुपयांचा निधी मिळवण्यास प्राप्त झाले आहे असे अधिकाऱ्यांनी सांगितले. शरण आलेल्या सोळा नक्षलवाद्यांपैकी नऊ जण केर्लापेंदा गावातील होते.

## अपंग विद्यार्थ्यांवर अत्याचार, एकाला अटक

**डेहराडून :** उत्तराखंडच्या डेहराडून येथील एका शाळेतील कर्मचाऱ्याला दोन अल्पवयीन अपंग विद्यार्थ्यांवर लैंगिक अत्याचार आणि मारहाण केल्याप्रकरणी अटक करण्यात आली. या मुलांच्या आईने तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत मुलांना वैद्यकीय तपासणीसाठी पाठवले आणि बालकल्याण समितीला या प्रकरणाची माहिती दिली. शाळेतील सीसीटीव्ही चित्रीकरण आणि अन्य पुरावे ताब्यात घेण्यात आले आहेत. आरोपी मूळचा उत्तर प्रदेशातील गाझीपूरचा रहिवासी आहे. त्याच्याविरोधात पोक्सोंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

## 'करोना महासाथीचा धोका कायम'

**नवी दिल्ली :** करोना महासाथ अजून संपलेली नाही, असे निरीक्षण दिल्ली उच्च न्यायालयाने नोंदवले असून नमुने संकलनासाठी केंद्राची तयारी, वाहतूक धोरण यांबाबत तपशील मागितले आहेत. करोना नियंत्रणासाठी उचलण्यात येणारी पावले आणि लागू केली जाणारी नियमावली यांबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती दिली पाहिजे, असे न्यायाधीश गिरीश कठपालिया यांनी सागितले. करोना महासाथ अजून समुदायामध्ये सक्रिय आहे, असे हे निर्देश देताना न्यायालयाने नमूद केले.

## 'शर्मिष्ठाला कायदेशीर प्रक्रियेनंतरच अटक'

**कोलकाता :** 'ऑपरेशन सिंदूर'नंतर समाजमाध्यमावर आक्षेपार्ह पोस्ट केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या शर्मिष्ठा पलोनी या २२ वर्षीय विद्यार्थिनीला सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून अटक करण्यात आली आहे असे कोलकाता पोलिसांनी सोमवारी सांगितले. शर्मिष्ठाला बेकायदा अटक करण्यात आल्याचा आरोप केला जात आहे. शर्मिष्ठाने धार्मिक दुही निर्माण करणारी ध्वनिचित्रफित प्रसिद्ध केल्यामुळे तिच्यावर कारवाई करण्यात आल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. तिला न्यायालयाने १३ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी दिली आहे.

# ईशान्य भारतात पुराचे ३४ बळी




**वृत्तसंस्था, गुवाहाटी**

**ईशान्य भारतामधील** आसाम, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, त्रिपुरा, मेघालय, सिक्कीम इत्यादी राज्यांना मुसळधार पावसाचा जोरदार फटका बसला आहे. गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे घडलेल्या पूर आणि भूस्खलनाच्या निरनिराळ्या घटनांमध्ये सर्व मिळून ३४ जणांचा मृत्यू झाला आहे अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

आसाममधील पूरस्थिती सोमवारीही गंभीर असून आतापर्यंत पावसाशी संबंधित विविध ठिकाणी पूर आणि भूस्खलन या घटनांमध्ये मृतांचा आकडा १०पर्यंत गेला आहे अशी माहिती तेथील अधिकाऱ्यांनी दिली. काचर आण श्रीभूमी जिल्ह्यामध्ये रविवारी रात्री मुसळधार पावसाने आणखी दोन व्यक्तींचा मृत्यू झाला असे आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून सांगण्यात आले.

राज्यातील अनेक भागांमध्ये पाण्याची पातळी वाढत असून १५ जिल्ह्यांमधील जवळपास चार लाख लोकांना त्याचा फटका बसला आहे. गुवाहाटीमधील हवामान विभागाच्या प्रादेशिक केंद्राने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात जवळपास सर्वत्र मध्यम, काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याचा आणि तुरळक ठिकाणी अतिवृष्टी होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

ब्रह्मपुत्रा, धानसिरी, कोपिली, बराक, कुशियारा आणि कटखल या नद्या काही ठिकाणी धोक्याच्या पातळीवरून वाहत आहेत.

## अरुणाचलमध्येही १० मृत्युमुखी

इटानगर : अरुणाचल प्रदेशातही सोमवारी संततधार होती. लोहित जिल्ह्यामध्ये पावसामुळे आणखी एकाचा मृत्यू झाला असून राज्यात पूर आणि भूस्खलनामुळे मरण पावलेल्यांची संख्या १०पर्यंत पोहोचली आहे अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. राज्याच्या आपत्कालीन प्रचालन केंद्राने दिलेल्या मागितीनुसार, २३ जिल्ह्यांमधील ९३८ लोकांना पुराचा फटका बसला आहे. तसेच राज्यातील अनेक नद्या धोक्याच्या पातळीवरून वाहत आहेत.

## मणिपूरमध्ये हजारो घरांचे नुकसान

इम्फाळ : मणिपूरमध्ये गेल्या चार दिवसांपासून सातत्याने पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे अनेक नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली असून १९ हजारांपेक्षा जास्त लोकांना पुराचा फटका बसला आहे अशी माहिती अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली. गेल्या चार दिवसांमध्ये राज्यात निरनिराळ्या ठिकाणी भूस्खलनाच्या ४७ घटना घडल्या आहेत. राज्यभरात एकूण ३,३६५ घरांचे नुकसान झाले आहे. एकूण ३१ मदत शिबिरे सुरू करण्यात आली आहेत. इम्फाळ शहराचा बराचसा भाग पुराच्या पाण्याखाली गेला आहे.



## तीन सैनिकांचा मृत्यू

गंगटोक : सिक्कीममधील छातेन येथे लष्करी छावणीवर भूस्खलन होऊन तीन सैनिकांचा मृत्यू झाला आणि सहा अन्य बेपत्ता झाले अशी माहिती संरक्षण अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली. मुसळधार पावसामुळे मांगन जिल्ह्यातील लाचेन गावाजवळ रविवारी संध्याकाळी सातच्या सुमाराला हे भूस्खलन झाले असे सांगण्यात आले. हवालदार लखविंदर सिंग, लान्स नायक मनिष ठाकूर आणि अभिषेक लखाडा अशी मृत सैनिकांची नावे आहेत. त्याशिवाय चार जणांची सुटका करण्यात यश आले असून त्यांना किरकोळ जखमा झाल्या आहेत.

## १०० पर्यटकांची सुटका

गंगटोक : उत्तर सिक्कीममधील लाचुंग येथे अडकलेल्या १८ पर्यटक वाहनांची सुटका करण्यात यश आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली. या वाहनांमधून १००पेक्षा जास्त पर्यटक प्रवास करत होते. आता ते लोअर झोंगुमधील फिडांग येथे पोहोचले आहेत. तेथून त्यांना गंगटोकला पाठवले जात आहे. स्थानिक प्रशासन, पोलीस, सैन्य, बीआरओ, आयटीबीपी, वन विभाग, वाहनचालकांची संघटना इत्यादींनी या बचावकार्यात सहभाग घेतला. या भागात एक हजारांपेक्षा जास्त पर्यटक अडकल्यानंतर हे बचावकार्य हाती घेण्यात आले.



२०१६मध्ये भाजपने पूरमुक्त आसामची घोषणा केली होती. २०२२मध्ये अमित शहा यांनी त्या आश्वासनाचा पुनरुच्चार केला होता. तथाकथित 'स्मार्ट सिटी' असलेल्या गुवाहाटीची दृश्ये पाहता, पंतप्रधान मोदी आणि त्यांच्या डबल इंजिन सरकारने आसामचा कसा विश्वासघात केला आहे त्याची आठवण येते. – **मल्लिकार्जुन खरगे,** अध्यक्ष, काँग्रेस




मलेशियामध्ये संयुक्त जनता दलाचे खासदार संजय कुमार झा यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय शिष्टमंडळाने मलेशियाच्या 'डेमोक्रॅटिक अ‍ॅक्शन पार्टी'च्या प्रतिनिधींची भेट घेतली.

# 'पाणी, रक्त एकत्र वाहू शकत नाही'

### सर्वपक्षीय शिष्टमंडळाची मलेशियात भूमिका

**पीटीआय, क्वालालंपूर**

**भारतात कोणत्याही** प्रकारच्या दहशतवादाला थारा दिला जाणार नाही. त्याचबरोबर पाणी आणि रक्त एकत्र वाहूच शकत नसल्याची स्पष्टोक्ती 'ऑपरेशन सिंदूर'बाबत भारताची बाजू मांडण्यासाठी मलेशियाला भेट देणाऱ्या सर्वपक्षीय संसदीय शिष्टमंडळाने केली.

मलेशियातील भारतीय दूतावासाने 'एक्स'वरील संदेशात म्हटले की, संयुक्त जनता दलाचे खासदार संजय कुमार झा यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मलेशियातील पंतप्रधान विभागातील उपमंत्री (कायदा आणि संस्थात्मक सुधारणा) वायबी एम. कुला सेगरन आणि मलेशियातील पार्टी केडिलन राक्यात यांच्या नेतृत्वाखालील डेमोक्रॅटिक अ‍ॅक्शन पार्टीच्या प्रतिनिधींची भेट घेतली. त्यांना दहशतवादाविरुद्ध भारताचा दृष्टिकोन आणि राष्ट्रीय दृढनिश्चय या वेळी कथन करण्यात आला.

**सुरक्षित जगाचा संकल्प**

**माद्रिद :** 'द्रमुक' पक्षाच्या खासदार कनिमोळी करुणानिधी यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय शिष्टमंडळाने सोमवारी स्पेनला भेट दिली. या वेळी स्पेनमधील दहशतवाद पीडितांच्या संघटनांशी झालेल्या बैठकीत 'सुरक्षित' जगासाठी भारताच्या संकल्पाचा पुनरुच्चार करण्यात आला. '४,८०० दहशतवादग्रस्तांबरोबर असलेली संघटना 'असोसिएशन डे व्हिक्टिमास डेल टेररिझमो'च्या वतीने सर्वपक्षीय शिष्टमंडळाबरोबर बैठक आयोजित केली.

ऑपरेशन सिंदूर'बाबत जगापर्यंत भारताचा संदेश पोहोचवण्यासाठी शिष्टमंडळे तैनात असताना, देशातूनच राजकीय निष्ठेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे दुःखद आहे. देशभक्त असणे इतके कठीण आहे का?' – **सलमान खुर्शीद,** नेते, काँग्रेस

## राजकीय निष्ठेस लक्ष्य करणे दुःखद - खुर्शीद

**नवी दिल्ली :** विविध देशांमध्ये सर्वपक्षीय खासदारांचे शिष्टमंडळ जागतिक दहशतवादाला तोंड देण्यासाठी प्रयत्न करीत असताना, भारतात या प्रयत्नांमध्ये होत असलेल्या राजकीय विभाजनावर काँग्रेस नेते सलमान खुर्शीद यांनी सोमवारी चिंता व्यक्त केली. सर्वपक्षीय शिष्टमंडळामध्ये खुर्शीदही सहभागी आहेत.

## पाकिस्तानचेही शिष्टमंडळ

**इस्लामाबाद :** भारताबरोबर झालेल्या लष्करी संघर्षानंतर जगभरातून पाठिंबा मिळवण्यासाठी पाकिस्तानचे उच्चस्तरीय शिष्टमंडळ सोमवारी रवाना झाले. पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या सूचनेवरून तयार करण्यात आलेल्या या शिष्टमंडळात हिना रब्बानी खार आणि खुर्रम दस्तगीर खान या माजी परराष्ट्रमंत्र्यांसह नऊ सदस्यांचा समावेश आहे. हे शिष्टमंडळ न्यूयॉर्क, वॉशिंग्टन डीसी, लंडन आणि ब्रसेल्स या महत्त्वाच्या शहरांना भेट देणार आहे. या दौऱ्यात संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस, सुरक्षा परिषदेच्या १५ सदस्य देशांपैकी १४ देशांचे राजदूत यांची भेट घेतली जाणार आहे.

# पंतप्रधान 'जी-७'साठी न जाण्याची शक्यता

**पीटीआय, नवी दिल्ली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी जूनच्या तिसऱ्या आठवड्यात कॅनडामध्ये होणाऱ्या 'जी-७' शिखर परिषदेला उपस्थित राहण्याची शक्यता नाही असे या प्रकरणाची माहिती असलेल्यांनी सोमवारी सांगितले. पंतप्रधान मोदी आतापर्यंत पाच वेळा 'जी-७' शिखर परिषदेला हजर राहिले आहेत. यापूर्वी ते गेल्या वर्षी जूनमध्ये इटलीत, २०२३मध्ये जपानमध्ये आणि २०२२मध्ये जर्मनीतील जी-७ शिखर परिषदेला हजर राहण्यासाठी गेले होते.

कॅनडामध्ये १५ ते १७ जून यादरम्यान ही शिखर परिषद होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कॅनडाने अद्याप भारताला परिषदेचे आमंत्रण पाठवलेले नाही. मात्र, या प्रकरणाची माहिती असलेल्या व्यक्तींनी सांगितले की पंतप्रधान मोदी तसेही कॅनडाला जाणार नव्हते. गेल्या काही वर्षांमध्ये भारत



आणि कॅनडादरम्यान तणाव वाढला आहे. त्या पार्श्वभूमीवर परिषदेला हजर राहण्यासाठी बरीच तयारी करावी लागणार होती, तशी ती झालेली नाही. या शिखर परिषदेत युद्धांच्या पार्श्वभूमीवर जागतिक आव्हानांवर चर्चा होणार आहे.

कॅनडाचे माजी पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी २०२३मध्ये भारतावर फुटीरवादी हरदीप सिंग निज्जरच्या हत्येमध्ये भारताचा हात असल्याचा आरोप केला होता. त्यानंतर दोन्ही देशांदरम्यानचे संबंध दुरावले होते. विद्यमान पंतप्रधान मार्क कार्नी यांनी दोन्ही देशांदरम्यानचे संबंध सुधारण्यावर भर देत असल्याचे जाहीर केले आहे.

# हल्ल्याचे दीड वर्षापासून नियोजन

### रशियावरील हल्ल्यानंतर झेलेन्स्की यांचे युक्रेनवासीयांना उद्देशून भाषण

**वृत्तसंस्था, कीव्ह**

**युक्रेनने रशियाची** ४१ विमाने हल्ला करून नष्ट केल्याच्या मोहिमेला 'हुशारीने केलेली मोहीम' असे युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी म्हटले आहे. या मोहिमेतून रशियातील केवळ लष्करी लक्ष्य भेदण्यात आल्याचेही ते म्हणाले. दीड वर्षापासून या हल्ल्याचे नियोजन सुरू होते, अशी माहिती झेलेन्स्की यांनी दिली.

रशियावरील असा हल्ला निश्चितच योग्य असून, ते त्यास पात्रच आहेत, असे झेलेन्स्की म्हणाले. झेलेन्स्की यांनी रविवारी देशाला उद्देशून भाषण केले. त्यात त्यांनी रशियावरील हल्ल्याबाबत लष्कराचे अभिनंदन केले. ते म्हणाले, ''या मोहिमेत ११७ ड्रोनचा वापर करण्यात आला. हवाई तळांवर ठेवण्यात आलेली ३४ टक्के क्रूज क्षेपणास्त्रे उडविण्यात आली. रशियाच्या विविध भागांत ही मोहीम राबविली गेली,'' असे ते म्हणाले.



दीड वर्षांपूर्वी मी ज्या मोहिमेला मान्यता दिली होती, ती अखेर यशस्वी झाली. लष्करी मोहिमेपूर्वी रशिया युक्रेनवर मोठ्या हल्ल्याच्या तयारीत असल्याचे गुप्तचरांकडून आलेली माहिती होती. लोकांनी हवाई हल्ल्याच्या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष करू नये. – **वोलोदिमिर झेलेन्स्की,** अध्यक्ष, युक्रेन

## इस्तंबुलमध्ये शांतता चर्चा

इस्तंबुल : रशिया आणि युक्रेनचे शिष्टमंडळ शांततेच्या चर्चेसाठी तुर्कीमध्ये सोमवारी भेटले. दोन आठवड्यांतील चर्चेची ही दुसरी फेरी आहे. रशियाच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांचे सल्लागार व्लादिमिर मेदिन्स्की यांनी केले तर युक्रेनच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व संरक्षणमंत्री रुस्तम उमेरोव्ह यांच्याकडे होते. युक्रेनने रविवारी रशियाची विमाने मोठ्या प्रमाणावर नष्ट केल्यामुळे या चर्चेतून काही ठोस निष्पत्ती होण्याची शक्यता कमी आहे. चर्चेची पहिली फेरी १६ मे रोजी पार पडली होती. यावेळी तुर्कीचे परराष्ट्र मंत्री हकान फिदान तुर्की, लष्करप्रमुख मेटिन गुरक आणि गुप्तचर संस्थेचे प्रमुख इब्राहिम कालिन हेही उपस्थित होते.

## 'पुतिन नव्या हल्ल्याच्या तयारीत'

पॅरिस : एकीकडे शांततेबाबत चर्चा करीत असताना रशियाचे अध्यक्ष पुतिन युक्रेनमध्ये नवी लष्करी आघाडी उघडण्याची तयारी करीत आहेत, असा इशारा अमेरिकेच्या दोन सिनेटरनी दिला. पुढील दोन आठवडे युद्धाची पुढील दिशा ठरवतील, असे ते म्हणाले. रिपब्लिकन पक्षाचे सिनेटर लिंडसे ग्रॅहम आणि डेमोक्रॅटिक पक्षाचे सिनेटर रिचार्ड ब्लुमेंथल यांनी हा इशारा दिला.

# कॅरोल नारॉकी पोलंडच्या अध्यक्षपदी

### चुरशीच्या लढतीत उदारमतवादी उमेदवाराचा पराभव

**एपी, वॉरसॉ**

**पोलंडच्या अध्यक्षपदाच्या** चुरशीत उजव्या गटाच्या कॅरोल नारॉकी यांनी बाजी मारली. अत्यंत चुरशीच्या झालेल्या लढतीत त्यांना ५०.८९ टक्के मते मिळाली. उदारमतवादी गटाचे रफाल झाकोव्स्की यांना ४९.११ टक्के मते मिळाली. नारॉकी यांच्या विजयामुळे पोलंड अधिक राष्ट्रवादी आणि लोकानुनयी मार्गावरून जाण्याची शक्यता आहे. नारॉकी यांना अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पाठिंबा दिला होता.

कलचाचणीत झाकोव्स्की विजयी ठरतील, असे सांगितले गेले होते. झाकोव्स्की यांनी पराभव मान्य करून नारॉकी यांचे अभिनंदन केले आहे. आपल्याला दिलेल्या मतांबद्दल त्यांनी मतदारांचे आभार मानले. युक्रेनचे अध्यक्ष झेल्येन्स्की,



हंगेरी, युरोपीय संघाचे अध्यक्षांसह इतर अनेक देशांच्या प्रतिनिधींनी नारॉकी यांचे अभिनंदन केले. प्रादेशिक आणि युरोपीय सुरक्षेसंदर्भात पोलंड हा स्तंभासारखा असून, जागतिक स्पर्धेत युरोपला आपण अधिक मजबूत करू, असे झेल्येन्स्की म्हणाले.

नारॉकी हे मुष्टियोद्धा आणि इतिहासकार आहेत. लॉ अँड जस्टिस पार्टीने त्यांना नवी सुरुवात करून दिली. २०१५ ते २०२३ या काळात हा पक्ष पोलंडमध्ये सत्तेत होता.

# भारतीय वंशाच्या विद्यार्थिनीवर कारवाई

**पीटीआय, न्यूयॉर्क**

**'मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट** ऑफ टेक्नॉलॉजी' (एमआयटी) येथील भारतीय-अमेरिकी विद्यार्थिनीला पदवीप्रदान कार्यक्रमात उपस्थित राहण्यास मनाई करण्यात आली. गाझा येथे सुरू असलेल्या युद्धाचा निषेध केल्यामुळे ही कारवाई करण्यात आल्याचे वृत्त माध्यमांनी दिले आहे.

मेघा वेमुरी असे या विद्यार्थिनीचे नाव आहे. वेमुरीने सांगितले, ''मी केलेल्या भाषणानंतर मला विद्यापीठाच्या वरिष्ठ नेतृत्वाने शुक्रवारी होणाऱ्या पदवीप्रदान सोहळ्याला उपस्थित राहता येणार



नसल्याचे सांगितले. तसेच, पदवीप्रदान कार्यक्रम होईपर्यंत विद्यापीठ परिसरात येण्यास मनाई केली आहे.''

'एमआयटी' प्रशासनाने वेमुरीवर करण्यात आलेल्या कारवाईला दुजोरा दिला आहे. 'एमआयटी'चे प्रवक्त्यांनी निवेदनात म्हटले आहे, ''आमचा अभिव्यक्ती स्वातंत्र्याला पाठिंबा आहे. मात्र, कारवाईबाबत आपण ठाम आहोत.'' तिला पदवी दिली जाईल, असे विद्यापीठ प्रशासनाने सांगितले.

**पॅलेस्टिनींच्या बाजूने घोषणा देऊन जमावावर हल्ला, ८ जखमी**

**बोल्डर :** पॅलेस्टिन मुक्त करा, अशी घोषणा देऊन मोहमद सॅब्रे सोलिमन या व्यक्तीने कोलोरॅडो येथे आगीचा मारा करणारे यंत्र (फ्लेमथ्रोअर) जमावावर फेकले. यात ८ जण जखमी झाले. काहींना भाजण्याच्या जखमा झाला. हा जमाव गाझा पट्टीत इस्रायलमधील ओलिसांकडे लक्ष वेधण्यासाठी निदर्शने करत होता.

## चित्रपट प्रदर्शनासाठी हासन न्यायालयात

**बंगळुरू :** 'ठग लाईफ' हा चित्रपट कर्नाटकात सुरळीतपणे प्रदर्शित करण्यासाठी त्याला संरक्षण मिळावे अशी मागणी करत अभिनेता कमल हासन यांनी सोमवारी कर्नाटक उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला. कन्नड भाषेचा उदय तमिळ भाषेतून झाला आहे असे विधान हासन यांनी केल्यानंतर त्यांच्याविरोधात कर्नाटकात रोष निर्माण झाला आहे. हासन यांनी या विधानाबद्दल जाहीर माफी मागितली नाही तर हा चित्रपट राज्यात प्रदर्शित होऊ दिला जाणार नाही असा इशारा 'कर्नाटक फिल्म चेंबर ऑफ कॉमर्स'ने (केएफसीसी) अलिकडेच दिला आहे.

# अमेरिकेच्या कृतींचा चीनकडून निषेध

### व्यापारासंबंधी परस्पर घेतलेल्या निर्णयांना विरोध

**पीटीआय, बीजिंग**

**'अमेरिका-चीनमध्ये जीनिव्हा** येथे झालेल्या चर्चेत दोन्ही देशांत एकमत होऊन व्यापारयुद्धाला विराम मिळाला. मात्र, त्या वेळी ठरलेल्या बाबींचे अमेरिकेने उल्लंघन केले,' असा आरोप चीनने सोमवारी केला. 'एआय चिप निर्यात नियंत्रण मार्गदर्शक तत्त्वे' लागू करण्याबरोबरच चिपचे डिझाइन करणाऱ्या सॉफ्टवेअरची चीनला विक्री थांबविणे, अमेरिकेमधील चीनच्या विद्यार्थ्यांचे व्हिसा रद्द करणे या अमेरिकेच्या कृतींचा चीनने निषेध केला.

'जीनिव्हा येथे झालेल्या चीन-अमेरिका आर्थिक आणि व्यापारी चर्चेत अमेरिकेबरोबर जे ठरले होते, त्याला आता अमेरिकेने दुय्यम लेखले आहे. चीनवर विविध पातळ्यांवर मर्यादा पडतील अशा गोष्टी लादून अमेरिकेने ते सिद्ध केले आहे,' असा आरोप चीनच्या वाणिज्य मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी निवेदनात सांगितले आहे. चीननेच कराराचे उल्लंघन केल्याचा आरोप अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला होता. ट्रम्प यांच्या आरोपांचे चीनने खंडन केले आहे.

प्रवक्त्यांनी सांगितले, की अमेरिकेने एआय चिप निर्यात नियंत्रण मार्गदर्शक तत्त्वे' लागू केली आहेत. तसेच, चिपचे डिझाइन करणाऱ्या सॉफ्टवेअरची विक्री चीनला थांबविली आणि अमेरिकेमधील चीनच्या विद्यार्थ्यांचे व्हिसा रद्द करण्यासारख्या कृती केल्या आहेत. अमेरिकेने या कृती एकतर्फी केल्याचे चीनने म्हटले आहे.

काही चिनी विद्यार्थ्यांचे व्हिसा रद्द करण्यात येतील, अशी घोषणा परराष्ट्रमंत्री रुबिओ यांनी केल्यानंतर चीनच्या विद्यार्थ्यांसमोर संकट उभे राहिले आहे.

## लोकमानस

loksatta@expressindia.com

### परिस्थिती आव्हानात्मक, पण सुधारणा शक्य

**'का धरिला** परदेस…?' हा अग्रलेख (२ जून) वाचला. भारताने गेल्या काही दशकांत प्रगती केली असली, तरी जागतिक पातळीवर स्पर्धा करताना अजूनही काही मूलभूत प्रश्न उभे राहातात. भारताची अर्थव्यवस्था जगातील सर्वात वेगाने वाढणारी आहे, असा संदेश सातत्याने दिला जातो. पण त्याच वेळी असेही दिसून येते की, आपल्या देशात जन्मलेल्या, वाढलेल्या अनेक मोठ्या कंपन्यांची मुख्यालये परदेशात स्थलांतरित होत आहेत. यामुळे भारताला आर्थिक नुकसान तर होतेच, पण आपली बौद्धिक संपदा आणि रोजगारही देशाबाहेर जातो.

कदाचित यामागे काही व्यवहार्य कारणे असतील. उदाहरणार्थ गुंतवणूकदारांचा सहज मिळणारा पैसा, कर सवलती, सुलभ कायदे आणि अधिक स्थिर धोरणे. भारत स्टार्टअप्ससाठी गुंतवणूक मिळवणे आजही मोठे आव्हान आहे. सरकारी योजना असल्या तरी त्या प्रत्यक्षात किती सुलभ आहेत यावर प्रश्नचिन्ह आहे. वरून करप्रणालीचा गुंता, अधिकाऱ्यांची असंवेदनशीलता किंवा अनावश्यक लालफीतशाही उद्योजकांच्या ऊर्जेला मारक ठरते. भारतात गुंतवणुकीसाठी 'उद्योगस्नेही वातावरण' फक्त कागदोपत्री आहे. प्रत्यक्ष अनुभव वेगळा असतो. परिणामी आयआयटी, आयआयएमसारख्या दर्जेदार संस्थांमधून तयार झालेले विद्यार्थी देशाबाहेर स्थायिक होतात. या पार्श्वभूमीवर हेही लक्षात घेतले पाहिजे की भारतातही अनेक यशस्वी स्टार्टअप्स आणि उद्योग आहेत. म्हणजे परिस्थिती आव्हानात्मक असली, तरीही सारे काही अद्याप हाताबाहेर गेलेले नाही. ती खऱ्या अर्थाने उद्योगस्नेही ठरावी, यासाठी सरकार, समाज आणि गुंतवणूकदार यांना एकत्र येऊन व्यवस्थेतील अडथळे दूर करणे गरजेचे आहे.

■ **सुरज पेंदोर,** किनवट (नांदेड)

### हा उथळ पाण्याचा खळखळाट

**'का धरिला** परदेस…?' हा अग्रलेख (२ जून) वाचला. देशातील अर्थव्यवस्थेचे कच्चे धागे लपवून लोकांना दिवास्वप्ने दाखवण्याची सरकारी खोड जुनीच आहे. देशात होणाऱ्या परदेशी गुंतवणुकीची आकडेवारी दाखवताना देशातून परदेशांत जाणारी गुंतवणूकदेखील लोकांसमोर आणली पाहिजे. त्याची कारणमीमांसा करण्याऐवजी उत्सव साजरा करणे सशक्त लोकशाहीला मारक आहे. हा म्हणजे उथळ पाण्याला खळखळाट फार असा प्रकार आहे. सातत्याने लोकांना भ्रमात ठेवून देशाच्या अर्थव्यवस्थेचे खरे चित्र लपवणे योग्य नाही.

■ **वैभव पाटील,** घणसोली (नवी मुंबई)

### संभाव्य प्रश्नांचा अंदाज आला असावा

**'भाजपची 'सिंदूर'** पंचाईत; पण काँग्रेस?' हा 'लाल किल्ला'मधील लेख वाचला. पहलगाममध्ये सुरतच्या बँक अधिकाऱ्याची हत्या झाली. त्या अधिकाऱ्याच्या पत्नीला भेटण्यासाठी जलमंत्री एम. के. पाटील गेले असता अधिकाऱ्याच्या पत्नीने पाटलांवर प्रश्नांची सरबत्ती केली. 'मंत्र्यांना एवढा मोठा फौजफाटा असतो, तर पहलगामला हजारो पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस का नव्हते?' असा प्रश्न तिने केला. त्याचा व्हिडीओ सर्वत्र फिरला. त्या भगिनीने विचारलेला प्रश्न अनेकांच्या मनात असू शकतो. सीमा सुरक्षा दल, पोलीस, रॉ, सैन्यदल एवढी प्रचंड यंत्रणा कायम तयारीत असताना, असे निरपराध नागरिकांचे जीव अतिरेकी घेतात कसे? याची चौकशी करून दोषींना तुरुंगात पाठवणे गरजेचे आहे. सिंदूरवाटपाच्या वेळी अशा प्रश्नांना घरोघरी सामोरे जावे लागेल, याची जाणीव भाजपला झाली असावी आणि त्यामुळेच कदाचित सिंदूरवाटप थांबविण्यात आले असावे. लोकांच्या मनात धुमसत असलेल्या या प्रश्नांपेक्षा काँग्रेसला शशी थरूर यांचा शिष्टमंडळातील समावेश महत्त्वाचा वाटणे, अतिशय निराशजनक आहे.

■ **जयप्रकाश नारकर,** वसई

### विरोधक मूग गिळून गप्प का?

**'भाजपची 'सिंदूर'**पंचाईत; पण, काँग्रेस?' हा महेश सरलष्कर यांच्या 'लाल किल्ला' या सदरातील लेख वाचला. 'ऑपरेशन सिंदूर'ची यशोगाथा जगभरात पसरविणाऱ्या प्रचारकी थाटाआडून सत्तेची बिजे पेरण्याची व्यूहरचना मोठ्या शिताफीने केली जात आहे. खरे तर, ऑपरेशन सिंदूरचा डांगोरा पिटण्याची काहीच गरज नव्हती. या युद्धाचे वार्तांकन जगभरातील नागरिकांनी दृकश्राव्य माध्यमांवर पाहिले होतेच. आपल्यासाठी सोयीच्या विरोधकांना एका व्यासपीठावर आणून, गोडीगुलाबीने भाजपचा उदो उदो करण्याचे षड्यंत्र देशासाठी चिंताजनक आहे. राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे यांच्यासारख्या दिग्गज नेत्यांनीदेखील भाजपविरोधात राळ उठविण्याऐवजी पक्षांतर्गत राजकारणात अडकून पडणे भाजपच्या पथ्यावरच पडणारे आहे. दस्तुरखुद्द हवाई दलप्रमुखांच्या वक्तव्याबाबतही काँग्रेस आणि इतर विरोधक मूग गिळून गप्प का बसले आहेत, हे कळण्यास मार्ग नाही. संरक्षण दलांच्या प्रमुखांनी भारतीय लढाऊ विमाने पाकिस्तानने पाडल्याचा खुलासा केल्यावरही, सरकार मात्र त्याकडे हेतुपुरस्पर दुर्लक्ष करत आहे, हे सारेच चिंताजनक आहे. असे सारे घडत असताना काँग्रेस मात्र यामागचे वास्तव तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी, वास्तवाची जाणीव करून देण्यासाठी पावले उचलण्यास तयार नाही.

■ **डॉ. नूतनकुमार पाटणी,** चिकलठाणा (छत्रपती संभाजीनगर)

### ईडी, सीबीआय दखल घेतील?

**'तीन हजार** कोटी रुपये कुठे जाणार होते?' हा 'अन्वयार्थ' वाचला. अलीकडे अनेक प्रकरणांत ईडी, सीबीआय चौकशी होते. हा प्रश्न शासकीय निधीशी संबंधित आहे. याप्रकरणी ईडी, सीबीआय दखल घेऊन चौकशी करतील काय? दोषी आढळणाऱ्यांस तुरुंगवासाची कठोर शिक्षा ठोठावली जाईल का? या प्रकरणामुळे एमएमआरडीएच्या विश्वासार्हतेला तडा गेला आहे.

■ **कल्याण केळकर,** विरार

### भ्रष्टाचाराची चौकट अबाधितच!

**'तीन हजार** कोटी रुपये कुठे जाणार होते?' हा 'अन्वयार्थ' (२ जून) वाचला. मुंबईतील सरकारी प्रकल्पात मुंबईस्थित एलअँडटी या कंपनीला डावलून 'इलेक्टोरल बॉण्ड्स' विकत घेण्यात आघाडीवर असणाऱ्या हैदरबादस्थित मेघा इंजिनीअरिंग या कंपनीला हे कंत्राट देण्यात आले. वस्तुतः एल अँड टीची निविदा तीन हजार कोटी रुपयांनी कमी किमतीची होती. तरीही पुरेसे स्पष्टीकरण न देता तांत्रिक कारण सांगून एलअँडटीला या स्पर्धेतून बाहेर काढण्यात आले. ही बाब संशयास्पद होती. यात सरकारला सर्वोच्च न्यायालयाने फटकारले आणि ही निविदा रद्द करून पुन्हा नवीन निविदा काढण्यास एमएमआरडीएला भाग पाडले. त्यामुळे तडजोडीचे राजकारण करताना अनेक गैरप्रकार होतात हे सत्य उघडकीला आले. इलेक्टोरल बॉण्ड्स ही योजनाच सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवली ही बाब सर्वश्रुत आहे. 'न खाऊंगा न खाने दूंगा' ही भाजपप्रणीत सरकारची घोषणा ही 'बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात' असल्याची प्रचीती जनतेला आली आणि भ्रष्टाचाराची चौकट अबाधितच असल्याचे स्पष्ट झाले.

■ **डॉ. वि. हे. इनामदार,** पुणे

### राजकीय बेड्यांत अडकलेला आयोग

**'राज्य महिला** आयोग निष्क्रिय' (लोकसत्ता- २ जून) ही बातमी वाचली. ज्या उद्देशाने राज्य महिला आयोगाची स्थापना झाली होती- म्हणजे महिलांच्या हक्कांचे संरक्षण, अत्याचारांना वाचा फोडणे आणि महिलांवरील अन्यायाविरोधात स्वतंत्र आणि प्रभावी भूमिका बजावणे- त्याच उद्दिष्टांपासून आज महिला आयोग फारकत घेत असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येते.

अनेकदा महिला आयोगाकडून कार्यवाही करण्याऐवजी निवडक प्रकरणांवरच लक्ष केंद्रित केले जाते, तीही प्रस्थापित राजकीय हितसंबंधांशी सुसंगत असतील, तरच. ही भूमिका आयोगाच्या निष्पक्षतेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे करते. बऱ्याच वेळा महिला आयोगाचे अध्यक्ष किंवा सदस्य हे राजकीय पार्श्वभूमीचे असतात, त्यामुळे त्यांची कार्यपद्धती पक्षीय वळण घेते. त्यामुळे सामान्य महिलांच्या न्यायाच्या अपेक्षा पायदळी तुडवल्या जातात. महिला अत्याचाराच्या अनेक घटनांमध्ये आयोगाची प्रतिक्रिया उशिरा येते, तीही औपचारिकतेपुरती. विशेषतः सत्ताधारी पक्षाशी संबंधित घटना असतील, तर आयोगाचे मौन अधिक ठळकपणे दिसून येते. राजकीय हस्तक्षेपाच्या बेडीत अडकलेला महिला आयोग महिलांच्या न्यायासाठी लढण्याऐवजी, सत्ता टिकवण्यासाठी भूमिका घेत असेल, तर त्याच्या गरजेवरच प्रश्न निर्माण होते. अशा आयोगाकडून महिलांना न्याय मिळणार कसा?

■ **सागर पिंगळे,** पुणे

# गुंतवणुकीत महाराष्ट्र अव्वल!

**उद्धव ठाकरे यांनी विश्वासघात करत महाविकास आघाडी स्थापन केली आणि देवेंद्र फडणवीस यांनी सुरू केलेल्या अनेक विकास योजनांना स्थगिती देण्याचा सपाटा लावला. पण त्यांच्या या धोरणांना जनतेने विधानसभा निवडणुकीत सणसणीत चपराक लगावली. देशातील गुंतवणूकदारांना आवश्यक सुविधा त्वरेने देणारे सरकार सत्तेत असले तर काय घडते, हेच महायुती सरकारने दाखवून दिले आहे…**



पहिली बाजू

**केशव उपाध्ये**
प्रदेश मुख्य प्रवक्ते, भाजप



**महाराष्ट्रात २०२४-२५** या आर्थिक वर्षात एक लाख ६४ हजार ८७५ कोटी रुपये एवढी विक्रमी थेट विदेशी गुंतवणूक आली आहे. महाराष्ट्र थेट विदेश गुंतवणुकीत देशात पुन्हा अव्वल ठरला आहे. गेल्या तीन वर्षांत महायुती सरकारने घेतलेल्या निर्णयांवर, आखलेल्या धोरणांवर परदेशी गुंतवणूकदारांनी भरभरून विश्वास दाखविला असल्याचे यातून सिद्ध झाले आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात संपूर्ण देशात चार लाख २१ हजार ९२९ कोटी एवढी थेट विदेशी गुंतवणूक आली. त्यापैकी ४० टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात झाली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत थेट विदेशी गुंतवणुकीत थोडी थोडकी नव्हे तर ३२ टक्क्यांची घशघशीत वाढ झाली आहे. यापैकी जानेवारी ते मार्च २०२५ या अखेरच्या तिमाहीत २५ हजार ४४१ कोटींची गुंतवणूक महाराष्ट्रात झाली. गेल्या १० वर्षांतील सर्वाधिक विदेशी गुंतवणुकीचा नवा विक्रम महाराष्ट्राने केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कारकीर्दीतील हा अभिमानाचा क्षण आहे.

**तडफेने घोडदौड**

२०१४ पासून देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विकसित महाराष्ट्राची घोडदौड मोठ्या तडफेने सुरू झाली आहे. २०१४ ते २०१९ या पाच वर्षांच्या काळात महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाची पायाभरणी झाली. मेट्रो, समृद्धी महामार्ग, नदीजोड प्रकल्प, जलयुक्त शिवार यासारख्या अनेक प्रकल्पांतून राज्याच्या समृद्ध विकासाचे संकल्प चित्र रेखाटण्यात आले आहे. फक्त मुंबई महानगर क्षेत्रातील (एमएमआरडीए) ३३७ किलोमीटर लांबीच्या मेट्रोसाठी एक लाख ४८ हजार ३८० कोटी खर्चाचे प्रकल्प सुरू झाले आहेत. १९ हजार ६०० कोटी रुपये एवढ्या खर्चाचा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, ७६ हजार २२० कोटी रुपये खर्चाचा वाढवण बंदर प्रकल्प, अटल सेतू, कोस्टल रोड यासारखे अनेक प्रकल्प २०१४ पासून राज्यात सुरू आहेत. राज्याच्या भविष्यकालीन गरजांचा विचार करून फडणवीस सरकारने अनेक निर्णय घेतले आहेत. छतावरील सौरऊर्जा वापरासाठी सौरऊर्जा अनुदान योजना, संपूर्ण राज्यात १५०० किलोमीटर लांबीच्या नवीन रस्त्यांची निर्मिती मुंबई ते नागपूर समृद्धी महामार्ग, शक्तिपीठ महामार्ग, नार-पार गिरणा नदीजोड प्रकल्प, वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प यासारख्या प्रकल्पांतून फडणवीस सरकारने विकासाच्या भविष्यवेधी दृष्टीचे दर्शन घडविले.

**विकासविरोधी चेहरा**

२०१९ मध्ये उद्धव ठाकरे यांनी विश्वासघात करत महाविकास आघाडीची निर्मिती केली. जुलै २०२२ पर्यंत म्हणजे अडीच वर्षांच्या कालखंडात देवेंद्र फडणवीस यांनी सुरू केलेल्या अनेक विकास योजनांना स्थगिती देत उद्धव ठाकरे यांनी आपला विकासविरोधी चेहरा आणि भाजप विरोधाची विखारी मळमळ दाखवून दिली. महाराष्ट्राच्या जनतेच्या दृष्टीने उद्धव ठाकरेंच्या सरकारची अडीच वर्षे महाराष्ट्राला विकासाच्या बाबतीत २० वर्षे मागे नेणारी ठरली. जुलै २०२२ मध्ये भाजप-शिवसेनेचे महायुतीचे सरकार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सत्तारूढ झाले आणि राज्याच्या विकासाला पुन्हा वेग मिळाला. उद्धव ठाकरे यांच्या नाकर्तेपणामुळे एअर बस, फॉक्स कॉन यांसारखे गुंतवणुकीचे अनेक प्रकल्प महाराष्ट्राबाहेर गेले. वेदांताचा सेमी कंडक्टर प्रकल्पही उद्धव ठाकरेंच्या निष्क्रियतेमुळे महाराष्ट्राबाहेर गेला. उद्धव ठाकरेंच्या अडीच वर्षांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात देवेंद्र फडणवीस सरकारच्या पूर्वीच्या विकास योजनांना स्थगिती देण्याचा सपाटा लावला गेला. मुंबई मेट्रोचा अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प उद्धव ठाकरेंनी सूडबुद्धीमुळे रोखला. टाटा एअर बसचा प्रकल्प नागपूर येथे सुरू करण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी २०१७ पासून प्रयत्न सुरू केले होते. मुख्यमंत्री झाल्यावर उद्धव ठाकरे यांनी गुंतवणुकीच्या प्रकल्पांसाठी आवश्यक असणारा पाठपुरावा केलाच नाही. घरात बसून फेसबुक लाइव्हद्वारे राज्य कारभार करणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी महायुती सरकारविरोधात अपप्रचाराची मोहीमच उघडली होती. या मोहिमेला राज्याच्या जनतेने विधानसभा निवडणुकीत सणसणीत चपराक लगावली.

**अर्थव्यवस्थेत महाराष्ट्राचे योगदान**

देशातील गुंतवणूकदारांना आवश्यक असणाऱ्या सुविधा त्वरेने देणारे सरकार सत्तेत असले तर काय घडते, हेच महायुती सरकारने दाखवून दिले आहे. गुंतवणूकदारांना जमीन, पाणी, वीज यांसारख्या सुविधा तसेच आवश्यक असणारे परवाने जलदगतीने देणाऱ्या सरकारवरच गुंतवणूकदार विश्वास ठेवतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला पाचव्या क्रमाकांची अर्थव्यवस्था बनवत आपली निर्धार शक्ती दाखवून दिली आहे. पंतप्रधान मोदी यांनी देशाची अर्थव्यवस्था पाच बिलियन ट्रिलियन एवढी करण्याचे स्वप्न बघितले आहे. पंतप्रधान मोदी यांचे हे स्वप्न साकार करण्यासाठी महाराष्ट्राने योगदान द्यावे, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस झपाटून कामाला लागले आहेत. २०२७ पर्यंत हे स्वप्न साकार करण्याचे ध्येय पंतप्रधान मोदी यांनी ठेवले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी उद्योगस्नेही धोरण राबवत गुंतवणुकीस अनुकूल वातावरण तयार केले. त्याचाच दृश्य परिणाम थेट विदेशी गुंतवणुकीतील विक्रमामुळे आपण अनुभवत आहोत. यापुढील काळात महाराष्ट्राचा हा विकासरथ आणखी वेगाने घोडदौड करेल, यात शंका नाही.

कुतूहल

## पृथ्वीवर मुक्त ऑक्सिजनची उत्पत्ती

**पृथ्वीचा जन्म** ४.५४ अब्ज वर्षांपूर्वी झाला. सुमारे पहिली एक अब्ज वर्षे पृथ्वीवरच्या वातावरणात हायड्रोजन, हिलियम, मिथेन, अमोनिया आणि बाष्प यांसारखे वायू होते. वातावरणात कुठेही मुक्त ऑक्सिजनचे अस्तित्व नव्हते. ऑक्सिजन फक्त संयुगांच्या स्वरूपात उपलब्ध होता. सुमारे ४.२ ते ३.८ अब्ज वर्षांपूर्वी पृथ्वीवर सतत ज्वालामुखीचे उद्रेक होत होते. या उद्रेकांमधून लाव्हारसासमवेत कार्बन-डाय-ऑक्साइड, सल्फर-डाय-ऑक्साइड, बाष्प आणि इतर काही वायू त्या वेळच्या वातावरणात फेकले जात होते.




याच सुमारास पृथ्वी थंड होता होता वातावरणाचे तापमान १००० अंश सेल्सिअसहून खाली आले, तेव्हा वातावरणात साठलेल्या बाष्पाचे पाण्यात रूपांतर झाले, आणि पाण्याचे थेंब पृथ्वीच्या पृष्ठभागावर पडू लागले. तो पृथ्वीवर पडलेला पहिला पाऊस होता. त्यानंतर काही काळ सतत पाऊस पडत राहिला. पृथ्वीवर असणारे मोठाले खड्डे पाण्याने भरून गेले आणि पृथ्वीवर सागराची निर्मिती झाली. त्या काळात पृथ्वीचा बराचसा भाग सागरांनीच व्यापला होता आणि भूखंडांची निर्मिती प्रक्रिया सुरू होती.

एकपेशीय सजीव सृष्टी सुमारे ३.५ अब्ज वर्षांपूर्वी निर्माण होऊन नीलहरित जिवाणू (सायनोबॅक्टिरिया) हा जिवाणूंचा संघ अस्तित्वात आल्याचे पुरावे खडकांमधल्या त्यांच्या अवशेषांवरून मिळतात. त्या अवशेषांना स्तरिताश्म (स्ट्रोमॅटोलाइट) म्हणतात. मुक्त ऑक्सिजन नसला तरी जिवंत राहण्यासाठी काही सजीव विशिष्ट संयुगांमधला ऑक्सिजन घेऊ शकतात. असे सजीव ऑक्सिजनविरहित परिस्थितीमध्ये (अॅनेरोबिक कंडिशन्स) तग धरू शकतात. नीलहरित जिवाणू याच प्रकारचे सजीव आहेत.

सुमारे साडेतीन अब्ज वर्षांपूर्वी समुद्राच्या उष्ण आणि उथळ पाण्यात नीलहरित जिवाणूंचे अधिराज्य होते. या जिवाणूंमध्ये हरितद्रव्य (क्लोरोफिल) होते. त्यामुळे ते स्वयंपोषी (ऑटोट्रॉफिक) होते; म्हणजे प्रकाशसंश्लेषण (फोटोसिंथेसिस) प्रक्रियेतून ते स्वतःसाठी अन्न तयार करू शकत होते. या प्रक्रियेत पाण्याचे अपघटन होऊन ऑक्सिजन मुक्त होतो आणि वातावरणात सोडला जातो. ऑक्सिजन उत्पत्तीची ही प्रक्रिया दीर्घकाळ सुरू राहिली. २.४ अब्ज वर्षांपूर्वी वातावरणातले मुक्त ऑक्सिजनचे प्रमाण खूप वाढले. याला भूविज्ञानात 'ऑक्सिजन निर्मितीची महान घटना' ('द ग्रेट ऑक्सिजनेशन इवेंट') असे म्हणतात.

मुक्त ऑक्सिजनच्या उत्पत्तीमुळे पृथ्वीवर तीन महत्त्वाच्या घटना घडल्या. हरितगृह परिणाम कमी झाल्याने पृथ्वीवर सुमारे २.४ ते २.१ अब्ज वर्षांपूर्वी पहिले हिमयुग अवतरले. त्याला भूविज्ञानात हुरोनियन हिमयुग म्हणतात. दुसरी घटना म्हणजे सागरातली रासायनिक समीकरणे बदलून लोहाच्या ऑक्साइडचे अवसाद समुद्रात साठू लागले. आणि तिसरी घटना म्हणजे बहुपेशीय सजीवांच्या उत्क्रांतीला चालना मिळाली.

**–डॉ. शिल्पा शरद पाटील**
**मराठी विज्ञान परिषद**
**ईमेल :** office@mavipa.org
**संकेतस्थळ :** www.mavipa.org

उलटा चष्मा

## शेवटी रथ महत्त्वाचा!

***दिल्लीतील पक्षाच्या*** *आयटी सेलच्या मुख्यालयात सकाळपासून एकाच मुद्द्यावर घनघोर चर्चा सुरू होती. देशातील काही महत्त्वाच्या राज्यांत होणाऱ्या निवडणुका विनासायास जिंकायच्या असतील तर जनमानसातील युद्धज्वरात वाढ करण्यासाठी काय करता येईल यावर बिनीचे भक्त तावातावाने मत मांडत होते. 'सिंदूर' वाटपाचा कार्यक्रम नमनालाच गुंडाळावा लागल्यामुळे अस्वस्थ झालेला प्रत्येक जण जबाबदारीने बोलत होता. तेवढ्यात एकाने वर्तमानपत्रातील एका बातमीचे कात्रण साऱ्यांच्या पुढ्यात सरकवले.*

*'कोलकातामधील जगन्नाथपुरी यात्रेतील रथाला सुखोईचे टायर'. हे वाचताच अनेकांचे डोळे एकाचवेळी चमकले. धर्म, श्रद्धा व युद्धज्वर याची सांगड घालायची असेल तर बातमीत नमूद केलेल्या घटनेला सार्वत्रिक रूप देण्यावाचून पर्याय नाही यावर साऱ्यांचे एकमत झाल्यावर मग ते द्यायचे कसे यावर खल सुरू झाला. देशभरात अनेक रथयात्रा निघतात. त्या काढणारे बहुतांश लोक आपलेच आहेत. त्या साऱ्या रथांना सुखोईचे टायर लावायला सांगायचे. त्यासाठी लागणारा अर्थपुरवठा गुप्त पद्धतीने करायचा. टायर लावण्याच्या कार्यक्रमाच्या बातम्या प्रकाशित करवून घ्यायच्या. सार्वजनिक पातळीवर याचे समर्थन करताना आपल्या देवांनीसुद्धा अनेक युद्धे लढली पण प्राचीन अस्त्राने. आता काळ बदलला. तेव्हा त्यांची भक्ती करताना लढाऊ विमानांसाठी वापरले जाणारे टायर वापरून एकप्रकारे आपण देवांचाच आशीर्वाद घेत आहोत. या देशातील देव शक्तिशाली झाले की माणूसही होईल. एकदा का प्रत्येक व्यक्ती सामर्थ्यवान झाली, की देशही शक्तिशाली होईल व शत्रूराष्ट्र वाकड्या नजरेने बघण्याची हिंमत करणार नाही. जे टायर युद्ध जिंकून देतात ते देवाचेही मन जिंकून देतील असा प्रचार करायचा. यामुळे यात्रेत सहभागी होणाऱ्या प्रत्येकाच्या मनात युद्धाची खुमखुमी जागी होईल व ज्वर वाढण्यास मदत होईल. या प्रयोगाची सुरुवात पश्चिम बंगालमधून झाली आहेच. यावेळी तेथे दीदीला धोबीपछाड सहज देता येईल असे सेलच्या प्रमुखाने सांगताच उपस्थित सर्वांनी आपापल्या राज्यातील रथांची माहिती घ्यायला सुरुवात केली. हे टायर लावलेला रथ यात्रेत फिरवताना त्याचीच प्रसिद्धी जास्त होईल हे प्रत्येकाने बघायचे. आपल्यापैकीच काहींनी टायरची पूजा करतानाची व लिंबू-मिरची ठेवतानाची छायाचित्रे प्रसिद्धीला द्यायची. चॅनलवाले सोबतीला आहेतच. एकदा का हे लोकांच्या नजरेत पडले की पूजेसाठी भाविक आपसूकच गर्दी करतील. अनेक ठिकाणी यात्रेचे आयोजक परवडत नसल्याने रथाला ट्रॅक्टरचे टायर लावतात. त्यांनाही हे टायर घेण्यासाठी मदत करायची. रथयात्रा सुरू असताना लाऊडस्पीकरवरून पाकिस्तानला युद्धात वठणीवर आणणारे हेच ते टायर असे जोरात सांगायचे. बघा, मग कसा युद्धज्वर पेटतो ते असे प्रमुखांनी सांगताच सर्वांनी टाळ्या वाजवल्या. हा तर परंपरा व नवतेचा संगमच असे विधान एकाने करताच साऱ्यांनी त्याच्याकडे हास्यमुद्रेने बघितले.*

*बैठक संपताच देशभरात जशा सूचना जाऊ लागल्या तसे यात्रेचे संयोजक सुखोईसाठी टायर तयार करणाऱ्या चेन्नईच्या कंपनीकडे धाव घेऊ लागले. प्रारंभी तेथील अधिकाऱ्यांना काय उत्तर द्यावे हेच कळेना. कुणाला नाही म्हटले की थेट दिल्लीहून शिफारशीचा फोन येऊ लागल्याने नकाराची सोयसुद्धा बंद झाली. सुखोईचे जुने व मोल्ड केलेले टायर काहींना देण्याचा प्रयत्न कंपनीने केला पण दिल्लीतील लोकांनी तो हाणून पाडला. अखेर सर्वांच्या ऑर्डर वेळेत पूर्ण करण्यासाठी कंपनीने उत्पादनक्षमता वाढवली. त्याचदरम्यान सैन्यदलाकडून टायरची मागणी नोंदवण्यात आली. वैतागलेल्या कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सध्या ती पूर्ण करता येणे शक्य नाही, असे कळवून टाकले. बिचारे ते तरी काय करणार? शेवटी रथ महत्त्वाचा!*

तर्कतीर्थ विचार

## 'शुद्धिसर्वस्वम्' : समन्वयी धर्मसुधारणा

**धुळे जिल्ह्यातील** सोनगीर येथे १९२६ साली केशवदत्त महाराजांच्या पुढाकाराने धर्म परिषद संपन्न झाली होती. त्यानिमित्ताने धर्म सुधारणांसंबंधी लोकमतसंग्रह केला होता. त्याआधारे अनंत कृष्णशास्त्री संपादित 'धर्मप्रदीप' शीर्षक संस्कृत ग्रंथ प्रकाशित करण्यात आला होता. या ग्रंथात चार भाग होते.- १) प्रमाणप्रकाशः, २) जातितत्त्वप्रकाशः, ३) शुद्धितत्त्वप्रकाशः, ४) विवाहप्रकाशः. यातील 'शुद्धितत्त्वप्रकाशः' या तिसऱ्या भागाचे खंडन करीत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी १९२८ मध्ये 'शुद्धिसर्वस्वम्' शीर्षक संस्कृत प्रबंध लिहिला आणि तो स्वतः प्रकाशित केला.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात धर्मांतरित व धर्मभ्रष्टांसाठी परंपरेने चालत आलेली पतीतता रूढ होती. तिचे अनेक प्रकार होते. - १) म्लेंच्छां (असंस्कृत) बरोबर अन्नसेवन करणे, २) म्लेंच्छ स्त्री संबंध ठेवणे, ३) निंद्य / पातकीचे अन्नसेवन करणे, ४) हीन स्त्रीचा उपभोग घेणे, ५) अयोग्य, वयाने मोठ्या स्त्रीशी समागम करणे, ६) गुरुसखी (पत्नी)शी संबंध ठेवणे. या सर्वप्रकारच्या पातकांसाठी धर्मग्रंथांमध्ये प्रायश्चित्ते सांगितली गेली आहेत. या प्रायश्चित्तांसंबंधात धर्मपंडितांमध्ये मतभिन्नता होती. सांगितली जाणारी प्रायश्चित्ते 'भीक नको, पण कुत्रं आवर' अशा स्वरूपाची असत. ही प्रायश्चित्ते सुसह्य कमी अन् असह्य अधिक असत. परिणामी, पतीत पतीतच राहात. मेधातिथी, आपस्तंब, 'उज्वल'कार वसिष्ठ, बौद्धायन, अत्री इ. ऋषी-मुनींनी धर्मपतितांसाठी वेगवेगळी प्रायश्चित्ते वर्णिली आहेत.

तर्कतीर्थांनी आपल्या या प्रबंधात 'म्लेंच्छ' शब्दाची व्याख्या व तद्नुषंगिक विस्तृत ऊहापोह केलेला आपणास वाचण्यास मिळतो. म्लेंच्छ व्यवहारांतून कोणकोणती पातके घडतात, ते यात विशद केले आहे. या पातकातून शुद्धी/मुक्तीसाठी जी विविध प्रायश्चित्ते धर्मग्रंथात (श्रुती, स्मृती, पुराण इ.) सुचविली गेली आहेत, त्यांची चर्चा करून ती प्रायश्चित्ते सुधारणावादी व उदारमतवादी दृष्टिकोन वापरून सुसह्य कशी करता येतात, ते तर्कतीर्थांनी या ग्रंथात साधार स्पष्ट केले आहे. ते धर्मसुधारणा प्रयत्नांतील तर्कतीर्थांचे मानवसंवेदी व पुरोगामी योगदान म्हणून पाहावे लागेल. त्यांनी आपल्या या ग्रंथात धर्मग्रंथ निर्देशित जी प्रायश्चित्ते सुचविली आहेत, त्यात ५० टक्के सवलत देण्याचा आग्रह केला आहे. प्रायश्चित्तातील अतिरेकास शह देण्याच्या उद्देशाने पतीत व पातक संतती यांमध्ये भेद करून पतीत संततीस निर्दोष मानून तीस प्रायश्चित्तमुक्त करण्याच्या इराद्याने तर्कतीर्थांनी हे सुचविले आहे. त्यांच्यासाठीची प्रायश्चित्तता किमानपक्षी एकतृतीयांश असावी, अशी विनवणी केली आहे. यातून धर्मसुधारणांमागील तर्कतीर्थांची मानवतावादी, विवेकी तळमळ स्पष्ट होते.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या या प्रयत्नांची प्रशंसा करीत 'शुद्धिसर्वस्वम्'ची समीक्षा सदाशिवशास्त्री भिडे यांनी साप्ताहिक 'केसरी'च्या २२ व २९ जानेवारी, १९२९च्या अंकात पूर्वार्ध व उत्तरार्ध अशा स्वरूपात विस्ताराने केली आहे. त्यात त्यांनी स्पष्ट केले हे की, ''शुद्धी कार्याला विरोध करण्याच्या भरात येऊन अस्पृश्यांपेक्षा म्लेंच्छ धर्मदृष्ट्या उच्च असल्याचे बेधडक विधान 'धर्मप्रदीप'कारांनी केले आहे. या विधानाचा कोणीही तिरस्कारपूर्वक धिक्कारच करेल. श्री. जोशी यांनी शास्त्रीय शब्दांनीच त्यांच्या सर्व विधानांचे खंडन केले आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिलेल्या या ग्रंथाने लोकांचा बुद्धिभेद नाहीसा होईल व समाजातील शुद्धिकार्याविषयी उत्साहात द्विगुणित वाढ होईल.''

या ग्रंथाच्या 'भूमिका' शीर्षक प्रस्तावनेत तर्कतीर्थ स्पष्ट करतात की, हिंदू धर्मातून ज्या काही व्यक्ती बाहेर पडल्या वा त्यांना बाहेर काढले गेले, त्यांच्या पुनःश्च धर्मप्रवेशाबाबत धर्मवेत्ते संभ्रमात दिसतात. पुन्हा स्वधर्म प्रवेशाबाबत शास्त्रसंमत मार्गच नाही, अशी त्यांची धारणा आहे. त्यांचे हे मत खरे तर धर्मशास्त्र नीट अभ्यासले नसल्याने असते. अन्य धर्म स्वीकृतीने व्यक्तीस नास्तिकतेचा दोष लागतो; पण त्या दोषांच्या निरासाचे धर्मग्रंथांतील जे उपाय आहेत, ते अतिशयोक्त केले जातात. यात मानवीय सहानुभूतीपेक्षा शब्दप्रामाण्य, पारंपरिक निष्ठुरता अधिक असते. काही प्रसंगी तर निरपराधांना त्रास सोसावा लागतो, म्हणून लोकाचार समन्वय हाच त्यावरील रामबाण उपाय होय. शब्दप्रामाण्य व लोकाचार यात समन्वय करून करुणासागर विद्वानांनी भारतीयत्व जपावे म्हणून केलेले यातील आव्हान तर्कतीर्थांच्या समन्वयी व्यक्तिमत्त्वाची साक्ष होय. धर्म व्यवहार कठोर नि कर्मठ करताना धर्मवेत्ते हे विसरतात की, धर्म निर्माण झाला तो मुळी मानवकल्याणार्थ. त्यामुळे धर्माच्या नावावर केला जाणारा कोणताही अन्याय, कोणत्याही प्रकारे समर्थनीय ठरत नसतो.

**– डॉ. सुनीलकुमार लवटे**
drsklawate@gmail.com

# कोणासाठी ? कशासाठी ?

## आपण पाकिस्तानला धडा शिकवलेला आहे. मग या संघर्षात पाकिस्तानने आपले काही नुकसान केले असेल तरी ते मान्य केले तर इतका गदारोळ का ?

**आर्थिक, सामरिक,** लष्करी इत्यादी इत्यादी मुद्द्यांवर रशियाच्या पासंगासही पुरू न शकणाऱ्या युक्रेनसारख्या देशाने एकाच दिवसात एके काळच्या महासत्तेच्या विमानांचा ताफाच्या ताफा जायबंदी करून टाकावा ही बाब अशक्य कोटीतील. एका अर्थी युक्रेनने जे केले त्याचे वर्णन रशियाचा 'पर्ल हार्बर' क्षण असे करता येईल. दुसरे महायुद्ध ऐन भरात असताना १९४१ साली जपानने कमालीच्या आव्हानात्मक मोहिमेत अमेरिकेच्या पर्ल हार्बरवर हल्ला करून अमेरिकी नौकांस जागच्या जागी जलसमाधी द्यावी त्याप्रमाणे ताज्या हल्ल्यात युक्रेनने आश्चर्यकारक आक्रमकता दाखवून रशियात खोलवर तब्बल चार हजार किमीची मुसंडी मारून रशियाच्या विमानांना बचावाची संधीच दिली नाही. युक्रेनने या हल्ल्यात रशियाच्या अत्यंत महत्त्वाच्या, संख्येने मोजक्या अशा अण्वस्त्र वाहक विमानांसही लक्ष्य केले. आश्चर्य युक्रेनच्या या हल्ल्याचे जसे आहे तसेच, किंबहुना त्याहूनही अधिक, ते आहे रशियाच्या कबुलीचे. युक्रेनच्या या हल्ल्यानंतर अवघ्या काही तासांत रशियाच्या वतीने जे काही झाले त्याची वस्तुस्थिती सादर केली गेली आणि 'युक्रेनच्या ड्रोन्सनी रशियात खोलवर मुसंडी मारून आमच्या अनेक विमानांचे आणि विमानतळांचेही नुकसान केले', अशी कबुलीही दिली गेली. या प्रामाणिकपणासाठी रशियाचे नेतृत्व कौतुकास पात्र ठरते. रशियाने हे सत्य मान्य केले आणि पाठोपाठ युक्रेनला जन्माची अद्दल घडवण्याचा इशाराही दिला. तो इशारा रशिया प्रत्यक्षात आणेलही. पण यात लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे 'पर्ल हार्बर' घडले तेव्हा ते घडवून आणणाऱ्या जपानपेक्षा कित्येक पट सामर्थ्यवान अमेरिकेने त्या वेळी त्याची कबुली दिली होती आणि पुढे जपानला धडा शिकवला. जे काही झाले ते कबूल करण्यात ना अमेरिकेस त्या वेळी कमीपणा वाटला ना आता रशियास तसा तो वाटतो. तेव्हा प्रश्न असा की आपले संरक्षणदल प्रमुख अनिल चौहान यांनी ताज्या संघर्षात पाकिस्तानने आपली काही विमाने पाडल्याची कबुली दिली; त्यावर इतका गहजब होण्याचे कारण काय ?

युद्ध म्हटले की हे आलेच. महत्त्व असते ते शेवटी अंतिम निकालास. तो निःसंशयपणे आपल्या बाजूने लागलेला आहे आणि आपण पाकिस्तानला धडा शिकवलेला आहे. असे असताना या संघर्षात पाकिस्तानने आपले काही नुकसान केले असेल तरी ते मान्य केले तर इतका गदारोळ का ? यातही एक हास्यास्पद प्रकार म्हणजे चौहान यांनी जी काही विधाने केली त्यास 'कबुली' म्हणावे की नाही, यावर होत असलेली चर्चा. कबुली ही गुन्ह्याची देतात आणि आपण तर काही गुन्हा केलेला नाही, सबब त्यास कबुली कसे म्हणायचे, असा प्रश्न एका वैचारिक बावळट वर्गास पडलेला दिसतो. कबुली म्हणायचे नसेल तर मग चौहान यांनी जी काही विधाने केली त्यास काय म्हणावे ? खरे तर या समाजमाध्यमी वैचारिक वेठबिगारांनी 'कबुली' या शब्दावर घेतलेल्या भाषिक शंकेपेक्षाही एक महत्त्वाचा मुद्दा संरक्षणदल प्रमुखांनी सिंगापूर येथील मुलाखतीत मान्य केला. पाकिस्तानच्या कृतीनंतर तब्बल दोन दिवस आपणास आपले विमान दल जमिनीवर ('ग्राउंडेड') राखावे लागले, हा तो मुद्दा. त्याचा अर्थ असा की पाकिस्तानने आपल्या विमान दलाचे मोठे नुकसान केल्यानंतर काही काळ आपणास आपली हवाई हल्ला मोहीम स्थगित करावी लागली. त्यानंतर आपण सगळ्या मोहिमेची फेरआखणी केली आणि आपल्या विमान दलाने चमकदार कामगिरी करत पाकिस्तानात खोलवर मारगिरी करून त्यांचे अतोनात नुकसान केले. ''पाकिस्तानने आपले नुकसान किती केले यापेक्षा त्या नुकसानीनंतर आपण काय केले; ही बाब अधिक महत्त्वाची ठरते'', असे चौहान म्हणतात त्यात काहीही गैर नाही. तरीही त्यांच्या या कबुलीनिदर्शक विधानावर आपल्याकडे बरीच नाराजी निर्माण झाल्याचे दिसते. ते पाहून काही प्रश्न उपस्थित होतात.

**...तरीही त्यांच्या या कबुलीनिदर्शक विधानावर आपल्याकडे बरीच नाराजी निर्माण झाल्याचे दिसते. ते पाहून काही प्रश्न उपस्थित होतात...**

जसे की मुळात या संघर्षात जे काही झाले त्याचा हिशेब जाहीरपणे मांडण्याचा अधिकार संरक्षणदल प्रमुख चौहान यांस दिला कोणी ? केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी या संदर्भात जनरल चौहान यांस मुखत्यारपत्र दिले होते काय ? तशी शक्यता कमीच. कारण संरक्षणमंत्र्यांचा एकूण आवाका आणि तूर्त त्यांस दिले गेलेले अधिकार पाहता राजनाथ सिंह यांच्या वतीने असे काही केले गेले असण्याची शक्यता नाही. म्हणजे मग राहता राहिले पंतप्रधान कार्यालय वा खुद्द पंतप्रधान. देशाच्या सर्वोच्च नेत्याची परवानगी असल्याखेरीज जनरल चौहान स्वतःच्या हिमतीवर इतके विधान करू शकतील काय ? तसे त्यांनी केले असेल काय ? इतकी स्वतंत्र प्रज्ञा त्यांच्या ठायी आहे काय ? आणि तशी ती असूनही त्यांना या पदावर नेमण्याचा मोठेपणा केंद्राने दाखवला काय ? यापेक्षाही अधिक महत्त्वाचा मुद्दा असा की ही कबुली द्यायचीच होती तर त्यांनी 'रॉयटर्स'सारख्या 'पाश्चात्त्यधार्जिण्या'... आणि म्हणून 'भारत-विरोधी'... वृत्तसेवेची निवड का बरे केली ? अनेक भारतीय वृत्तवाहिन्यांनी एक चकार शब्द न काढता, कोणताही उलट प्रश्न न विचारता जनरल चौहान यांचे विधान दिवस-दिवस 'चालवले' असते आणि ''पाहा भारतीय लोकशाही किती प्रामाणिक, पारदर्शी आहे'', त्याची दवंडीही पिटली असती. म्हणजे अलीकडे विविध विक्री योजनांत 'वन प्लस वन', एकावर एक मोफत काय काय दिले जाते, तद्वत या विधानाच्या प्रसारणाबरोबर लोकशाही प्रचारही त्यांनी मोफत केला असता आणि पाकिस्तानला त्याची जागा दाखवून दिली असती. परंतु जनरल चौहान यांनी रॉयटर्सची निवड केल्याने हे काहीच झाले नाही. भारतीय वाहिन्यांची ही संधी हुकली आणि बातम्यांतील निवडक तुकडे समाजमाध्यमी फिरते ठेवण्याचा राष्ट्रप्रेमी उद्योग वैचारिक वेठबिगारांसही करता आला नाही. आणि परत त्यांनी हे विधान केले ते सिंगापुरात ? तेही 'शांग्रिला डायलॉग' या चर्चेच्या निमित्ताने ? ते का ?

तसे पाहू गेल्यास जनरल चौहान हे मूळचे पायदळाचे अधिकारी. त्यांची हयात गेली पायदळात. केंद्राने त्यांना निवृत्त्योत्तर या पदासाठी पाचारण केले. याआधीचे संरक्षणदल प्रमुख जनरल बिपीन रावत यांच्या अपघाती निधनानंतर हे पद रिक्त झाले आणि तेथे जनरल चौहान यांस नेमले गेले. या पदावरील व्यक्ती संरक्षणदल प्रमुख असली तरी लष्करी विमानांच्या पडझडीविषयी भाष्य करण्याची संधी त्यांनी हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांस द्यावयास हवी होती. त्यांनी गेल्याच आठवड्यात भारतीय उद्योग महासंघाच्या बैठकीत संरक्षणमंत्र्यांच्या साक्षीने सरकारी मालकीच्या कंपन्यांचे संरक्षण साहित्याच्या उत्पादनाबाबत वाभाडे काढले. सिंग यांनी याआधीही अशा प्रकारची टीका केलेली होती. यावरून त्यांचा स्पष्टवक्तेपणाचा लौकिक दिसून येतो. असे असताना भारत-पाक संघर्षात आपली काही विमाने पाडली गेली असतील, हवाई दलाचे नुकसान झाले असेल तर त्यावर भाष्य करण्याचा पहिला अधिकार त्यांचा होता. जनरल चौहान यांच्या वक्तव्याने एअर चीफ मार्शल सिंग यांची अडचण झाली; त्याचे काय ?

सबब प्रश्न असा की जनरल चौहान यांच्या या कबुलीने नक्की काय साधले ? हा संघर्ष संपून, आपल्या पंतप्रधानांचे जवळचे मित्र अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या पुढाकाराने अमलात आलेल्या शस्त्रसंधीस इतके दिवस उलटल्यानंतर या अशा कबुलीचे कारणच काय ? कबुली नाही तर नाही, पण आपले सरकार निदान या कबुलीची कारणे तरी सांगेल; ही आशा.

लेख

ज्युलिओ रिबेरो
मुंबईचे निवृत्त पोलीस आयुक्त

# त्या नोंदीत 'विघातक' काय होते ?

**'आम्ही ब्रिटिशकालीन कायदे बदलतो आहोत' असा गाजावाजा करून 'भारतीय न्याय संहिता' अशा हिंदी शीर्षकाने जो फौजदारी कायदा सध्या लागू आहे, त्यातील 'कलम १५२' हे मुळात ब्रिटिशांनी भारतीय स्वातंत्र्यसैनिकांना 'राजद्रोही' गुन्हेगार ठरवण्यासाठी १८७० पासून आणलेल्या 'कलम १२४ अ' चीच भ्रष्ट नक्कल आहे...**

**माझ्यासारख्या अनेक** उदारमतवादी-मानवतावादी लोकांना आमच्या प्रत्येक अपेक्षा सर्वोच्च न्यायालयाने पूर्ण कराव्यात असे जरी वाटत असले, तरी प्रत्यक्षात तसे होणे कठीण असते. न्यायाधीशांपुढची आव्हाने वास्तविक अगदी निराळी असू शकतात. उदाहरणार्थ, आजवर कायद्याचा अर्थ कसा काढला गेला, याची काहीएक बंधने त्यांना पाळावी लागतात. हे कबूलच, पण तरीही प्रा. अली खान महमुदाबाद यांच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाच्या द्विसदस्य पीठाने दिलेला निर्णय मला अस्वस्थ करून गेला. त्या आदेशाबद्दल अनेकांची प्रतिक्रिया माझ्यासारखीच असू शकते, हे माहीत असल्याने मी याविषयी लिहितो आहे.

मी फेसबुकवर नाही, पण एका ओळखीच्या व्यक्तीमार्फत या विद्वान प्राध्यापकाची नोंद मी वाचली. त्या नोंदीमागचा हेतू आपल्या राष्ट्राची एकता, सार्वभौमत्व किंवा अखंडता धोक्यात आणण्याचा कसा काय असू शकेल, असा प्रश्न मला पडला. पण याच नोंदीमुळे 'भारतीय न्याय संहिते'च्या कलम १५२ नुसार त्यांच्यावर फुटीरता, सशस्त्र बंड आणि विघातक कृत्यात सहभागाचे आरोप लावण्यात आलेले आहेत. प्राध्यापकांनी त्यांच्या नोंदीतून असा कोणताही हेतू दाखवलेला नसल्याचे वाचक म्हणून मला जाणवले होते.

जर न्यायालयाला या नोंदीत असा काही हेतू दिसला असता, तर त्यांना जामिनावर सोडले गेलेच नसते. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे, न्यायालयाने या नोंदीचा उलगडा करण्याचे काम एका विशेष तपास समितीकडे ('एसआयटी'कडे) सोपवले. या समितीत तीन आयपीएस अधिकारी असून तिघेही मूळचे हरियाणाबाहेरील होते आणि त्यापैकी एक महिला होती (कारण त्या नोंदीत सेनादलातील महिला अधिकाऱ्यांचा उल्लेख होता). आजकाल न्यायालयाकडून 'एसआयटी' स्थापन करण्याचे आदेश वारंवार दिले जात आहेत, हा निव्वळ योगायोग समजू या.

या आदेशानंतर मला काहीसा आनंद याचा झाला की, इंग्रजी भाषेतील शब्दांचा उलगडा करण्यासाठी आयपीएस अधिकाऱ्यांना सर्वोच्च न्यायपालिकेच्या माननीय सदस्यांपेक्षा अधिक सक्षम मानले गेले. इंग्रजी शब्द आणि इंग्रजी व्याकरणाचा आणि एकंदर विधानांच्या ध्वन्यार्थाचा उलगडा करण्याच्या तुलनात्मक क्षमतेबद्दलचे माननीय न्यायाधीशांचे हे मत बहुसंख्य भारतीय नागरिकांना आवडेल का याबद्दल मला शंका आहे. परंतु मला हे माहीत आहे की एसआयटीमध्ये नियुक्त केलेल्या एखाद्या वा अधिक आयपीएस अधिकाऱ्यांकडून त्यांच्या विचारपूर्वक निष्कर्षांद्वारे, त्यांच्या राजकीय मालकांना खूश करण्याची संधी गमावली जाणार नाही.

मुळात, हरियाणा राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रेणू भाटिया यांना या नोंदीत काय आक्षेपार्ह वाटले असेल ? पहलगाममध्ये निष्पाप हिंदू पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या अधिकृत प्रतिसादाच्या प्रत्येक पैलूबद्दल या प्राध्यापकांनी त्यांच्या नोंदीत सकारात्मक सुरातच लिहिलेले आहे. दररोज पत्रकारांना माहिती देण्यासाठी दोन महिला प्रवक्त्यांपैकी एक म्हणून एका वरिष्ठ मुस्लीम महिला अधिकाऱ्याची निवड केल्याबद्दल सरकारचे कौतुक प्राध्यापकांनी केलेले आहेच. फक्त ते करताना त्यांनी त्यांची एक खंतही नोंदवली की, यापुढे तरी उजव्या विचारसरणीच्या शक्तींनी लिंचिंग आणि विविध गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्यांच्या (बहुतेकदा मुस्लिमांच्याच) घरांची जाळपोळ या प्रकारांचा निषेध करून खऱ्या धर्मनिरपेक्षतेसाठी स्वतःला वचनबद्ध केले पाहिजे.

तसा निषेध आजवर कधी झालेला नसल्याने ही खंत रास्तच. माझ्यासारख्या अनेक भारतीयांनी अशा प्रकारच्या कृत्यांचा निषेध केला आहे. हे प्रकार बेकायदाच आहेत. अगदी सर्वोच्च न्यायालयानेही, स्थानिक अधिकारी योग्य प्रक्रियेचे पालन न करता बुल-डोझरचा वापर करतात, याबद्दल कडक टीका केली आहे. 'कायद्याचे राज्य' असलेल्या देशात कायद्याची प्रक्रिया न पाळता झालेले हे प्रकार त्याज्यच ठरतात.

कार्यपालन अधिकाऱ्यांनी कायदा पाळूनच, कायद्याच्या प्रक्रियेनुसारच पावले उचलावीत, ही 'कायद्याचे राज्य' या संकल्पनेची अपेक्षा असते. मात्र काही अधिकारी ही प्रक्रिया पाळत नाहीत- म्हणजे कधी अवाच्या सवा कारवाई करतात, तर कधी अजिबात कारवाई न करता जे काही अपप्रकार लोकांकडून घडत आहेत ते घडू देतात- हे दोन्ही कायद्याच्या राज्यांत चुकीचेच ठरते. याचाच पुढला भाग असा की, या प्राध्यापकाला घाईघाईने अटक करण्याच्या प्रकारात आधी पोलीस दल कणाहीनपणे वागले आणि नंतर स्थानिक पातळीवरची न्याययंत्रणाही त्याच वळणावर गेली. न केलेल्या गुन्ह्यासाठी त्याला कोठडीत ठेवण्यात आले.

इथे विषयांतराचा दोष पत्करून हेही नमूद करायला हवे की, 'आम्ही ब्रिटिशकालीन कायदे बदलतो आहोत' असा गाजावाजा करून आणि 'भारतीय न्याय संहिता' अशा हिंदी शीर्षकाने जो फौजदारी कायदा सध्या लागू आहे, त्यातील 'कलम १५२' हे मुळात ब्रिटिशांनी भारतीय स्वातंत्र्यसैनिकांना 'राजद्रोही' गुन्हेगार ठरवण्यासाठी १८७० पासून आणलेल्या 'कलम १२४ अ' चीच भ्रष्ट नक्कल आहे ! मोदी-शहा सरकारचा कायदा 'राजद्रोह' असा थेट उल्लेख करत नसला तरी, 'भारतीय न्याय संहिते'तील कलम १५२ मधल्या तरतुदी तर 'इंडियन पीनल कोड' मधील 'कलम १२४ अ'च्या तरतुदींपेक्षाही जाचक आहेत (म्हणून 'भ्रष्ट' नक्कल) कारण या कलम १५२ मध्ये 'विघातक कृत्य' एवढाच उल्लेख आहे- कायदा इतका मोघम ठेवण्यातून नेहमीच राजकारणाला वाव मिळत असतो- त्याआधारे निवडक कारवाई करता येते. त्यामुळेच प्रा. महमुदाबाद यांच्याप्रमाणेच कोणत्याही सामान्यजनांना धास्तावून सोडणारी, त्यांना असुरक्षित ठेवणारी अशी या कलमातली तरतूद आहे.

याचा वापर अल्पसंख्याकांविरुद्ध होणार हे उघड आहे आणि माझ्या मते, अशा प्रकारे अल्पसंख्याकांचा आवाज दाबून टाकण्याची तजवीज करणे हे संकटाला निमंत्रण देण्यासारखेच आहे. त्यामुळे, अद्यापही या कलमात सुधारणा करता येईल- ती करावी, असे माझे मत आहे. पण सामाजिक स्वास्थ्यासाठी, सुधारणा फक्त कायद्यात करून चालत नाही. याबद्दल माझी सूचना अशी की सर्व स्त्रियांना- विशेषतः मुस्लीम समाजातील सर्वजणींना 'लिखाण, वाचन, अंकगणित' यांचे धर्मनिरपेक्ष शिक्षण देणारा विशेष उपक्रम सुरू करावा. या महिलांना आपण पुरुषांपेक्षा कमी समान असू शकत नाही, याची जाणीव होऊ द्या. याची खरी गरज आहे. तसे झाले तर, शाहबानोसारखी प्रकरणे पुन्हा कधीही उद्भवणारच नाहीत.

पुन्हा मूळ विषयाकडे परतताना, मला हे सांगावेसे वाटते की जेव्हा न्यायमूर्ती भूषण रा. गवई यांना सरन्यायाधीश म्हणून बढती देण्यात आली तेव्हा मला खूप आशा होती. 'टास्मॅक' प्रकरणात 'ईडी'च्या तपासाला स्थगिती देण्याचा त्यांचा अलीकडचा आदेश स्वागतार्ह होता. विशेषतः, 'ईडी'चा वापर सरकारकडून विरोधी पक्षांच्या सरकारांवर दबाव आणण्यासाठी केला जात आहे किंवा 'ईडी'सारख्या यंत्रणेचा गैरवापरही केला जात आहे, अशा चर्चेला तोंड फुलटे असताना, या यंत्रणेला तिच्या कायदेशीर मर्यादांची जाणीव करून देऊ शकणारा - त्या अर्थाने दूरगामी असा- हा आदेश होता. मात्र याच ओघात हेही नमूद करायला हवे की नवे सरन्यायाधीश नुकतेच मुंबई भेटीसाठी आले तेव्हा धक्कादायक प्रकार घडला. बॉम्बे बार असोसिएशनने त्यांच्या स्वागतासाठी योजलेल्या स्वागत समारंभासाठी ते दिल्लीहून आले असता, मुंबई विमानतळावर त्यांच्या स्वागतासाठी राज्याचे मुख्य सचिव, राज्य पोलीस महासंचालक आणि शहर पोलीस आयुक्त हे अधिकारी आले नाहीत, म्हणून सरन्यायाधीशांनी 'राजशिष्टाचाराचे पालन न केल्याबद्दल' त्यांना सौम्यपणे फटकारले.

मी याविषयीच्या राजशिष्टाचाराचे नियम तपासले आणि असे आढळले की, सरन्यायाधीशांच्या आगमनावेळी विमानतळावर या तीन कार्यव्यग्र अधिकाऱ्यांना उपस्थित राहण्याची आवश्यकता नव्हती. सुरुवातीला मी थोडा काळजीत होतो कारण मी फेब्रुवारी १९८२ ते मे १९८५ पर्यंत, तीन वर्षांपेक्षा जास्त काळ, मुंबईचा पोलीस आयुक्त होतो. मला कधीही राजशिष्टाचार विभागाने विमानतळावर उपस्थित राहण्यास सांगितले नव्हते. भूतपूर्व मुख्य न्यायाधीश सॅम भरुचा, सरोश कपाडिया, शरद बोबडे आणि चंद्रचूड हे बॉम्बे बारचे होते. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात मुंबईला भेट दिली असावी. नियमांनुसार, कायदा आणि न्याय विभागाचे सचिव आणि मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश यांनी निश्चितच त्यांचे स्वागत केले आणि त्यांना निरोप दिला असेल.

सरन्यायाधीशांनी राजशिष्टाचार पाळला न गेल्याबद्दल नापसंती व्यक्त केल्यानंतर आता, त्यांना 'राज्य अतिथी दर्जा' बहाल करण्याचा आदेश राज्य सरकारने काढला आहे. याचा अर्थ राज्याचे मुख्य सचिव, राज्य पोलीस महासंचालक आणि शहर पोलीस आयुक्त हे सरन्यायाधीशांच्या प्रत्येक मुंबई-भेटीत विमानतळावर स्वागतासाठी जाणार असाही होतो काय, याबद्दल मला माहिती नाही.

विश्लेषण

राखी चव्हाण
rakhi.chavhan
@expressindia.com

# ओदिशातून महाराष्ट्रात येणाऱ्या हत्तींचे काय करायचे ?

**ओदिशातून विदर्भात येणाऱ्या हत्तींनी वनखात्यासमोर आव्हान उभे केले आहे. या भागात आधीच मानव-वाघ संघर्ष वाढत असताना हत्तींचे आव्हान वनखाते कसे पेलणार ?**

**ओदिशातून हत्ती का येत आहेत ?**

ओदिशाच्या जंगली भागात वाढत्या मानवी हालचालींमुळे हत्ती आणि मानव असा संघर्ष सुरू झाला आहे. पर्यावरणापेक्षा 'विकास कामां'ना प्राधान्य मिळाल्याने हत्तींचा अधिवास आणि कॉरिडॉर खंडित होत आहेत. मोठ्या प्रमाणावर लोहखनिज आणि कोळसा खाणी सुरू झाल्यामुळे हत्तीच्या अधिवासाचे तुकडे होऊन हत्ती मानवी वस्तीत विस्थापित होत आहेत. हत्तींच्या अधिवासावर खाणकामाखेरीज जंगलतोड, रस्तेबांधणी यांमुळे परिणाम होत आहे. ओदिशातील या हत्तींनी मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि महाराष्ट्र या तीन राज्यांकडे त्यांचा मोर्चा वळवला आहे.

**महाराष्ट्रात आधीपासूनच अधिवास ?**

प्राचीन काळापासून गडचिरोली, चंद्रपूर आणि विदर्भ हा हत्तींचा मूळ अधिवास आहे. गोंड राजांच्या राजचिन्हावर हत्ती असे. तसेच इतर राज्यांच्या काळात येथील रानटी हत्तींचा युद्धात उपयोग होत असे. त्यामुळे ओदिशातून मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये जसे हत्ती येत आहेत, तसेच ते महाराष्ट्रातील विदर्भातदेखील येतीलच, असा अभ्यासकांचा दावा आहे. महाराष्ट्रात २००-३०० वर्षांपूर्वी हत्तींचा अधिवास होता. त्यामुळे ओदिशातून विस्थापित होणारे हत्ती छत्तीसगडमार्गे इथे येत आहेत. अभ्यासकांच्या मते, आधी एक/ दोन किंवा तीन हत्ती येऊन 'रेकी' करतात. त्यांना तो अधिवास त्यांच्यासाठी सुरक्षित वाटला तर ते आपल्या समूहासह परत येतात. त्यामुळे याठिकाणी हत्ती येणार हे निश्चित आहे.

**हत्ती पळवून लावणे हा पर्याय आहे ?**

ओदिशातून छत्तीसगडमार्गे गडचिरोली, चंद्रपूर जिल्ह्यात हत्ती येत आहेत. २०२० साली गडचिरोली जिल्ह्यात दोन ते तीन हत्ती आलेत. त्यानंतर २०२० मध्ये २२-२३ हत्तींचा कळप या जिल्ह्यात आला आणि स्थिरावला. आता चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्प परिसरात दोन हत्तींनी मुक्काम ठोकला आहे. जिल्ह्यात आधीच मानव-वाघ संघर्ष पेटला आहे. आता व्याघ्रप्रकल्पाच्या गाभा आणि बफर क्षेत्रातच हत्ती स्थिरावले असल्याने प्रशासनासमोर पेच निर्माण झाला आहे. तीन वर्षांपूर्वी हत्तींमुळे निर्माण झालेल्या संघर्षात गावकऱ्यांचा बळीदेखील गेला आहे. त्यावेळी गावकऱ्यांनी फटाके फोडून, टायर जाळून हत्तींना हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला होता, मात्र हा प्रकार अंगलट येण्याची शक्यता अधिक असते. अशावेळी हत्ती बिथरून समोर येणाऱ्यावर हल्ला करण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे ताडोबा व्यवस्थापन या दोन हत्तींबाबत सावध पावले उचलत आहे. मध्य प्रदेश आणि छत्तीसगडच्या धर्तीवर ताडोबा प्रशासन काम करीत आहे.

**'हाथी मित्र दल' काय आहे ?**

मध्य प्रदेश आणि छत्तीसगड वनखात्याने घनदाट जंगलात, जंगलाच्या काठावर असलेल्या हत्ती आणि मानवी वस्त्यांचे संरक्षण करण्यासाठी एक महत्त्वाचा उपक्रम हाती घेतला आहे. 'हाथी मित्र दल' या त्या उपक्रमात वनखात्याच्या अधिकाऱ्यांखेरीज, स्थानिक समुदायातील नागरिकांना सहभागी करून घेण्यात आले आहे. हे हत्तीमित्र रात्रंदिवस जागे राहून, हत्तींच्या हालचालींवर लक्ष ठेवतात. जर कोणताही हत्ती गावाजवळ आला, तर ते लोकांना सावध करतात. दिवसा जेव्हा हत्ती सहसा विश्रांती घेतात, तेव्हा हे हत्तीमित्र पायी त्यांचा मागोवा घेतात. रात्री, जेव्हा हत्ती अन्नासाठी फिरतात तेव्हा हे हत्तीमित्र वनविभागाच्या गस्ती वाहनातून या हत्तींवर लक्ष ठेवून असतात.

**अभ्यास का आवश्यक आहे ?**

मध्य प्रदेशातून १९३० मध्ये हत्ती नामशेष झाले, मात्र १९८६ नंतर पुन्हा याठिकाणी हत्ती आले. छत्तीसगडमध्येही हत्ती परतले आणि आता महाराष्ट्रात- विशेषतः विदर्भात- ओदिशातून छत्तीसगडमार्गे हत्ती परतले आहेत. अभ्यासकांच्या मते विदर्भातील हत्तींचा इतिहास पाहता येत्या दहा वर्षांत याठिकाणी मोठ्या संख्येने हत्ती स्थिरावण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे आता महाराष्ट्रातही 'हाथी मित्र दल' स्थापन करण्याची गरज व्यक्त केली जात आहे. यात गावातील लोक, वनखात्याचे अधिकारी आणि अभ्यासकांचाही समावेश असायला हवा. हत्तींचा मागोवा घेताना गावकऱ्यांना जागृत करण्यासोबतच जी काही निरीक्षणे आढळतील त्याचा अहवाल तयार करून, त्यातून पुढच्या पाच वर्षांचा आराखडा तयार करता येईल. त्यामुळे पुढची आव्हाने पेलता येतील. हे सहजीवन राहिले तर वनसंरक्षणालाही बळकटी मिळेल, असे अभ्यासकांचे म्हणणे आहे.

अन्वयार्थ

# भेदभाव दिसू नये !

**केंद्रीय गृहमंत्रालयाच्या** अनुमतीमुळे 'मुख्यमंत्री सहायता निधी'साठी परदेशातूनही देणग्या मिळवणे महाराष्ट्र सरकारला आता शक्य झाले आहे. परदेशी देणगी नियमन कायद्याअंतर्गत (एफसीआरए) केंद्रीय गृह मंत्रालयाने राज्य सरकारला ही मान्यता दिली. अशी परवानगी मिळणारे महाराष्ट्र देशातील एकमेव राज्य. गेल्या ११ वर्षांमध्ये केंद्रातील भाजप सरकारने अनेक स्वयंसेवी संस्थांचा विदेशी देणग्या जमा करण्याचा परवाना रद्द केला. त्यात काही नामांकित संस्थांचा समावेश होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने दिल्लीत केलेल्या पाठपुराव्याला यश आले आणि अमित शहा यांच्या गृह मंत्रालयाने महाराष्ट्र सरकारची विनंती मान्य केली. विदेशी देणग्या स्वीकारण्यास अनुमती मिळाल्याने, राज्यात गुंतवणूक केलेल्या विदेशी कंपन्यांचा सामाजिक उत्तरदायित्व निधी (सीएसआर) आता मुख्यमंत्री सहायता निधी'त वळता करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

यापूर्वी केरळ सरकारने सहायता निधीत विदेशी देणग्यांसाठी केलेली मागणी केंद्रातील भाजप सरकारने फेटाळली होती. २०१८ मध्ये पुराच्या तडाख्यात केरळचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते, तेव्हा केरळ सरकारने परदेशातून मदत मिळवण्यासाठी



केंद्राकडे परवानगी मागितली असता ती नाकारण्यात आली. त्यामुळे महाराष्ट्राला अनुमती मिळताच, विदेशी देणग्यांबाबत केंद्र सरकारचे वर्तन पक्षपाती असल्याचा आरोप केरळच्या वित्तमंत्र्यांनी केला आहे. राज्यात भाजपप्रणित महायुतीचे सरकार तर केरळमध्ये डाव्या आघाडीचे सरकार. पूर आणि भूस्खलनासारख्या भीषण आपत्तीतही केंद्राने केरळला परवानगी नाकारली होती. महाराष्ट्राला परवानगी देण्यास केरळचा विरोध नाही. पण केंद्राने सर्व राज्यांना समान वागणूक दिली पाहिजे, अशी भूमिका तेथील वित्तमंत्री मांडतात, ती रास्तच म्हणावी लागेल.

मुख्यमंत्री सहायता निधीतून नैसर्गिक आपत्ती, बॉम्बस्फोट, दंगल, पूर, दुष्काळ, आग अशा मोठ्या आपत्तीत नुकसान झालेल्यांना आर्थिक मदत दिली जाते. तसेच दुर्धर आजारांवरील उपचाराकरिता गरजूंना मदत दिली जाते. कोणाला मदत करायची याचे काही निकष ठरलेले नाहीत. मुख्यमंत्री सहायता निधीतून निधीचे वितरण हे मुख्यमंत्र्यांच्या स्वेच्छा निर्णयाने व त्यांच्या निर्देशानुसार केले जाते. मुख्यमंत्री सहायता निधीतून पूर्वी संस्थांना मदत देण्याचीही मुभा होती. पण काही ठरावीक व निकटच्या संस्थांचाच विचार होतो, म्हणून प्रकरण न्यायालयात गेल्याने संस्थांना या निधीतून मदत थांबवण्यात आली. मुख्यमंत्र्यांचा स्वेच्छाधिकार असल्याने कितीही निधीचे वितरण करता येते. एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्रीपदी असताना आरोग्य विभागात गरजूंच्या उपचाराकरिता ४०० कोटींपेक्षा अधिक रक्कम मंजूर झाली होती. एखाद्या नैसर्गिक आपत्तीनंतर किती मदत द्यायची याचे निश्चित असे सूत्र काहीच नसते. मुख्यमंत्री सहायता निधीचे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कॅग) वा महालेखापालामार्फत लेखापरीक्षण केले जात नाही. हे लेखापरीक्षण खासगी सनदी लेखापालामार्फत केले जाते. परिणामी, मुख्यमंत्र्यांकडील हा कक्ष सरकारी यंत्रणांना हिशेब देण्यासाठी उत्तरदायी नाही.

दुसरी गंभीर बाब म्हणजे, मुख्यमंत्री सहायता निधीचे २०१२-१३ पर्यंतच लेखापरीक्षण पूर्ण झाले आहे. ही माहिती मुख्यमंत्री सहायता निधीच्या संकेतस्थळावरच देण्यात आली आहे. म्हणजेच २०१५ सालच्या सत्तांतरानंतर मुख्यमंत्री सहायता निधीचे लेखापरीक्षण एकतर झालेच नाही किंवा त्याची माहिती जाहीर केली जात नाही. प्रत्येक आर्थिक वर्षाच्या शेवटी या निधीचे लेखापरीक्षण होणे अपेक्षित असल्याचे मात्र या संकेतस्थळावरही नमूद आहे !

स्वयंसेवी संस्थांना विदेशातून मिळणाऱ्या देणग्यांचा दुरुपयोग होऊ नये, तो पैसा देशविरोधी कारवायांसाठी वापरला जाण्याची शक्यता राहू नये, या उद्देशाने केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाकडून नियमन केले जाते. पण विरोधी पक्षांशी संबंधित संस्थांचा विदेशी देणग्या जमा करण्याचा परवाना रद्द करणे किंवा त्यांना मुदतवाढ नाकारणे हा झाला राजकारणाचा भाग. केरळला २०१८ मध्ये पुराने पार झोडपले होते. अशा आपत्तीच्या वेळी विदेशातून मदतीची तयारी काही संस्थांनी दर्शविली असतानाही केंद्राने परवानगी नाकारल्यामुळेच राजकीय भेदभावाच्या आरोपाला वाव मिळतो. केंद्राने यापुढील काळात अशी परवानगी देताना पक्षीय अभिनिवेश समोर ठेवून भेदभाव करू नये ही अपेक्षा. परवानगी मिळालीच आहे तर, विदेशातून देणगीच्या रूपाने जमा होणारा निधी योग्य रीतीने खर्च करून नागरिकांना त्याचा फायदा होईल याची खबरदारी घ्यावी.

लोकसत्ता
नाशिक वृत्तान्त



# भेटीगाठी, सदिच्छा भेटींद्वारे शह-काटशह

## मंगलमय राजकारणाचा दिवस

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नाशिक :** शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि शिवसेना (उद्धव ठाकरे) यांच्याकडून सोमवारी शहरात भेटीगाठी, सदिच्छा भेटीच्या राजकारणाद्वारे परस्परांना शह देण्याचा प्रयत्न झाला. ठाकरे गटाचे महानगरप्रमुख विलास शिंदे यांच्या कन्येच्या विवाह सोहळ्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नाशिकमध्ये येत असताना ठाकरे गटाचे उपनेते सुधाकर बडगुजर यांनी नाशिक दौऱ्यावर असणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. महापालिका कर्मचाऱ्यांशी संबधित प्रश्नांचे निवेदन दिले. मुख्यमंत्र्यांनी त्यांना 'लवकरच भेटू' असे म्हटल्याने राजकीय वर्तुळात वेगवेगळे अर्थ काढले जात आहेत.

शिवसेना दुभंगल्यापासून शिंदे गट आणि ठाकरे गटात परस्परांवर राजकीय कुरघोडीची स्पर्धा सुरू आहे. ठाकरे गटाचे अनेक माजी नगरसेवक, माजी आमदार शिंदे गटाने गळाला लावले. आगामी



शहरातील कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करताना ठाकरे गटाचे उपनेते सुधाकर बडगुजर

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, ठाकरे गटाला राजकीय धक्के देण्याची पुन्हा एकदा तयारी केली आहे. यातून भेटीगाठी, सदिच्छा भेटीचे राजकारण रंगल्याचे दिसत आहे. ठाकरे गटाचे महानगरप्रमुख विलास शिंदे यांच्या कन्येचा सोमवारी विवाह सोहळा होता.

या सोहळ्यास उपस्थित राहण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नाशिक दौऱ्यावर आले. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनीही सोहळ्यात हजेरी लावली.

उपमुख्यमंत्री शिंदे हे ठाकरे गटातील पदाधिकाऱ्याच्या कुटुंबातील सोहळ्यास उपस्थित राहणार असल्याची चर्चा सुरू झाल्यानंतर ठाकरे गटाचे उपनेते सुधाकर बडगुजर यांनी तत्पूर्वीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत चर्चेला आणखी वेगळे वळण दिले.

नाशिक म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेचे अध्यक्ष बडगुजर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, महापालिकेतील ३६०९ रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करावी, वर्ग तीन आणि वर्ग चारच्या कर्मचाऱ्यांच्या पदोन्नत्या, सेवा नियम प्रवेशात दुरुस्तीबाबतच्या प्रस्तावांना शासनाकडून मंजुरी देण्याची मागणी त्यांनी केली. निवेदन स्वीकारत मुख्यमंत्र्यांनी या विषयांवर लवकर भेटू असे आश्वासन दिल्याचे सांगितले जाते.

या संदर्भात बडगुजर यांनी रविवारपासून आपण मुख्यमंत्र्याकडे भेटीची वेळ मागितली होती. सोमवारी त्यांनी ही वेळ दिल्यानंतर महापालिकेतील कर्मचाऱ्यांचे प्रश्न मांडल्याचे सांगितले. या भेटीची माहिती ठाकरे गटाचे खासदार राऊत यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांना असल्याचा दावा बडगुजर यांनी केला.

### 'कोणाला आशीर्वाद द्यावेत, हा ज्याचा, त्याचा प्रश्न'

एखाद्याच्या मंगल कार्यात कोणाकडून कोणाला आशीर्वाद द्यावेत, हा ज्याचा, त्याचा प्रश्न आहे. मंगलमय लोकांनी अशा कार्याला यायचे असते. त्यांनी कोणाला बोलावले माहिती नाही, अशा शब्दांत खासदार संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दौऱ्यावर भाष्य केले. ठाकरे गटाचे महानगरप्रमुख विलास शिंदे यांच्या घरी विवाह सोहळा आहे. आम्ही सर्व इथे आहोत. कोण कोणाच्या लग्नाला येत आहे, हा राजकीय आणि राष्ट्रीय विषय नसल्याचे त्यांनी सूचित केले.

### एकनाथ शिंदेंकडून विलास शिंदेंचे कौतुक

विलास शिंदे हा शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा कट्टर शिवसैनिक आहे. अनेक वर्षे आम्ही बरोबर काम केले आहे. कार्यकर्त्याच्या घरी मंगल कार्य असले तर त्याची सर्वांनी यावे, अशी अपेक्षा असते. शेवटी शिंदे शिंदेंकडेच येणार, नाही तर कोण येणार, असा प्रश्न करीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हे मंगल कार्यालय असून राजकीय गणित येथे मांडणार नसल्याचे सूचक विधान केले. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी ठाकरे गटाचे महानगरप्रमुख शिंदे यांचे कौतुक केल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या. यावेळी शिक्षणमंत्री दादा भुसे, आमदार किशोर दराडे, माजी आमदार नरेंद्र दराडे, उपनेते तथा जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते उपस्थित होते.

# एक हजारावर बेनामी लोकांना जन्मदाखले

## किरीट सोमय्या यांचा आरोप

**लोकसत्ता वार्ताहर**

**मालेगाव :** कार्यकारी दंडाधिकारी म्हणून तहसीलदार यांनी आदेश दिलेला नसताना मालेगाव महापालिकेकडून एक हजारावर बेनामी लोकांना परस्पर जन्मदाखले वितरित करण्यात आल्याचा नवीन आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला आहे. हे दाखले मिळविणाऱ्यांमध्ये बांगलादेशी, रोहिंग्यांचा समावेश असण्याची शक्यता असल्याने हे कृत्य देशद्रोहाचे असल्याचा सूर देखील त्यांनी लावला.

सोमय्या यांनी सोमवारी मालेगावला भेट देत महापालिका आयुक्त रवींद्र जाधव, अप्पर पोलीस अधीक्षक तेजबीरसिंग संधू यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर किल्ला पोलीस ठाण्यात जाऊन त्यांनी तक्रार केली. काही कारणास्तव वेळेवर जन्म नोंद होऊ न शकलेल्या नागरिकांना कार्यकारी दंडाधिकारी म्हणून तहसीलदार यांच्या आदेशान्वये विलंबाने जन्म दाखले देण्याची कार्यपद्धती आहे. या कार्यपद्धतीचा गैरफायदा घेत वर्षभरात मालेगावातून मोठ्या प्रमाणावर बनावट जन्मदाखले वितरित झाल्याची तक्रार सोमय्या यांनी केली होती. त्यानुसार येथील छावणी पोलीस ठाण्यात तीन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पूर्वीच्या तीन प्रकरणांमध्ये बनावट कागदपत्रांच्या आधारे तहसीलदारांकडून आदेश प्राप्त करून जन्म दाखले मिळविले, या संशयावरून गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यामुळे सुमारे तीन हजार जन्म दाखले रद्द करण्याची कारवाई देखील महसूल प्रशासनातर्फे करण्यात आली आहे. आता नव्याने आरोप करताना तहसीलदारांकडून आदेश झालेला नसताना मालेगाव पालिकेकडून एक हजारावर जन्मदाखले वितरित करण्यात आल्याचे सोमय्या यांचे म्हणणे आहे. यापैकी ४० जणांनी या जन्मदाखल्यांच्या आधारे पारपत्र मिळवले, असा दावा करून या प्रकरणी पालिका अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणीही केली.

# रेल्वे स्थानकात तरुणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**लोकसत्ता वार्ताहर**

**मनमाड –** उत्तर भारताचे प्रवेशद्वार म्हणून ओळखले जाणारे मनमाड रेल्वे स्थानक नेहमीच चर्चेत असते, एक तरुण आत्महत्या करण्याच्या उद्देशाने अचानक पादचारी पुलाबाहेरील बाजूस चढला. जवळच उच्चदाबाची ओव्हरहेड वायर असल्याने रेल्वे स्थानक परिसरात एकच खळबळ उडाली. तब्बल दीड ते दोन तास हा युवक वरतीच होता. सुरक्षा रक्षकांनी त्यास सुखरूप बाहेर काढल्याने अनर्थ टळला.

रविवारी हा प्रकार घडला. मनमाड रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक चारवर असलेल्या पादचारी पुलाबाहेरील बाजूस एक तरुण आत्महत्या करण्याच्या उद्देशाने चढला. जवळच उच्च दाबाच्या ओव्हरहेड वायर असल्याने स्थानक परिसरात खळबळ उडाली. जवळपास दोन, अडीच तासानंतर या तरुणाला खाली उतरविण्यात आले.

संबंधित तरुणाची चौकशी केला असता, तो झारखंड राज्यातील असल्याची माहिती मिळाली असून रेल्वे सुरक्षा बलाच्या अधिकाऱ्यांनी त्याला ताब्यात घेतले. यापूर्वी देखील या रेल्वे स्थानकात एक माथेफिरू व्यक्ती स्थानकातील गाडीवर आणि स्थानकात असलेल्या शेडवर चढल्याची घटना घडली आहे.




महामार्गावरील द्वारका चौकातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी अनेक उपाय योजले गेले आहेत. परंतु, काहीही फरक पडलेला नाही. सध्या या चौकात दुरुस्ती कामामुळे वाहतूक कोंडीत भर पडत आहे. (छायाचित्र- यतीश भानू)

# नाशिकमध्ये पुन्हा एकाची हत्या

## दोन संशयित ताब्यात

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नाशिक :** शहरातील हत्यासत्र थांबण्याची चिन्हे दिसत नसून रविवारी मध्यरात्री पंचवटीत पेठरोडवरील फुले नगरातील गौडवाडीत एका मध्यमवयीन व्यक्तीची हत्या करण्यात आली. पंचवटी पोलिसांनी अवघ्या चार तासात दोन संशयितांना ताब्यात घेतले.

रविवारी मध्यरात्री १२ ते दोन या वेळेत फुले नगरातील महानगरपालिका शाळा क्रमांक ५६ समोर एका किराणा दुकानाजवळ संजय सासे (४०, रा. महालक्ष्मी चाळ) हे बसलेले असताना संशयितांनी डोक्यात विटांचे प्रहार करुन त्यांची हत्या केली. हा प्रकार अन्य लोकांच्या लक्षात येताच मारेकऱ्यांनी पळ काढला. याबाबत पंचवटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. आयुक्त संदीप कर्णिक, उपआयुक्त किरणकुमार चव्हाण, सहायक आयुक्त पद्मजा बढे यांनी संशयितांना पकडण्याविषयी सूचना केल्यानंतर पंचवटी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक मधुकर कड यांनी घटनास्थळी पाहणी केली.

### 'कॉमन मॅन' सुरक्षित आहे काय?

काही महिन्यांपासून शहर हत्यांमुळे गाजत आहे. एकमेकांना शह देण्यासाठी, मागील भांडणाची कुरापत काढत, सामाजिक दहशत पसरविण्यासाठी मुडदे पाडले जात आहेत. समाजकंटकांच्या कारवाया सामान्यांना नवीन नाहीत. परंतु, बुधवारी पैशांसाठी १९ वर्षीय युवकाची झालेली हत्या, बहिणीच्या एकतर्फी प्रेमप्रकरणात युवकाची झालेली हत्या, संजय सासे यांची हत्या, विधीसंघर्षित बालकांना गुन्हेगारी विश्वाची पडलेली भुरळ पाहता काही प्रकरणांमध्ये आता सामान्य माणसेही शस्त्र किंवा मिळेल ते हत्यार घेत कायदा व सुव्यवस्था हातात घेत आहेत. कायद्याचा धाक राहिलेला नाही. पोलिसांचा दंडुका केवळ जमाव पांगविण्यासाठी राहिला आहे काय, अशी साशंकता व्यक्त होत आहे.

# दत्तक शहराची काय वाट लागली ते जाणून घ्या...

## संजय राऊत यांची देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नाशिक –** नाशिक हे मुख्यमंत्र्यांनी दत्तक घेतलेले शहर आहे. परंतु, या शहराचा त्यांनी अनाथआश्रम करून टाकला. त्यांनी दोन दिवस संपूर्ण शहरात फिरावे. बरोबर प्रत्येक पक्षाचे दोन माजी नगरसेवक घ्यावेत. शहरातील कचरा, रस्त्यावरील खड्डे, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अशा वेगवेगळ्या समस्या जाणून घ्याव्यात. शहराची काय वाट लागली ते तुम्हाला कळेल, अशी टीका शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी केली.

महापालिका निवडणुकीच्या तयारीसाठी नाशिक दौऱ्यावर आलेले खासदार राऊत यांनी सोमवारी पत्रकारांशी संवाद साधला. राज्य तसेच केंद्र सरकारच्या कार्यशैलीवर त्यांनी ताशेरे ओढले. कुंभमेळ्यासाठी साडेसहा हजार कोटींचा निधी दिला जाणार आहे. प्रयागराज पासून नाशिकपर्यंत तो किती आणि कसा येतो, कुठे खर्च केला जातो, हे पहायला हवे. प्रयागराज कुंभमेळ्यात ठेकेदार गुजरातचे होते. नाशिक मध्येही तेच होणार आहे. साडेतीन वर्षांपासून प्रशासकाच्या माध्यमातून महापालिका लुटल्या जात आहेत. आयुक्तांच्या खांद्यावर बंदुका ठेवत लुटमार सुरू आहे. निवडणुका होऊ दिल्या नाहीत. ही कुठली लोकशाही, असा प्रश्न राऊत यांनी उपस्थित केला. नागरिकांना प्राथमिक सुविधांसाठी अधिकाऱ्यांवर अवलंबून राहावे लागत आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना राज्याच्या प्रश्नांविषयी गांभीर्य नाही. ठेकेदारांकडून पैसे घेणे, पक्ष फोडणे, पैसे वाटणे हीच कामे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री करीत आहेत, अशी टीकाही त्यांनी केली. नाशिकला अद्याप पालकमंत्री नाही. पालकमंत्र्यांशिवाय काय अडले आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले ते खरे आहे. पैसे लुटमार करण्यासाठी पालकमंत्रीपद तयार केले. लाडक्या बहिणी योजनेतील घोटाळ्यासाठी अर्थ विभाग जबाबदार आहे. अर्थ खात्यातून ही लूट झाली असल्याने अजित पवार यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीही राऊत यांनी केली.

### फडणवीस शंकराचार्य झाले का ?

नाशिक येथील एका कार्यक्रमात मुख्यमंत्री यांनी एक हैं तो सेफ हैं, असा नारा दिला. आपण हिंदू आहोत. सनातन धर्म मानतो, असे ते म्हणाले. फडणवीस आता शंकराचार्य महाराज झाले का, असा प्रश्न खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला.

# अमली पदार्थविरोधी मोहिमेत महिनाभरात २२ गुन्हे

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नाशिक –** नाशिक ग्रामीण पोलिसांनी राबवलेल्या अमली पदार्थ विरोधी मोहिमेतंर्गत मे महिन्यात २२ गुन्हे दाखल झाले असून २९ संशयितांना अटक करण्यात आली. या विशेष मोहिमेत आठ लाख ४९ हजार २७९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ग्रामीण पोलिसांनी अमली पदार्थ विरोधात जिल्हा परिसरात ४० पोलीस ठाण्यातंर्गत विशेष मोहीम राबवली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अमली पदार्थांची तस्करी, वाहतूक आणि विक्री करणारे तसेच



अमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यांवर कारवाई केली. नाशिक ग्रामीणमध्ये २२ गुन्हे दाखल असून २९ संशयित अटकेत आहेत. त्यांच्याकडून गांजा, कोडीन फॉस्फेट, भांग असे पदार्थ जप्त करण्यात आले. याशिवाय गांजा सेवन करणाऱ्या आठ जणांवरही कारवाई झाली. या कारवाईत आठ लाख ४९,२७९ किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



उड्डाणपुलाखालील स्तंभांवर रेखाटलेल्या चित्रांची पाहणी करताना मंत्री गिरीश महाजन यांच्याभोवती स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी फोटो काढण्यासाठी गर्दी केली. त्यामुळे महामार्गावरील वाहतूक काही वेळ थांबवून ठेवावी लागली.

# मंत्र्यांबरोबरचे 'फोटोसेशन' अन् रस्त्यावर कोंडी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नाशिक –** कुंभमेळा तयारीच्या अनुषंगाने नाशिक दौऱ्यावर असणारे राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी सोमवारी मुंबई-आग्रा महामार्गावरील उड्डाण पुलाखालील भागात रेखाटलेल्या चित्रांची पाहणी केली. यावेळी भाजपचे स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी स्वागत तसेच छायाचित्र काढण्यासाठी गर्दी केली. १५ मिनिटे हे 'फोटोसेशन' सुरू होते. त्यामुळे वाहतुकीचा खोळंबा झाला.

रविवारपासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नाशिक दौऱ्यावर होते. कुंभमेळा तयारीचा आढावा, साधू-महंतांसोबत बैठक आदी नियोजनासाठी कुंभमेळ्याची जबाबदारी सांभाळणारे गिरीश महाजन हे देखील नाशिकमध्ये होते. सोमवारी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत महामार्गालगतच्या वडाळा नाका भागात एका खासगी रुग्णालयाचे उद्घाटन झाले. या दौऱ्यानंतर मुख्यमंत्री उड्डाण पुलाखालील भागात रेखाटलेल्या चित्रांची पाहणी करण्याचे नियोजन होते. परंतु, ऐनवेळी पाहणी रद्द करत ते पुढील कार्यक्रमासाठी मार्गस्थ झाले. मग, उड्डाण पुलाखालील चित्रांची पाहणी करण्यासाठी मंत्री महाजन तिथे पोहोचले. या ठिकाणी चित्र रेखाटणारा चित्रकार, भाजपचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते जमलेले होते. दुपारी दीड वाजता महाजन यांनी चित्रांची पाहणी केली. यावेळी भाजपचे स्थानिक कार्यकर्ते पुढे आले.

अनेकांनी त्यांच्यासमवेत छायाचित्रे टिपली. यामुळे उड्डाण पुलाखालील द्वारकाकडून मुंबई नाक्याकडे जाणाऱ्या मार्गावरील वाहतूक खोळंबली. स्वागत, सत्कार स्वीकारून महाजन यांचा ताफा मार्गस्थ झाल्यानंतर काही वेळाने या मार्गावरील वाहतूक सुरळीत झाल्याचे प्रत्यक्षदर्शींकडून सांगण्यात आले.

# कुंभमेळ्यावर प्रभावासाठी भाजप मित्रपक्षांपेक्षा एक पाऊल पुढे

**अनिकेत साठे, लोकसत्ता**

**नाशिक :** सिंहस्थ कुंभमेळा हिंदू धर्मियांचा सर्वात मोठा उत्सव म्हणून ओळखला जातो. त्यामुळेच नाशिक-त्र्यंबकेश्वर येथील कुंभमेळ्यावर आपलाच प्रभाव राहील, याची पुरेपूर खबरदारी भाजपकडून घेतली जात आहे. त्यासाठी महायुतीत वादाचा केंद्रबिंदू ठरलेल्या नाशिकच्या पालकमंत्रीपदाचा विषयही पूर्णतः बाजुला ठेवत भाजपने कुंभमेळ्याचे नियोजन पुढे नेण्याची तयारी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नाशिक दौऱ्यात ते अधोरेखीत झाले.

नाशिकच्या पालकमंत्रीपदाचा पेच पाच-सहा महिन्यांपासून सुटलेला नाही. अलीकडेच छगन भुजबळ हे मंत्री झाल्यानंतर सर्वाधिक सात आमदार असणाऱ्या

**कुंभमेळ्यावर आपलाच प्रभाव राहील, याची पुरेपूर खबरदारी भाजपकडून घेतली जात आहे.**



राष्ट्रवादीने (अजित पवार) पुन्हा या पदावर दावा सांगण्यास सुरुवात केली. यापूर्वी भाजपचे मंत्री गिरीश महाजन यांची नाशिकच्या पालकमंत्री नियुक्ती झाली होती. परंतु, शिवसेनेच्या (एकनाथ शिंदे) विरोधामुळे त्यास स्थगिती द्यावी लागली. जिल्ह्यात दोन आमदार असणाऱ्या शिंदे गटाला हे पद हवे आहे. महायुतीतील कुणीही माघार घेत नसल्याने हा विषय रखडलेला आहे. या परिस्थितीचा कुंभमेळा नियोजनावर परिणाम होऊ नये, अशी तयारी भाजपने केली आहे. मागील कुंभमेळ्यात नियोजन, अंमलबजावणी, देशभरातील साधू-महंत व भाविकांचे आदरातिथ्य यावर भाजपचे एकहाती वर्चस्व होते. यशस्वी नियोजनाचे राजकीय लाभ होतात. त्यामुळे आगामी कुंभमेळ्यात त्याची पुनरावृत्ती करण्याचा भाजपचा प्रयत्न आहे.

कुंभमेळ्यासाठी स्थापन केलेल्या शिखर समितीचे अध्यक्षपद मुख्यमंत्री या नात्याने देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आहे. भाजपचे संकटमोचक अशी प्रतिमा तयार झालेले गिरीश महाजन यांच्यावर कुंभमेळ्याची जबाबदारी सोपविली गेली आहे. उभयतांकडून तयारीला वेग दिला जात आहे. यातून नाशिकला पालकमंत्री असला किंवा नसला तरी काहीही फरक पडत नसल्याचा संदेश दिला गेला. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दौऱ्यात साधू-महंतांशी प्रथमच बैठकीतून संवाद साधला गेला. महत्वाची बाब म्हणजे त्र्यंबकेश्वरमधील शैवपंथीय आणि नाशिकमधील वैष्णवपंथीय महंत आपसातील मतभेद बाजुला ठेवून यात सहभागी झाले होते. शासकीय आणि प्रशासकीय आदरातिथ्याने ते तृप्त झाले. मागील दौऱ्यात मुख्यमंत्री फडणवीस यांनी नाशिकचा पालकमंत्री निश्चित होत नाही, तोपर्यंत मीच पालकमंत्री असल्याचे म्हटले होते. यावेळी कुंभमेळ्यातील मुख्य पर्वण्यांचे मुहूर्त निश्चित झाले. पालकमंत्रीपदाला मुहूर्त कधी लाभणार, या प्रश्नावर त्यांनी पालकमंत्री येतात, जातात. त्यांचा काय संबंध, नाशिकला पालकमंत्री नसल्यामुळे काही अडले आहे का, असा प्रश्न केला.

कुंभमेळा मंत्री म्हणून गिरीश महाजन काम पाहत आहेत. दादा भुसे, नरहरी झिरवळ, छगन भुजबळ आदी मंत्री बरोबर आहेत. काही कमी पडल्यास आम्ही आहोत. कोणीही काळजी करू नये. सिंहस्थ कुंभमेळा हे आपले धार्मिक व सांस्कृतिक पर्व आहे. यामध्ये राजकारण आणू नका, असा सूचक संदेश त्यांनी सर्वांनाच दिल्याचे मानले जाते.

# जलवाहिनी दुरुस्तीला अखेर मुहूर्त

## पाणीपुरवठा पुढील काही दिवस विस्कळीत

**लोकसत्ता वार्ताहर**

**मनमाड :** शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या मुख्य वाहिनीला जेसीबीची धडक बसल्याने ४८ तासात लाखो लिटर पाणी वाहून गेल्यानंतर सोमवारी या जलवाहिनीची दुरूस्ती नगरपालिकेतर्फे युध्द पातळीवर सुरू झाली.

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या वागदर्डी धरण ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पाण्याच्या टाकीदरम्यान १८ इंची लोखंडी मुख्य जल वाहिनी पांझण-रामगुळणा संगमावर पुलाखाली जेसीबीची धडक बसल्याने फुटली. दोन दिवसांत लाखो लिटर पाणी वाहून गेले. त्यामुळे पुढील सप्ताहात मनमाडच्या गावठाण भागासह चंदनवाडी, गर्डर शॉपमधील पाणीपुरवठा पुढील काही दिवस विस्कळीत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ही जलवाहिनी ४० वर्षे जुनी आहे.

पाईपचा तुकडा, जोडणी व दुरुस्तीसाठी लागणारे साहित्य नव्याने बनवून घ्यावे लागल्याने दोन दिवस काम ठप्प होते. सोमवारी सकाळी पालिकेतील पाणीपुरवठा विभागातील कर्मचारी व कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे तुटलेल्या जलवाहिनीची युध्द पातळीवर दुरूस्ती हाती घेतली. पांझण-रामगुळणा संगमावर पुलाखाली पाण्यात उतरून पुन्हा जेसीबीचीच मदत घेवून काम सुरू आहे. मंगळवारी सायंकाळपर्यंत दुरूस्तीचे काम पूर्ण होईल, असे पालिकेचे पाणी वितरण अधिकारी किरण आहेर यांनी सांगितले.

दरम्यान, दुरूस्तीनंतरही सुमारे २४ तास चाचणीसाठी लागतील. त्यानंतर वागदर्डी ते छत्रपती शिवाजी महाराज चौकदरम्यान वाहिनी पूर्ण क्षमतेने व दाबाने भरण्यासाठी २४ तास लागणार आहेत.



### आणखी दोन ते तीन दिवस व्यत्यय

सध्या मनमाड शहराला १३ ते १४ दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. ही मुख्य वाहिनी फुटल्यामुळे तसेच वीज पुरवठ्यात येणाऱ्या व्यत्ययामुळे शहराच्या पाणी पुरवठ्यात आणखी दोन ते तीन दिवस व्यत्यय येण्याची शक्यता आहे.

ही वाहिनी (पाईपलाईन) जुनाट असल्याने ती दुरूस्त करण्यासाठी लागणारे साहित्य गोळा करण्यात दोन दिवस गेले. मात्र पुढील ३६ तासात दुरूस्ती व चाचणी पूर्ण होईल. नागरिकांनी सहकार्य करावे.
**– शेषराव चौधरी** (प्रशासक तथा मुख्याधिकारी, मनमाड नगरपालिका)

# संक्षिप्त

## सौंदाण्यात माजी विद्यार्थी मेळावा

**नाशिक :** मालेगाव तालुक्यातील सौंदाणे येथील दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा कर्मवीर भाऊसाहेब हिरे शेक्षणिक संस्थेच्या जनता विद्यालयात झाला. अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक ए. व्ही. देवरे होते. कार्यक्रमास तत्कालीन शिक्षक श्रीराम पवार, एस. आर. ठोके, एस. जी. शेवाळे, एकनाथ देसले, मुख्याध्यापक चव्हाण, शिपाई पवार व्यासपीठावर उपस्थित होते. माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. माजी विद्यार्थ्यांच्या वर्गांचा तास घेऊन तत्कालीन वर्गशिक्षकांनी मार्गदर्शन केले.

## वारली चित्रसृष्टी कार्यशाळा

**नाशिक :** उन्हाळी सुट्टीनिमित्त वारली चित्रशैली कार्यशाळेचे आयोजन इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) आणि वारली आर्ट फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. शालिमार येथील आयएमए सभागृहात आठ जून रोजी होणाऱ्या कार्यशाळेत सकाळी ११.३० ते दुपारी ४.३० या वेळेत वारली चित्रशैली तज्ज्ञ संजय देवधर वारली कलेचे प्राथमिक प्रशिक्षण देतील. १० वर्षांवरील कोणालाही या कार्यशाळेत प्रवेश घेता येईल. नाव नोंदणीसाठी ९४२२२७२७५५ या क्रमांकावर संपर्क साधावा, जास्तीत जास्त डॉक्टर, त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयएमए नाशिक शाखेचे अध्यक्ष डॉ. नीलेश निकम, सचिव डॉ. मनिषा जगताप, समन्वयक डॉ. स्वाती चव्हाण, डॉ.अनुप भारती व सहकाऱ्यांनी केले आहे.

## नरेडको नाशिकतर्फे ज्ञानसत्राचे आयोजन

**नाशिक :** नरेडको नाशिकच्यावतीने आयोजित कार्यक्रमात अर्थशास्त्र विश्लेषक डॉ. अंकित शाह यांनी ऑपरेशन सिंदूर आणि जागतिक आर्थिक पुनर्रचना या विषयावर मार्गदर्शन केले. सध्याच्या जागतिक घडामोडी, भारताची भूमिका, आर्थिक प्रणालीतील बदल, तसेच भविष्यातील धोरणात्मक दृष्टीकोन यावर आधारीत त्यांनी मांडणी केली. या ज्ञानसत्राच्या आयोजनात इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया नाशिक शाखा आणि यंग इंडियन्सचे सहकार्य लाभले. या संघटनांचे नरेडको नाशिकच्यावतीने आभार मानण्यात आले. उपक्रम यशस्वीतेसाठी नरेडकोचे सदस्य भाविक ठक्कर यांनी पुढाकार घेतला. सूत्रसंचालन प्रसन्न सायखेडकर यांनी केले. आभार अभय नेरकर यांनी मानले.

## प्रतिभा सन्मान सोहळा

**नाशिक :** शहर परिसरातील खाजगी शिकवणी वर्ग संघटना आणि संदीप विद्यापीठ यांच्या सहकार्याने आठ जून रोजी सकाळी १० वाजता गुरूदक्षिणा सभागृहात प्रतिभा सन्मान पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष जयंत मुळे यांनी दिली. संस्थेच्या वतीने समाजसेवेसाठी भरीव योगदान देणाऱ्या पाच शिक्षकांना जीवनगौरव पुरस्कार आणि १५ वर्षांपेक्षा जास्त काळ शिकवणीवर्ग घेणाऱ्या शिक्षकांना द्यद्य दि बेस्ट कोचिंग टिचर्स अवॉर्डस द्यद्य ची घोषणा करण्यात आली. दहावी आणि बारावीच्या प्रत्येक शिकवणी वर्गात प्रथम आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

## अपंग विद्यार्थ्यांना व्यवसाय मार्गदर्शन

**नाशिक :** दिंडोरी पंचायत समितीतील समग्र शिक्षा समावेशित शिक्षण विभाग व प्रथम संस्था यांचे वतीने अपंग विद्यार्थ्यांसाठी तालुकास्तरीय व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेसाठी तालुक्यातील इयत्ता दहावी व बारावीतील उत्तीर्ण अपंग विद्यार्थी व त्यांचे पालक उपस्थित होते. मुलींसाठी परिरचारिका प्रशिक्षण दिले जाणार असल्याचे संस्थेचे क्रिएटिव्हिटी क्लबचे समन्वयक राजेश साळवे यांनी सांगितले.

# संत निवृत्तीनाथ पालखी मार्गावरील तालुक्यांना तयारीच्या सूचना

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नाशिक :** संत निवृत्तीनाथ महाराज आषाढी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित नियोजन बैठकीत पालखी मार्गावरील तालुक्यांना तयार राहण्याचे निर्देश देण्यात आले.

संत निवृत्तीनाथ संस्थानच्या पालखी मार्गावरील ग्रामपंचायती तसेच संबंधित प्रशासकीय यंत्रणांची संयुक्त बैठक जिल्हा परिषदेच्या प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रतिभा संगमनेरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत पालखी मार्गावरील गावांमध्ये विविध विभागांमध्ये समन्वय ठेवून नियोजनबद्ध कार्यवाही करण्यावर भर देण्यात आला.

त्र्यंबकेश्वर, नाशिक आणि सिन्नर तालुक्यांतील गटविकास अधिकाऱ्यांना स्वतंत्रपणे तालुकास्तरीय यंत्रणांची बैठक घेऊन तयार राहण्याचे निर्देश दिले. वारीत हजारो भाविक सहभागी होतात. त्यामुळे आरोग्य तपासणी, स्वच्छता व्यवस्था आणि निवाऱ्याची सोय ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे यांना साथीच्या आजारांच्या प्रतिबंधासाठी आवश्यक औषधांचा साठा उपलब्ध ठेवण्यास तसेच औषधांची कालबाह्यता तारीख तपासण्याचे निर्देश दिले.

# पी. व्ही. नरसिंहराव यांच्यापासून आमिर खानपर्यंत...

## दिग्गज व्यक्तिमत्वांच्या वैशिष्ट्यांची भावना भार्गवे स्मृती व्याख्यानमालेत मांडणी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नाशिक –** भाजपचे दिवंगत नेते प्रमोद महाजन यांचा राष्ट्रीय पातळीवर दबदबा होता. त्यांनी दिल्लीत जशी सत्ता उपभोगली, तशी आजपर्यंत महाराष्ट्रातील कोणीही उपभोगली नाही. माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी कराडच्या साहित्य संमेलनात अस्सल मराठीत भाषण केले होते. क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरला अजितसारखा भाऊ होता, म्हणून तो सचिन होऊ शकला. तसा भाऊ आपल्याला नाही, या विनोद कांबळीच्या म्हणण्यात तथ्य वाटते. कारण तसा भाऊ असता तर शैलीदार फलंदाजी करणाऱ्या विनोदचे तारू भरकटले नसते... विविध क्षेत्रातील दिग्गजांच्या व्यक्तिमत्वांचे प्रतिबिंब ज्येष्ठ पत्रकार राजीव खांडेकर यांच्या 'माणसं उमगलेली, उमजलेली...!' या व्याख्यानातून उमटले.



येथील दवप्रभा प्रॉडक्शनच्यावतीने शिक्षणतज्ज्ञ भावना भार्गवे स्मृती व्याख्यानमालेत ११ वे पुष्प ज्येष्ठ पत्रकार खांडेकर यांनी गुंफले. शंकराचार्य संकुलातील डॉ. कुर्तकोटी सभागृहात झालेल्या कार्यक्रमास रसिकांचा प्रतिसाद मिळाला. प्रारंभी प्रा. वृन्दा भार्गवे यांनी प्रास्ताविक केले. न्यासाचे कार्यवाह प्रमोद भार्गवे यांनी स्वागत केले.

**आडवी विधाने :** (१) हिमाचल प्रदेशातील पार्वती नदीच्या काठावर वसलेले हे धार्मिक पर्यटनस्थळ त्याच्या गरम पाण्याच्या कुंडांसाठी प्रसिद्ध आहे. (४) सोशिकपणा, सहनशील (७) होम, अग्नीत आहुती टाकणे (८) कर्ज फेडण्यास असमर्थ, गरीब (९) परीक्षेत/मुलाखतीत अयशस्वी ठरलेला (११) एक मराठी गाजलेले नाटक एकच XX (१२) अनिश्चित, अस्पष्ट (१४) छाप, प्रभाव, शिक्का (१५) कणसे कापल्यानंतर उरणारी जोंधळ्याची ताटे (१६) जोडा, पायताण (१७) अमिताभ बच्चन व अमृता सिंगचा एक हिंदी सिनेमा (१८) करंडा, आगगाडीच्या रांगेतील पेटी (२०) बूड, गाड्या थांबण्याचे ठिकाण (२१) भिंग (२३) तपकीर (२५) तुकडा, चावा (२७) पोपट, रावा (२८) महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी सर्वाधिक काळ विराजमान असणारे (फक्त आडनाव) (२९) एक वृक्ष-याला पाने तीन (३१) शिकार (३२) रव्यापासून तयार होणारा एक गोड पदार्थ (३३) रोकड, पैशासंबंधी (३५) हकालपट्टी (३६) एकेक बाब निरनिराळी घेऊन

**उभी विधाने :** (१) इस्लाम धर्माच्या तीन पवित्र शहरांपैकी एक, हे सौदी अरेबियात आहे (२) अनुमान (३) ताठा, गुर्मी (४) नेहमी, निरंतर (५) मनोभंग, निराशा, विरस (६) कसरत, व्यायाम, आखाडा, व्यायामशाळा (८) गटार (१०) वाहन न वापरता जमिनीवर लढणारे सैन्य (११) गुरुदत्त व वहिदा रेहमानचा गाजलेला हिंदी चित्रपट (१३) अचानक झालेला लाभ (१४) सतत होणाऱ्या वेदना, ठसठसणे (१५) प्रत्यक्ष यमासारखा भयंकर मनुष्य (१६) द्रवरुप, बारीक, पाचवारी साडी (१९) तीन ते पाच वर्षांच्या मुलांची शाळा (२२) हलणारे, विनाशी (२४) शिरजोर, भारी, न जुमानणारा (२६) चापट, थप्पड (२८) नाम, नौका (३०) XXX बेवफा - सलमान खानचा एक हिंदी चित्रपट (३१) सिंहासन, मुंबई दिनांक या चित्रपटाचे लेखक अरुण XX (३४) रानरेडा

– चारू नानल

## सुडोकू - १२८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ५ | | ९ | | १ | | २ | |
| ३ | | २ | | | | १ | | ४ |
| | | ९ | | २ | | ६ | | |
| ९ | | | | ८ | | | | १ |
| | | ३ | | | | २ | | |
| ८ | | | | ६ | | | | ५ |
| | | ७ | | ३ | | ८ | | |
| ६ | | ८ | | | | ५ | | २ |
| | ९ | | ७ | | ८ | | ६ | |

## सुडोकू - १२७चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ५ | १ | ७ | ६ | ९ | २ | ३ | ८ |
| ९ | ७ | २ | १ | ३ | ८ | ६ | ५ | ४ |
| ६ | ८ | ३ | २ | ५ | ४ | ९ | १ | ७ |
| ८ | २ | ४ | ६ | १ | ३ | ७ | ९ | ५ |
| ५ | ३ | ९ | ४ | ७ | २ | १ | ८ | ६ |
| ७ | १ | ६ | ९ | ८ | ५ | ३ | ४ | २ |
| २ | ९ | ७ | ५ | ४ | १ | ८ | ६ | ३ |
| ३ | ६ | ५ | ८ | ९ | ७ | ४ | २ | १ |
| १ | ४ | ८ | ३ | २ | ६ | ५ | ७ | ९ |

## शब्दकोडे -१२७चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वृ | द्धा | प | का | ळ | ■ | आ | रा | ध | ना |
| त्त | ■ | द | म | ■ | व्या | ख्या | न | ■ | रा |
| प | था | री | ■ | सो | पा | न | ■ | पे | य |
| त्र | ■ | प | सा | ■ | र | ■ | सु | र | ण |
| ■ | ध | ड | ग | त | ■ | पे | ■ | णे | ■ |
| द | म | णे | ■ | रु | ख | रु | ख | ■ | का |
| ब | क | ■ | घो | ण | स | ■ | ग | म | क |
| द | ■ | खा | डा | ■ | ख | त | ■ | जु | डी |
| बा | लि | का | ■ | उ | स | न | वा | री | ■ |
| ■ | पी | ■ | ता | टी | ■ | या | दी | ■ | पी |

# हृदयाच्या आरोग्यासाठी गाढ झोप आवश्यक

आरोग्य वार्ता

**नवी दिल्ली :** चुकीची आहार पद्धती आणि दैनंदिन व्यायामाचा अभाव आहे, अशा लोकांच्या हृदयाचे आरोग्य बिघडत, असा सर्वसाधारण समज आहे. परंतु, तज्ज्ञांच्या मते, हृदयाचे आरोग्य बिघडण्यास अनेक घटक कारणीभूत आहेत, ज्याची बहुतेकांन जाणिवही नसते. परंतु, हृदयाचे आरोग्य राखण्यासाठी त्यावर बोलून आणि काही सवयी बदलल्यास, ते राखण्याची हीच वेळ आहे, असे ते सांगतात.

हृदयरोगासाठी पुरेशी झोप न मिळणे हा सर्वात मोठा धोका आहे. जर तुम्ही अनेकदा उशिरापर्यंत झोपत असाल किंवा पुरेशी विश्रांती घेतली नाही, तर तुमचे हृदय धोक्यात आहे. ''गाढ झोपेची कमतरता ही बाब फुशारक्या मारण्यासाठी नाही, तर ते हृदयविकाराचा झटका आणि अचानक हृदयविकाराचा धोका लक्षणीयरीत्या वाढवते, प्रत्येक रात्री दर्जेदार झोप घेणे हे जास्त महत्त्वाचे असून तुमचे हृदय त्यावर अवलंबून आहे, यावर विचार करणे जास्त गरजेचे आहे असे तज्ज्ञ डॉक्टरांचे म्हणणे आहे. सणासुदीच्या काळात होणारे वायू प्रदूषण विशेषतः रहदारीमुळे धमनीचा वेग वाढतो. त्यामुळे हा धोका टाळण्यासाठी ज्यावेळी प्रदूषण जोरावर असते, तेव्हा स्वच्छ हवा कशी मिळेल याचा प्रयत्न करा, शक्य असल्यास घरी थांबा, याकडेही डॉ. गुप्ता लक्ष वेधतात. तसेच हृदयाचे आरोग्य राखण्यासाठी जनजागृती होण्यासह लोकांमध्ये सजगता यावी यावर त्या भर देतात.

कार लोन
किफायतशीर व्याजदर
7.90%* पासून पुढे
*अटी लागू (ROI p.a.)
कॉसमॉस को-ऑप. बँक लि.
(मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)
जीवन करा समृद्ध!
Toll Free No.: 1800 233 0234

डॉ. मानसी
Tanvi HERBALS
हर्बल तन्वीपॅथी
तन्वी तेज शिरोधारा
• शांत मन • ओव्हर थिंकिंग
• शांत झोप • हार्मोनल चेंजेस
डॉ. मानसी
डॉ. पुष्कराज
आजच डॉ. मानसी / डॉ. पुष्कराज यांचा सल्ला घ्या.
नाडीपरीक्षण मोफत करून घ्या
फ्री चेकअप कॅम्प
9833683021 अपॉइंटमेंट आवश्यक

# 'पुणे अॅग्री हॅकेथॉन'चे ढिसाळ नियोजन

## अनेक स्टॉल रिकामे; केवळ विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांचेच सादरीकरण

**दत्ता जाधव, लोकसत्ता**

**मुंबई :** राज्य सरकारच्या कृषी विभागाच्या वतीने पुण्यात देशातील पहिले आंतरराष्ट्रीय 'पुणे अॅग्री हॅकेथॉन' सुरू आहे. गेल्या दोन महिन्यांपासून या हॅकेथॉनची तयारी सुरू आहे. पण, हॅकेथॉनचे नियोजन ढिसाळ झाल्याचे समोर आले आहे. सहभागी विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. अनेक विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाचा भाग म्हणून तयार केलेल्या प्रकल्पांचेच (प्रोजेक्ट) सादरीकरण केले आहे. राज्याबाहेरील, देशाबाहेरील सहभागींची संख्याही अत्यल्प आहे. सादर केलेले प्रकल्पही अत्यंत प्राथमिक पातळीवरील आहेत.

कृषी विभागाच्या पुढाकाराने पुण्यात देशातील पहिले आंतरराष्ट्रीय पुणे अॅग्री हॅकेथॉन सुरू आहे. त्याची तयारी पाच एप्रिलपासून तयारी सुरू आहे. तीन दिवसीय हॅकेथॉनचा आज, मंगळवारी समारोप होणार असून, केंद्रीय कृषिमंत्री, मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री हजेरी लावणार आहेत. विभागाकडून मोठा गाजावाजा सुरू असला तरीही, प्रत्यक्षात ढिसाळ नियोजन असल्याचे समोर आले आहे.

सहभागींमध्ये कृषी, अभियांत्रिकी, संगणक शास्त्राच्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. विद्यार्थीकडून नव्या संकल्पना, प्रकल्पांचे सादरीकरण होणे अपेक्षित असले तरीही विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाचा भाग म्हणून महाविद्यालयात सादर केलेल्या प्रकल्पांचेच (प्रोजेक्ट) सादरीकरण हॅकेथॉनमध्ये केले आहे. शिवाय ते सादरीकरण अत्यंत प्राथमिक अवस्थेत आहेत.

### निरीक्षणे...

- विद्यार्थ्यांची सादरीकरणे अत्यंत प्राथमिक अवस्थेतील.
- अभ्यासक्रमाचा भाग म्हणून तयार केलेल्या सादरीकरणांची मांडणी.
- माती परीक्षण, ठिबक सिंचन, हवामान आधारीत कीड-रोग व्यवस्थापन, ऑनलाईन रोजगार, अवजारे बँक ॲपच्या सादरीकरणात नविन्याचा अभाव.
- रविवारी उद्घाटन झाल्यानंतर अनेक स्टॉल मोकळे.
- परीक्षकांकडून परीक्षण झाल्यानंतर अनेकांनी गाशा गुंडाळला.
- राज्याबाहेरील, देशाबाहेरील सादरीकरणे अपवादात्मक.
- सादरीकरणांना आर्थिक मदत देऊन व्यावसायिक वापर होण्यासाठी आर्थिक गुंतवणूकदारांची वानवा.
- काही कंपन्यांनी बाजारात उपलब्ध असलेल्या उत्पादनांचे सादरीकरण केल्यामुळे हॅकेथॉनच्या मूळ उद्देशालाच हारताळ फासला गेला.



देशातील हे पहिलेच अॅग्री हॅकेथॉन आहे. त्यामुळे नियोजनात काही त्रुटी राहिल्या असतील. पण, पुढील हॅकेथॉनमध्ये सर्व त्रुटी दूर केल्या जातील. दरवर्षी हॅकेथॉनचे आयोजन केले जाणार आहे. शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या परवडणारे आणि शेतीसाठी उपयोगी तंत्रज्ञानाचा शोध घेऊन, त्यांना आर्थिक, तांत्रिक मदत उपलब्ध करून देऊन संबंधित तंत्रज्ञानाची राज्यभरात अंमलबजावणी करण्याचे नियोजन आहे. सुमारे दहा हजार जणांनी हॅकेथॉनला भेट दिली आहे. शेतकऱ्यांसाठी आम्ही काही नाविन्यपूर्ण गोष्टी करीत आहोत, त्याचा शेतकऱ्यांना नक्कीच लाभ होईल.

**– जितेंद्र डुडी,** जिल्हाधिकारी, पुणे.

# जळगावात भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात बालकाचा मृत्यू

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**जळगाव :** शहरातील समतानगर नागेश्वर कॉलनी भागात भटक्या कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्यात घरासमोर खेळणाऱ्या चार वर्षीय बालकाचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी संध्याकाळी घडली. याप्रकरणी रामानंदनगर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली आहे.

अरविंद गायकवाड हा चार वर्षांचा बालक रविवारी संध्याकाळी इतर मुलांसोबत खेळत असताना, भटक्या कुत्र्यांनी त्याच्यावर अचानक हल्ला केला. त्यामुळे गंभीर दुखापत होऊन मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. अरविंदवर कुत्र्यांनी हल्ला केल्याचे लक्षात येताच आजुबाजूच्या रहिवाशांनी त्यांना हुसकावण्याचा प्रयत्न केला. मात्र. तोपर्यंत अरविंद रक्तबंबाळ झाला होता. रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच त्याचा जागेवर मृत्यू झाला होता.



या घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी भटके कुत्रे आणून सोडणाऱ्या महापालिका प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. तसेच चार वर्षीय बालकाच्या मृत्युची जबाबदारी आयुक्तांनी घ्यावी, अशी मागणी केली. भटक्या कुत्र्यांचा वेळीच बंदोबस्त न झाल्यास महापालिकेच्या विरोधात आंदोलन छेडण्याचा इशारा देखील यावेळी देण्यात आला. दरम्यान, नागेश्वर कॉलनीत भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात बालकाचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाल्यानंतर रामानंदनगर पोलीस ठाण्याचे कर्मचारी जितेंद्र तावडे घटनास्थळी पोहोचले. त्यांनी बालकाच्या मृत्युनंतर संतप्त झालेल्या जमावाला शांत केले.

मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यात शहरातील विविध भागात बालकांसह ज्येष्ठ नागरिक, महिला-पुरुष यापूर्वी अनेकवेळा जखमी झाले आहेत. कुत्रे चावल्याच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. रस्त्यावरील कुत्रे वाहनाच्या मागे लागल्यानेही अनेक अपघात घडले आहेत. निर्बीजीकरणावर यापूर्वी कोट्यवधी रुपये खर्च केले आहेत.

# राज्यात मलेरिया-डेंग्यूचे संकट गडद

## यंदा रुग्ण वाढण्याची भीती, तीन वर्षांत ६० हजारांहून अधिक रुग्ण

**संदीप आचार्य, लोकसत्ता**

**मुंबई :** महाराष्ट्रात पावसाळ्यात मलेरिया, डेंग्यू, चिकुनगुनिया यांसारख्या साथीच्या आजारांचे प्रमाण गेल्या तीन वर्षांत लक्षणीय वाढले आहे. यंदा मुदतपूर्व पावसामुळे राज्यात मलेरिया-डेंग्यूचे संकट गडद होणार असल्याचे आरोग्य विभागाच्या डॉक्टरांचे म्हणणे आहे. गेल्या तीन वर्षात डेंग्यू-मलेरियाचे ६० हजारांहून अधिक रुग्ण आढळल्याचे आरोग्य विभागाच्या सूत्रांनी सांगितले. मुंबईतही यंदा मलेरिया-डेंग्यूसह साथीचे आजार मोठ्या प्रमाणात डोके वर काढणार असल्याचे पालिकेच्या डॉक्टारांचे म्हणणे आहे.



राज्यात २०२२ मध्ये मलेरियाचे १५४५१ रुग्ण आढळले, तर २६ जणांचा मृत्यू झाला होता. २०२३ मध्ये १६१५८ मलेरिया रुग्ण आढळले, तर १४ जण मरण पावले. २०२४ मध्ये एप्रिलपर्यंत २१०७८ रुग्णांची नोंद झाली आणि २६ जणांचा मृत्यू झाला. मुंबई आणि गडचिरोलीत सर्वाधिक मलेरियाच्या रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. याच काळात डेग्यूच्या रुग्णही मोठ्या प्रमाणात आढळून आले असून २०२२ मध्ये ८५७८ रुग्ण तर २७ जणांचा मृत्यू झाला. २०२३ मध्ये १९०३४ रुग्ण आढळले, तर ५५ जणांचा डेग्यूमुळे मृत्यू झाला.

# भारतीय वनसेवा बदली धोरणाचा वनखात्याला विसर

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** भारतीय वनसेवा बदली धोरणाचा वनखात्याला विसर पडल्याचे चित्र आहे. या धोरणातील नियम धाब्यावर बसवून भारतीय वनसेवेतील अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या जात आहेत. विभागात पदस्थापना करताना संबंधित अधिकाऱ्यांनी केलेल्या चांगल्या कामाचा विचार करुनच नियुक्ती करावी, असे धोरणात नमूद आहे. मात्र, या धोरणालाच तिलांजली देण्याचे काम होताना दिसत आहे.

वनखात्याने २०१४ मध्ये भारतीय वनसेवेतील अधिकाऱ्यांच्या बदल्यासंदर्भात धोरण तयार केले होते. त्यासाठी समिती गठित करण्यात आली होती. यात राज्याच्या प्रमुख खात्यातील मुख्य सचिवांसह वनखात्यातील सचिवांचा समावेश होता. ज्या अधिकाऱ्यांनी वनविभागातील प्रादेशिक पदांवर एक किंवा दोन वेळा काम केले आहे, त्यांना पुन्हा अशाच प्रकारची नियुक्ती देणे योग्य नाही. वनसेवेत नव्याने रुजू होणाऱ्या भारतीय वनसेवेतील अधिकाऱ्यांना प्रादेशिक, वन्यजीव, सामाजिक वनीकरण यासारखी कार्यात्मक पदे देणे आवश्यक आहे, जेणेकरून त्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळू शकेल. वनविभागातील पदस्थापना करताना संबंधित अधिकाऱ्यांनी पूर्वी केलेल्या उत्तम कार्याचा विचार करूनच त्यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

IKF Home Finance
**आयकेएफ होम फायनान्स लिमिटेड**
प्लॉट क्र. ३०/अ, सर्वेक्षण क्र. ८३/१, माय होम ट्विट्झा, ११ वा मजला, डायमंड हिल्स, लुंबिनी अव्हेन्यू, ४००/२२०/१३२ केव्ही जीआयएस सबस्टेशन व्यतिरिक्त, एपीआयआयसी हैदराबाद नॉलेज सिटी, रायदुर्ग, हैदराबाद- ०८१. फोन: ०४०-२३४१२०८३. www.ikfhomefinance.com
**सरफेसी कायदा, २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना**

खाली नमूद केलेल्या कर्जदारांनी, सह-कर्जदारांनी आणि जामीनदारांनी तुमच्या स्थावर मालमत्ता गहाण ठेवून आयकेएफ होम फायनान्स लिमिटेड यांच्याकडून कर्ज सुविधा मिळवली आहे आणि त्याची परतफेड करण्यात ते डिफॉल्ट झाले आहेत. तुमच्या कर्जाच्या थकबाकीमुळे, तुमच्या कर्जांना आयकेएफ होम फायनान्स लिमिटेड यांनी नॉन-परफॉर्मिंग ॲसेट्स म्हणून वर्गीकृत केले आहे आणि म्हणूनच कर्ज घेण्यासाठी तुम्ही केलेल्या कागदपत्रांनुसार तुमच्याकडून मिळणाऱ्या सर्व हक्क, मालकी हक्क, व्याज, फायदे, देयके, तसेच त्यांच्या परतफेडीसाठी सिक्युरिटीजच्या संदर्भात तयार केलेल्या अंतर्निहित सुरक्षा व्याजासह आयकेएफ होम फायनान्स लिमिटेड यांनी सदर असाइनमेंटनुसार आणि थकबाकी वसूल करण्यासाठी, सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (कायदा) च्या कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना जारी केली आहे. ज्याचा मजकूर येथे प्रकाशित केली जात आहे ती निर्देशित कायद्याच्या कलम १३(२) यानुसार, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३(१) यानुसार, तुमच्यावर पर्यायी सेवेच्या रूपात आणि मार्गाने प्रकाशित केली जात आहे. कर्जदार, सह-कर्जदार, हमीदार, सिक्युरिटीज, थकबाकी देयके, कलम १३(२) अंतर्गत पाठवलेली मागणी सूचना आणि त्या अंतर्गत दावा केलेल्या रकमेची माहिती खालीलप्रमाणे दिली आहे:

**अर्जदाराचे नाव:** **श्री. रूपेश अशोक जुनागडे, अशोक रामलाल जुनागडे** यांचा मुलगा, फ्लॅट क्र. ७,विजया पार्क अपार्टमेंट, अंकुर हॉस्पिटलजवळ, वृंदावन, नाशिक, महाराष्ट्र- ४२२०१०. **सह-अर्जदार:** १) **श्री. संदीप अशोक जुनागडे, अशोक रामलाल जुनागडे** यांचा मुलगा, फ्लॅट क्र. ७, विजया पार्क अपार्टमेंट, अंकुर हॉस्पिटलजवळ, वृंदावन, नाशिक, महाराष्ट्र- ४२२०१०. २) **श्रीमती पूजा संदिप जुनागडे, संजय सुंदरलाल भावसार** यांची मुलगी, फ्लॅट क्र. ७, विजया पार्क अपार्टमेंट, अंकुर हॉस्पिटलजवळ, वृंदावन, नाशिक, महाराष्ट्र - ४२२०१०.
**कर्जाची रक्कम: एचएल: रु.१८,८०,०००/- (रुपये अठरा लाख ऐंशी हजार फक्त); कर्ज खाते क्र.: एचएल: एलएनएक्सएनके००४२२-२३०००५६२४**

**मालमत्तेचे वर्णन**
फ्लॅट क्र. २१ मोजमापे बाल्कनी + कार्पेट क्षेत्र मोजमापे प्लॉट क्र. १/ब वर बांधलेल्या **''अद्विका रेसिडेन्सी अपार्टमेंट''** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बांधलेल्या इमारतीच्या बाहेर सहाव्या मजल्यावर ४४.३२ चौ.मी. मोजमापे सर्व्हे क्र. ३१/१/अ पैकी क्षेत्रफळ ४०३.६६ चौ.मी., मौजे चुंचाळे येथे, नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीत आणि नोंदणी आणि उप-नोंदणीच्या आत जिल्हा नाशिक, जे मंजूर इमारत आराखड्यानुसार सामान्य सुविधा/ सुविधांसह सीमाबद्ध आहे: **पूर्व:** सामायिक जागा, **पश्चिम:** रस्ता आणि फ्लॅट क्र.: २४, **उत्तर:** सामायिक जागा, **दक्षिण:** फ्लॅट क्र. २२.

**नॉन परफॉर्मिंग ॲसेट (एनपीए) तारीख:** ११.०५.२०२५ | **मागणी सूचना तारीख:** २१.०५.२०२५
**थकित रक्कम:** रु.२०,७५,२९९.९२/- **(रुपये वीस लाख पंचाहत्तर हजार दोनशे नव्व्याण्णव आणि ब्याण्णव पैसे फक्त) दि. १६.०५.२०२५ रोजीनुसार देय आणि थकित.**
म्हणून कर्जदार आणि सह-कर्जदार/ जामीनदारांना या सूचनेपासून ६० दिवसांच्या आत वर नमूद केलेल्या मागणी केलेल्या रकमेचे पूर्ण व्याजासह पूर्ण पैसे देण्याचे आवाहन करण्यात येते, अन्यथा, निम्नस्वाक्षरीकार यांना वर नमूद केलेल्या सिक्युरिटीज लागू करण्यासाठी कायद्याअंतर्गत कारवाई करण्यास भाग पाडले जाईल. कृपया लक्षात ठेवा की, सदर निर्देशित कायद्याच्या कलम १३(१३) नुसार होईल. दरम्यान, तुम्हाला आमच्या संमतीशिवाय विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे वर नमूद केलेल्या सिक्युरिटीज हस्तांतरित करण्यास मनाई आहे.
**दिनांक:** ०२.०६.२०२५, **ठिकाण:** नाशिक — **सही/- अधिकृत अधिकारी, आयकेएफ होम फायनान्स लिमिटेड**

# शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजारांची मदत करा

## काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांची मागणी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई:** राज्यात झालेल्या मान्सूनपूर्व पावसामुळे शेतकऱ्यांच्या मालाचे प्रचंड नुकसान झाले आहे. आधीच संकटात असलेल्या शेतकऱ्याला अवकाळी पावसाने पुन्हा संकटात टाकले आहे. अशा संकटात सरकारने त्याच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे. त्यामुळे पंचनाम्याचे सोपस्कार बाजूला ठेवून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत करावी, अशी मागणी काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी केली.

खरीप हंगामाची तयारी सुरू असताना अवकाळी पावसाचे संकट ओढवल्याने शेतकरी मोडून पडला आहे. पण सरकारची मदत करण्याची मानसिकता दिसत नाही. एनडीआरएफच्या की एसडीआरएफच्या निकषाने मदत करायची यात शेतकऱ्याला काही देणेघेणे नाही. त्यांना भरीव मदत मिळाली पाहिजे. सरकारने ३ हेक्टरचा निकष बदलून २ हेक्टर केला हे आणखी अन्यायकारक आहे, अशी टीका थोरात यांनी केली.पीकविम्याचे निकष बदलल्याने त्यातूनही फारशी मदत मिळत नाही. सरकारने पंचनामे करण्याचे आदेश दिले, पण प्रत्यक्षात प्रशासन काम करताना दिसत नाही. पालकमंत्र्यांनी जिल्ह्याचा दौरा करून आढावा घेतला पाहिजे, असे ते म्हणाले.

## हळदीला प्रतिक्विंटल १३ हजार रुपये

**हिंगोली :** बाजार समितीमध्ये व्यापाऱ्यांच्या हळदीला पत्र्याचा निवारा आणि शेतकऱ्यांचा माल उघड्यावर असे चित्र दिसल्यानंतर हळदविक्रीचे ओटे रिकामे करण्यात आले. हळदीचा लिलाव सोमवारी पुन्हा सुरू करण्यात आला. आठ दिवसांनंतर हळदीच्या सरासरी दरात प्रतिक्विंटल एक हजार रुपयांची वाढ दिसून आली. सोमवारच्या लिलावात हळदीचा किमान दर ११,५०० ते कमाल दर १३ हजार रुपयांपर्यंत पोहोचला.

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात व्यापाऱ्यांनी खरेदी केलेल्या मालास निवारा देण्यात आला आणि शेतकऱ्यांची हळद उघड्यावर होती. परिणामी अवकाळी पावसात शेतकऱ्याचा माल भिजल्याने शेतकऱ्यांना त्याचा फटका बसला. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी शेतकऱ्यांच्या मालास निवारा उपलब्ध करून द्यावा आणि व्यापाऱ्यांची हळद उचलावी, असे सांगण्यात आली. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संत नामदेव मार्केट यार्डात हळद शेतमालाचा लिलाव करण्यासाठी पत्र्याच्या निवाऱ्यात पाच ओटे उपलब्ध आहेत. त्यावर अडीच ते तीन हजार क्विंटल मालाचा लिलाव होतो. व्यापाऱ्यांनी खरेदी केलेल्या मालाच्या थप्प्या पत्र्याच्या निवाऱ्यात आणि शेतकऱ्यांचा माल उघड्यावर असे चित्र होते.

महाराष्ट्र शासन
**इस्माईल युसूफ कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय**
जोगेश्वरी (पूर्व), मुंबई नं. ६०
(स्थापना: १९३०)
NAAC Accreditation "A" Grade
E-mail : principaliyc@yahoo.in Email : principaliyc@rediffmail.com
जा. क्र./इयुम/२०२५-२६/- दिनांक: २९.०५.२०२५
**मुलाखत**
**सहायक प्राध्यापक/ अधिव्याख्याता/ लिपिक/ ग्रंथालय व प्रयोगशाळा परिचर**
**(शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ करिता फक्त)**
इस्माईल युसूफ महाविद्यालय जोगेश्वरी मुंबई ४०००६० येथे मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, अरेबिक, पर्शियन, राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, गणित, संख्याशास्त्र, जैवतंत्रज्ञान, संगणकशास्त्र, वाणिज्य आणि व्यवस्थापन या विषयांकरिता घड्याळी तासिका तत्त्वावर सहायक प्राध्यापक/ अधिव्याख्यातांची आवश्यकता आहे.
तसेच लिपिक/ ग्रंथालय व प्रयोगशाळा परिचर या पदांसाठी कंत्राटी तत्त्वावर उमेदवारांची आवश्यकता आहे. इच्छुक आणि शैक्षणिक अर्हता पूर्ण करणाऱ्या उमेदवारांनी आपला अर्ज व मूळ शैक्षणिक कागदपत्रे, त्यांची छायांकित प्रत व पासपोर्ट आकाराचा फोटो घेऊन महाविद्यालयात उपस्थित राहावे. दिनांक १० ते १३ जून २०२५ या कालावधीत महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर दिलेल्या वेळापत्रकानुसार मुलाखत प्रक्रिया पार पाडण्यात येईल.
**महाविद्यालयाचे संकेतस्थळ: https://ismailyusufcollege.ac.in**
**स्थळ: महाविद्यालयाचे कार्यालय, सकाळी १०.३० ते दुपारी २.००**
**डॉ. स्वाती द. वाव्हळ**
**प्राचार्य**
**महाराष्ट्र शासनाचे इस्माईल युसूफ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, जोगेश्वरी (पू.), मुंबई ४०००६०**
डीजीआयपीआर-२०२५-२६/९४५

Phoenix ARC
**फिनिक्स एआरसी प्रायव्हेट लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालय : तिसरा मजला, वॉलेस टॉवर्स (पूर्वीची शिव बिल्डिंग म्हणून ज्ञात असलेली) १३९/१४०/बी/१, सहार रोड व वेस्टर्न एक्सप्रेस हायवेचे क्रॉसिंग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७.
टेलि : ०२२-६८४९ २४५०, फॅक्स : ०२२-६७४१ २३१३ सीआयएन : U67190MH2007PTC168303
ईमेल : info@phoenixarc.co.in, वेबसाइट : www.phoenixarc.co.in
**लिलाव सूचनेकरिता शुद्धिपत्र**
हे शुद्धिपत्र २८.०५.२०२५ रोजी वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या ऋणको १. राजेंद्र मुरलीधर बावा (एनएएन :- LXNAS00217-180063672) यांच्या संबंधित लिलाव सूचनेच्या संदर्भात आहे. तथापी, ई-लिलावाची तारीख व वेळ - तारीख : २२-०६-२०२५ रोजी स. ११:०० ते दु. ०२:०० (प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह) यानुसार चुकीची प्रसिद्ध झाली होती.

| | |
|---|---|
| **ई-लिलावाची अचूक तारीख व वेळ पुढीलप्रमाणे आहे :** | २५-०६-२०२५ रोजी स. ११:०० ते दु. ०२:०० (प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह) |

**उक्त सूचनेमध्ये नमूद केलेला अन्य सर्व तपशील न बदलता तोच राहील.**
स्थळ : नाशिक — स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी
दिनांक : ०३.०६.२०२५ — फिनिक्स एआरसी प्रायव्हेट लिमिटेड

MEDA महाऊर्जा
**महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)**
**(महाराष्ट्र शासनाची संस्था)**
**विभागीय कार्यालय, अमरावती.**
**विभागीय क्रिडा संकुल, मोर्शी रोड, अमरावती - 444603**
**दुरध्वनी क्र. 0721-2661610 e-mail:dgmamravati@mahaurja.com**
**ई-निविदा सूचना**
जिल्हा नियोजन समिती अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील जलशुद्धीकरण केंद्र व इतर विविध शासकीय ईमारतींवर एकूण 160 कि.वॅट क्षमतेचे पारेषण संलग्न सौर विद्युत प्रकल्प आस्थापित व कार्यान्वित करण्याकरीता सर्वेक्षण, पुरवठा, आस्थापना, चाचणी तसेच दुरःस्थ निगराणी प्रणाली व नक्त मापन प्रणालीसह यशस्वीरित्या कार्यान्वित करुन 5 वर्षाच्या हमी कालावधीत सुट्या भागांसह सर्व समावेशक देखभाल व दुरुस्ती करणे (CMC) या कामासाठी केंद्र शासनाच्या (न.व.न.ऊ. मंत्रालय) / शासकीय निकषाप्रमाणे प्रमाणित असलेल्या सौर विद्युत संच/साधनांचे उत्पादक/टर्नकी इ.पी.सी. कंपनीज् व त्यांचे नोंदणीकृत वितरक यांच्या कडून ई-निविदा मागविण्यात येत आहे.
**ई-निविदेच्या सविस्तर माहितीसाठी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी. प्राप्त होणाऱ्या निविदांपैकी एक किंवा सर्व निविदा स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार विभागीय महाव्यवस्थापक, महाऊर्जा, अमरावती यांचे कडे राखीव राहतील.**
**विभागीय महाव्यवस्थापक**

**मुंबई ऋण वसुली न्यायाधिकरण नं. १**
भारत सरकार
वित्त मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग, एमटीएनएल भवन,
दुसरा मजला, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई-४०० ००५.
**पुढील तारीख : १६/०७/२०२५**
**एक्झिबीट नं. १४**
**२०२१ची वसुली प्रक्रिया क्र. ७९**
पंजाब नॅशनल बँक ..........प्रमाणपत्र धारक
विरुद्ध
म्युज डड्स प्रायव्हेट लिमिटेड व अन्य ..........प्रमाणपत्र ऋणको
**मागणी सूचना**
प्रति,
**१. म्युज डड्स प्रायव्हेट लिमिटेड**
असलेले तिचे नोंदणीकृत कार्यालय : सी-२३, शुभा सीएचएस, सर पोचकनवाला रोड, वरळी, मुंबई-४०००३० आणि सध्याचे कार्यालय : ५२४, ५वा मजला, सी-१, सोहम प्लाझा-चितस्लार, मनपाडा, ठाणे (प), ठाणे-४००६१०.
**२. श्रीमती काव्या अमित दिगविजय सिंह**
राहणार - फ्लॅट नं. ४०४, पुंजामहल पानस्टँड, गॅलक्सीजवळ, बांद्रा (प), मुंबई-४०००११.
**३. श्री. विजय दशरथ भगत राहणार -**
सी-६, दुसरा मजला, दुर्गेश रेसिडंसी, गंगापूर रोड, आनंदवली, नाशिक-४२२ ००९.
माननीय पीठासीन अधिकारीद्वारा निर्गमित केलेल्या २०१६ च्या टी.ओ.ए.मधील वसूली प्रमाणपत्राच्या अनुसार तुमच्याकडील रु. ४,३५,१९,०००.००(रुपये चार कोटी पस्तीस लाख एकोणीस हजार फक्त) देणी आहे. तुम्हास याद्वारा या सूचनेच्या स्वीकृतीच्या तीस दिवसांच्या आत वरील रक्कम जमा करण्यास फर्माविण्यात आले आहे, त्यास असमर्थ ठरल्यास कायद्याच्या अनुसार वसूली करण्यात येईल.
**उक्त रकमेअतिरिक्त तुम्ही खालील बाबतीत प्रदान करण्यास सुद्धा पात्र आहात :-**
(ए) सदर व्याज निष्पादन प्रक्रियेच्या या सूचनेनंतर त्वरित सुरू होणाऱ्या कालावधीकरिता देय आहे.
(बी) ही सूचना व अन्य प्रक्रियेच्या सेवेसंबंधित निघालेली सर्व किंमत, आकार व खर्च देय रकमेच्या वसूलीकरिता घेण्यात येणार आहे.
**आज दिनांक ०५ मे, २०२५ रोजी या न्यायाधिकरणाच्या मोहोरनिशी दिलेले**
शिक्का
**स्वाक्षरी/-**
**महेश कुमार**
**वसूली अधिकारी**
**डीआरटी-१, मुंबई**

shubham
**शुभम हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कं. लि.**
**कॉर्पोरेट कार्यालय : ४२५, उद्योग विहार फेज ४, गुडगाव- १२२०१५ (हरियाणा)**
**फोन : ०१२४-४२१२५३०/३१/३२, ई-मेल : customercare@shubham.co वेबसाइट : www.shubham.co**
**ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी)**
ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार हे शुभम हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कंपनी लिमिटेड (यापुढे शुभम असे म्हटले जाईल) यांचा अधिकृत अधिकारी असल्याने त्यांनी सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सहवाचता निर्देशित कलम १३(१२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून कर्जदारांना सदर नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत रक्कम परत करण्याचे आवाहन करणारी मागणी सूचना जारी केली.
कर्जदारांनी रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकार यांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८ सहवाचता वरील कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.
विशेषत: कर्जदारांना आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार हा खाली दिलेल्या रकमेसाठी आणि त्यावरील व्याजासाठी शुभम हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कंपनी लिमिटेड यांच्या शुल्काच्या विषयाधीन असेल. सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात, निर्देशित कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधले जात आहे. तपशील खालीलप्रमाणे आहेत :

| अ. क्र. | कर्ज क्र./कर्जदाराचे नाव | मागणी सूचना तारीख आणि रक्कम | सुरक्षित मालमत्ता | संलग्नीकरण तारीख |
|---|---|---|---|---|
| 1 | Loan No. JAL_1509_044574 कर्ज क्र.जेएएल_१५०९_०४४५७४ आधार चिंधू पाटील, आशा आधार पवार | 22-03-2025 & ₹ 3,53,242/- | ग्रामपंचायत घर क्र. २१० पोस्ट धनवड ता. आणि जिल्हा जळगाव महाराष्ट्र - ४२५००३, **क्षेत्रफळ:** ८७६ चौ.फूट, **चतु:सीमा:** पूर्व: ग्रामपंचायत घर क्र. २०८, पश्चिम: रस्ता, उत्तर: ग्रामपंचायत घर क्र. २११, दक्षिण: ग्रामपंचायत घर क्र. २०७ आणि २०९. | 30-05-2025 |
| 2 | Loan No. 0DHU2103000005035277 कर्ज क्र. ओडीएचयू२१०३०००००५०३५२७७ प्रवीण एकनाथ अहिरे, सीमा प्रवीण अहिरे | 22-03-2025 & ₹ 1,57,573/- | जी. पी. एच. क्र. २८० (३२८/१) पोस्ट चांदे येथे ता. आणि जिल्हा धुळे महाराष्ट्र - ४२४००१, **क्षेत्रफळ:** ३७५ चौ.फूट, **चतु:सीमा:** पूर्व: सह्यामराव गोभा जगताप यांचे घर, पश्चिम: रस्ता, उत्तर: संजय हिरामण धिवरे यांचे घर, दक्षिण: बाबूलाल खंडू अहिरे यांचे घर. | 30-05-2025 |
| 3 | Loan No. 0JAL2205000005047712 कर्ज क्र. ओजेएएल२२०५०००००५०४७७१२ शेख मोसीन शेख मन्सूर, शेख मन्सूर शेख दगडू | 22-03-2025 & ₹ 10,03,586/- | सीटीएस क्र. १६९० ग्रामपंचायत मिळकत क्र. १४०५ पोस्ट नवेगाव मेहुणबारे नुरानी मशिदीजवळ, ता. चाळीसगाव व जिल्हा जळगाव महाराष्ट्र- ४२४१०६, **क्षेत्रफळ:** १०१७ चौ.फूट, **चतु:सीमा** पूर्व: आबा देशमुख यांची मिळकत, पश्चिम: रस्ता, उत्तर: शेख अन्सारी/ शेख दगडू, दक्षिण: शेख सरदार/शेख नाथू यांची मिळकत. | 30-05-2025 |
| 4 | Loan No. DHU_1507_042213 कर्ज क्र. डीएचयू_१५०७_०४२२१३ दीपक देवराम जाधव, युवराज देवराम जाधव, अंजना दिपक जाधव | 22-03-2025 & ₹ 3,28,738/- | प्लॉट क्र. १३ अ. क्र. ३३६/२-२ ते ४ पवन नगर मार्केट यार्डजवळ ता. आणि जिल्हा धुळे महाराष्ट्र-४२४००१, **क्षेत्रफळ :** २१४४.१४ चौ.फूट, **चतु:सीमा :** पूर्व: रस्ता, पश्चिम- सर्वे क्र. ३४०/अ, उत्तर - प्लॉट क्र. १३ चा भाग, दक्षिण- सर्वे क्र. ३३४. | 30-05-2025 |
| 5 | Loan No. 0JNA2303000005060957 कर्ज क्र. ओजेएनए२३०३०००००५०६०९५७ मनेश भगवान धैत, चंद्रकला भगवान धैत | 22-03-2025 & ₹ 5,08,630/- | ग्रामपंचायत मिळकत क्र.१९२ येथे स्थित. रुई, ता. अंबड, जि. जालना, महाराष्ट्र - ४३१२०५, **क्षेत्रफळ:** १५०० चौ.फूट, **चतु:सीमा:** पूर्व: लक्ष्मण गुरू यांची मालमत्ता, पश्चिम: रस्ता, उत्तर: राधेश्याम सिकवाल यांचे घर, दक्षिण: अच्युत राम यांचे घर. | 30-05-2025 |
| 6 | Loan No. 0NND2203000005045321 कर्ज क्र. ओएनएनडी२२०३००००० ५०४५३२१, कायदेशीर वारस (दिवंगत सुप्रिया गणपतराव सुगावकर), जयदीप गणपतराव सुगावकर | 22-03-2025 & ₹ 1,89,430/- | फ्लॅट क्र. १, तळमजल्यावर, प्लॉट क्र. २८ वर, अ. क्र. २२ वर, शिवतारा अपार्टमेंट येथे, जी.पी. वाडी (बी.के.) येथे, ता. आणि जिल्हा नांदेड, महाराष्ट्र - ४३१६०५, **क्षेत्रफळ:** १००३ चौ. फूट, **चतु:सीमा:** पूर्व: पार्किंग/सर्वेक्षण क्र. २१, पश्चिम: प्लॉट क्र. २९, उत्तर: रस्ता, दक्षिण: प्लॉट क्र. २७. | 30-05-2025 |
| 7 | Loan No. 0NAS2208000005050952 कर्ज क्र. ओएनएएस२२०८०००००५०५०९५२ इफ्तिकार इसरारा अन्सारी, शबिना इफ्तेकार अन्सारी | 22-03-2025 & ₹ 13,37,267/- | अ. क्र. ६७/३/१/प्लॉट/२ जुना अ. क्र. ६७/३/१ प्लॉट क्र. २ फ्लॅट क्र. बी-१५, बी विंग, तिसरा मजला, मदार अपार्टमेंट आयेशा मजीद, तैयबा नगर, मौजे वडाळा, ता. आणि जिल्हा नाशिक महाराष्ट्र- ४२२००७ येथे, **क्षेत्रफळ:** ५५०.१४ चौ. फूट, **चतु:सीमा:** पूर्व - बाजूचा मार्जिन आणि पॅसेज, पश्चिम- फ्लॅट क्र. १६ आणि पॅसेज, उत्तर: साईड मार्जिन आणि पॅसेज, दक्षिण: फ्लॅट क्र. १४ श्री. बिस्मिल्ला खान यांच्या मालकीचे. | 30-05-2025 |
| 8 | Loan No. 0NND2305000005062712 कर्ज क्र. ओएनएनडी२३०५०००००५०६२७१२ गणेश समर्थ वडपत्रे, ज्योती गणेश वडपत्रे | 22-03-2025 & ₹ 6,31,204/- | जीपीएच क्र.१७६७, शिवगंगा नगर पिंपळगाव रोड मौजे नायगाव ता नायगाव जि नांदेड, महाराष्ट्र-४३१७०९, **क्षेत्रफळ:** ८२५ चौ.फूट, **चतु:सीमा:** पूर्व: खुला भूखंड/सिराज समर्थ वडपत्रे, पश्चिम:- रस्ता, उत्तर:-इतर मालमत्ता, दक्षिण:-रस्ता. | 30-05-2025 |

ठिकाण : गुडगाव — अधिकृत अधिकारी
दिनांक : ०२.०६.२०२५ — शुभम हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कंपनी लिमिटेड

# ‘संयमी’ गुकेशची कार्लसनवर मात

**वृत्तसंस्था, स्टावन्गर**

**जगज्जेतेपद पटकावल्यानंतरही** दोम्माराजू गुकेशची खेळण्याची शैली आणि दर्जावर प्रश्न उपस्थित करणाऱ्या मॅग्नस कार्लसनवर अखेर त्याच गुकेशकडून पराभव पत्करण्याची नामुष्की ओढवली. पाच वेळचा जगज्जेता कार्लसन आता पारंपरिक प्रकारात फारसा खेळत नाही आणि जेव्हा खेळतो तेव्हा सहसा पराभूत होत नाही. मात्र, नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेच्या सहाव्या फेरीत गुकेशने दडपणाखाली संयमाने खेळताना कार्लसनवर मात करण्याची किमया साधली.

यंदाच्या स्पर्धेत सलामीलाच कार्लसन आणि गुकेश आमनेसामने आले होते. त्यावेळी कार्लसन विजयी ठरला होता. सामन्यानंतर त्याने समाजमाध्यमांवर ‘यू कम अ‍ॅट द किंग, यू बेस्ट नॉट मिस’ असा संदेश लिहिला. त्या लढतीत गुकेशने कार्लसनच्या राजाला लक्ष्य केले होते, पण त्याला यश मिळाले नाही. रविवारी झालेल्या सहाव्या फेरीच्या लढतीत मात्र गुकेशने ती चूक पुन्हा केली नाही. त्याने अप्रतिम बचावाचे दर्शन घडवताना पारंपरिक प्रकारात कार्लसनवरील पहिला विजय मिळवला. ही लढत चार तास आणि ६२ चालींपर्यंत चालली.

पाच वेळचा जगज्जेता कार्लसन संपूर्ण लढतीत भक्कम स्थितीत होता. पटावर वर्चस्व राखण्यासह तो वेळेचेही गणित अचूक साधत होता. या दडपणाखाली अन्य एखाद्या बुद्धिबळपटूने सहज शरणागती पत्करली असती, मात्र गुकेशने उत्कृष्ट बचाव करताना कार्लसनला निर्णायक चाली रचण्यापासून रोखले. त्यामुळे हळूहळू गुकेशऐवजी कार्लसनवर दडपण वाढत गेले. आपल्या योजनांना यश मिळत नसल्याचे पाहून कार्लसन काहीसा गोंधळला. त्याच्याकडील वेळही कमी होत गेला. अखेरीस गुकेश आणि कार्लसन या दोघांकडेही झटपट चाली रचण्यावाचून पर्याय नव्हता. त्याच वेळी कार्लसनकडून मोठी चूक झाली. त्याने आपले अश्वाचे प्यादे गमावले. त्यानंतर त्याला पराभव पत्करावा लागणार हे निश्चित झाले.

## पारंपरिक प्रकारात पहिला विजय



पारंपरिक प्रकारात कार्लसनवरील पहिला विजय अशा स्वरूपात मिळवेन असे मला वाटले नव्हते. मात्र, मी समाधानी आहे. कार्लसन चांगल्या स्थितीत होता. १०० पैकी ९९ वेळा मी पराभूत झालो असतो. मात्र, आज मी नशीबवान ठरलो असे म्हणायला हरकत नाही. मी अखेरपर्यंत झुंज देण्याचे ठरवले. त्यामुळेच मी सकारात्मक निकाल मिळवू शकलो. - गुकेश

### संयुक्त आघाडी

खुल्या आणि महिला विभागात आता प्रत्येकी दोन खेळाडू संयुक्त आघाडीवर आहेत. खुल्या विभागात कार्लसन आणि फॅबियानो कारुआना यांचे समान ९.५ गुण आहेत. गुकेश ८.५ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. महिलांमध्ये कोनेरू हम्पी आणि अ‍ॅना मुझिचुक समान ९.५ गुणांसह अग्रस्थानी आहेत. त्यांच्या खालोखाल वेन्जून (८.५) आणि वैशाली (८) यांचा क्रमांक लागतो.

# बंगळूरु की पंजाब...नवविजेता कोण?

## ‘आयपीएल’ची आज अंतिम लढत

**संदीप कदम, लोकसत्ता**

**अहमदाबाद :** रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु आणि पंजाब किंग्ज हे संघ आज, मंगळवारी इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेटच्या अंतिम सामन्यात एकमेकांविरुद्ध खेळतील, तेव्हा त्यांचे १८ वर्षांची जेतेपदाची प्रतीक्षा संपविण्याचे लक्ष्य असेल. ‘आयपीएल’ला २०२२ नंतर प्रथमच नवविजेता मिळणार आहे.

या सामन्यात सर्वांचे लक्ष कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतलेल्या विराट कोहलीकडे असणार आहे. ‘आयपीएल’च्या पहिल्या हंगामापासून बंगळूरु संघाचा भाग असलेल्या कोहलीला अद्याप जेतेपदाची चव चाखता आलेली नाही. बंगळूरु आणि कोहलीचा हा चौथा अंतिम सामना असेल. नरेंद्र मोदी स्टेडियमवर कोहलीला चाहत्यांचा चांगला पाठिंबा मिळणे अपेक्षित आहे. बंगळूरुने या ‘क्वालिफायर-१’मध्ये पंजाबवर आठ गडी राखून विजय मिळवत अंतिम फेरीत धडक मारली.



छाया : भूपेंद्र राणा

दुसरीकडे, पंजाब संघानेही श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली कामगिरी उंचावत सर्वांचे लक्ष वेधले आहे. पंजाबने ११ वर्षांनंतर अंतिम फेरी गाठली आहे. कर्णधार अय्यर आणि प्रशिक्षक रिकी पॉन्टिंग यांच्या मार्गदर्शनाखाली संघाने चांगली प्रगती केली. ‘क्वालिफायर-२’मध्ये मुंबईवर मिळवलेल्या विजयानंतर पंजाबच्या खेळाडूंचा आत्मविश्वास दुणावला असेल. या लढतीवरही पावसाचे सावट आहे.

- वेळ : सायं. ७.३० वा.
- थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स १, १ हिंदी, जिओहॉटस्टार अ‍ॅप.

# मॅक्सेवल, क्लासनची निवृत्ती

**मेलबर्न/केपटाऊन :** आक्रमक शैलीतील फलंदाजीने स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या ऑस्ट्रेलियाच्या ग्लेन मॅक्सवेल आणि दक्षिण आफ्रिकेच्या हेन्रिक क्लासन या दोन प्रतिभावंतांनी सोमवारी अनुक्रमे एकदिवसीय आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून अचानक निवृत्तीची घोषणा केली.

उत्तुंग षटकार आणि कठीण परिस्थितीतून संघाला एकाहाती बाहेर काढणारे संकटमोचक फलंदाज अशी या दोघांचीही ओळख होती. गुणवत्ता आणि कौशल्य असूनही या दोघांना कसोटी क्रिकेट खेळण्याची फारशी संधी मिळाली नाही. व्यग्र कार्यक्रम, तंदुरुस्तीचे आव्हान आणि कुटुंबाकडे होणारे दुर्लक्ष अशी कारणे देत दोन्ही खेळाडूंनी निवृत्ती जाहीर केली. मॅक्सेवल ट्वेन्टी-२० सामन्यांसाठी उपलब्ध असेल.

# टेस्ला भारतात निर्मितीस अनुत्सुक

## ‘ईव्ही’ धोरणाला अंतिम रूप; परदेशी कंपन्यांच्या आयात करात मोठी सवलत

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

**परदेशी मोटार** उत्पादकांना आयात शुल्कात मोठी सवलत देणाऱ्या विद्युत वाहने (ईव्ही) धोरणाला अंतिम रूप देऊन ते सोमवारी केंद्र सरकारने अधिसूचित केले. तथापि या क्षेत्रातील अमेरिकी कंपनी टेस्लाने भारतात त्यांच्या मोटारींचे उत्पादन करण्याबाबत अनुत्सुकता दर्शविली असून, त्याऐवजी तयार मोटारी आयात करण्यावर तिचा भर असेल. असे केंद्रीय मंत्र्यांनी स्पष्ट केले.

सरकारने अधिसूचित केलेल्या ईव्ही धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, देशांतर्गत ईव्ही उत्पादनांत गुंतवणूक करण्याचे वचन देणाऱ्या परदेशी वाहन उत्पादकांना आयात करात लक्षणीय सवलत देऊ करण्यात आली आहे. कंपन्यांना स्थानिक उत्पादन सुविधा उभारण्यासाठी ४,१५० कोटी रुपयांची (५०० दशलक्ष डॉलरची) गुंतवणूक करावी लागेल, तर त्यांना सध्याच्या ७०-१०० टक्के आयात शुल्काऐवजी दरवर्षी केवळ १५ टक्के आयात शुल्कावर कमाल ८,००० इलेक्ट्रिक चारचाकी वाहने आयात करण्याची परवानगी दिली जाईल.



गेल्या वर्षभरापासून काम सुरू असलेले हे धोरण मूळात टेस्लाला देशात उत्पादन सुरू करण्यासाठी आकर्षित करण्यासाठीच होते. परंतु या कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी एलॉन मस्क यांनी भारतातील त्यांच्या गुंतवणूक योजनेला स्थगितीच्या भूमिकेत त्यानंतरही बदल केलेला नाही. आयात केलेल्या वाहनांवरील भारतात शुल्क खूपच जास्त आहे, अशी मस्क यांनी वारंवार जाहीर विधान केले आहे.

नवरचित ईव्ही धोरणानंतरही टेस्लाची योजना भारतात मोटारी आयात करण्याची आहे, त्यांना भारतात उत्पादन करण्यात रस नाही, असे अवजड उद्योगमंत्री एच.डी. कुमारस्वामी यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले. मात्र, मर्सिडीज-बेंझ, फोक्सवॅगन, ह्युंदाई आणि किआ यांनी ईव्ही उत्पादनांत रस दाखवला आहे, असे ते म्हणाले.

जगातील तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी मोटारींची बाजारपेठ असलेल्या भारतात, कंपन्यांना उत्पादन सुविधा स्थापन करून, मंजुरी मिळाल्यापासून तीन वर्षांच्या आत तेथून ईव्ही उत्पादन सुरू करावे लागेल आणि त्यासाठी काही स्थानिक सामग्रीच्या वापराच्या आवश्यकता पूर्ण कराव्या लागतील.

नवीन धोरणांत, यंत्रसामग्री, संशोधन आणि चार्जिंग या सारख्या पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणुकीची मुभा परदेशी कंपन्यांना दिली गेली आहे. जलद चार्जर्सच्या कमतरतेमुळे ईव्ही बाजारपेठेत अपेक्षित वाढ दिसून आलेली नाही. २०२४ मध्ये ४३ लाख ई-मोटारी भारतात विकल्या गेल्या असल्या तरी एकूण मोटारींच्या विक्रीत त्यांचा वाटा फक्त २.५ टक्के असून, सरकार २०३० पर्यंत त्याचे प्रमाण ३० टक्क्यांपर्यंत वाढवू इच्छित आहे.

### देशी कंपन्यांची नाराजी

टाटा मोटर्स आणि महिंद्र अँड महिंद्र या सारख्या देशांतर्गत कंपन्यांनी स्थानिक ईव्ही उत्पादनात लाखो डॉलरची गुंतवणूक केली आहे आणि त्यांनी टेस्लासारख्या परदेशी उत्पादकांना झुकते माप देणाऱ्या आयात शुल्क कपातीविरुद्ध नाराजीही व्यक्त केली आहे.

# व्याजदरात थेट अर्धा टक्का कपात शक्य

## रिझर्व्ह बँकेची बैठक उद्यापासून

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई:** रिझर्व्ह बँकेच्या आगामी पतधोरणात सलग तिसरी व्याजदर कपात अपेक्षिली जात असली तरी, ती यंदा थेट अर्धा टक्का कपात केली जाऊ शकते, असा स्टेट बँकेच्या संशोधन अहवालाने सोमवारी अंदाज वर्तविला. देशातील पतपुरवठा चक्राला बळ देण्यासाठी आणि अनिश्चततेच्या वातावरणात समतोल साधण्यासाठी हे पाऊल उचलले जाण्याचे अहवालाचे अनुमान आहे.

रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची द्वैमासिक बैठक बुधवार, ४ जूनपासून सुरू होत आहे. ही बैठक ६ जूनला संपणार असून, त्यानंतर या सहा सदस्यीय समितीच्या अध्यक्षपदी असलेले रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा हे बैठकीतील निर्णय जाहीर करतील. याआधी फेब्रुवारी आणि एप्रिलमधील सलग दोन पतधोरण आढाव्याच्या बैठकांतून प्रत्येकी पाव टक्का अशी एकूण अर्धा टक्क्यांची कपात करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर ‘एसबीआय रिसर्च’च्या ताज्या अहवालात वाढीव कपातीचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

आगामी पतधोरणात व्याजदरात थेट अर्धा टक्क्याची कपात ही सध्याच्या अनिश्चिततेच्या वातावरणात समतोल साधण्यासाठी समर्पक पाऊल ठरेल. याचबरोबर त्यातून कर्जपुरवठा चक्राला बळ देण्याचा प्रयत्न केला जाईल. यामुळे आतापर्यंत रिझर्व्ह बँकेकडून सुरू झालेल्या व्याजदर कपातीचे चक्र पूर्ण एक टक्क्यांवर जाईल.

# ‘लेनोवो’चा कृत्रिम प्रज्ञेवर भर

**पुणे :** मोबाईल, लॅपटॉपसह सर्वच उपकरणांमध्ये कृत्रिम प्रज्ञेचा (एआय) वापर करण्यावर लेनोवोने भर दिला असून, ज्यातून ही उपकरणे वापरकर्त्यांसाठी अधिक कार्यक्षम, भरवशाची आणि सुरक्षित ठरत आहेत, असे लेनोवो इंडियाचे कार्यकारी संचालक रोहित मीधा यांनी प्रतिपादन केले. उत्पादने अधिक स्मार्ट बनविण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून लेनोवोने लॅपटॉपमध्ये एआयचा वापर, कार्यक्षमता वाढीसह सुरक्षेची अनेक वैशिष्ट्ये सामावून घेतली आहेत.





पल्सर 2 कोटी पल्सरमॅनिक्सच्या ट्राइबमध्ये सामील व्हा डाउन-पेमेंट सुरू ₹5 370/-*

| | 125 NEON | NS125 BASE | N160 USD | NS200 BASE | N250 |
|---|---|---|---|---|---|
| बचत | - | - | ₹5 914/-* | ₹8 448/-* | ₹9 114/-* |
| खास किंमत | ₹86 278/-* | ₹99 994/-* | ₹1 36 992/-* | ₹1 40 307/-* | ₹1 43 309/-* |

*एक्स-शोरुम किंमत *NS160 मध्येही उपलब्ध

pulsar DEFINITELY DARING

72198 21111 | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE | BAJAJ CREDIT

*नियम आणि अटी लागू. *दाखवलेली एक्स–शोरुम किंमत पल्सर वेरिएंट्ससाठी आहे. किंमतीतील रिविजन विरुध्द पल्सर वेरिएंट्सची एक्स–शोरुम किंमत 31 मार्च 2025 नुसार. *पल्सर 125 निऑनसाठी डाऊन–पेमेंट म्हणजे मार्जिन मनी. मार्जिन मनीमध्ये DCC शुल्क, प्रक्रिया शुल्क, इतर शुल्क वगळले आहेत आणि ते क्रेडिट पॅरामीटर्सच्या पूर्ततेवर आधारित आहे. बजाज ऑटोने पूर्वसूचना न देता कोणतीही किंवा सर्व ऑफर्स काढून घेण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. साहसी दृश्ये तज्ञांकडून, व्यावसायिक निरिक्षणा अंतर्गत, नियंत्रित आणि राखीव वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यापासून दूर जागेवर केली आहेत. ह्या साहसी दृश्यांचं अनुकरण करू नका आणि नेहमी वाहतुकीचे व सुरक्षिततेचे नियम पाळा. एएमसी विशिष्ट मॉडेल्स आणि विशिष्ट राज्यात उपलब्ध. अधिक माहितीसाठी बजाज डीलरकडे चौकशी करा. रस्त्यावरील मदत तृतीय पक्षांकडून केली जाते आणि ती त्यांच्या नियम व अटींच्या अधीन आहे.

Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: • Bhiwandi PRATHAM BAJAJ 9769887555 • Bhandup PRATHAM BAJAJ 9769887555 • Goregaon SURYODAY BAJAJ 9920612523 • Kharghar RAJ BAJAJ 8976009454 • Mahim AUTODEN BAJAJ 9867771021 • Chembur AUTODEN BAJAJ 7977989854 • Ulhasnagar Krishna Bajaj 9975554452 • Dombivali Krishna Bajaj 8483855538 • MiraRoad(E) SURYODAY BAJAJ 8378030999 • Panvel CG BAJAJ 8657554004 • Pen CG Bajaj 8655705042 • Saki Naka PIONEER BAJAJ 7208996145 • Kandivali PIONEER BAJAJ 7208996141 • Thane PRATHAM BAJAJ 9769887555 • Shahpur PRATHAM BAJAJ 9769887555 • Vasai SURYODAY BAJAJ 8484014412 / 0250-6637777 • Vashi RAJ BAJAJ 9867501873 • • BOISAR MUMBAI BAJAJ 9004994969 • DAHANU MUMBAI BAJAJ 9136299390 •• Mahad RAJ MOTORS 9637349195 Authorised Service Centre: Ambernath 9372170187, Alibag 9702459151, Badlapur 9881880077, Karjat 9822715421, Neral 8446007284, Roha 9226893551, , Thane 9821179668, Virar 9673158616


हे पत्र वैदेही ठकार यांनी मालक द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, प्लॉट नं. ईएल-२०८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१० येथे छापून मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१ येथे प्रसिद्ध केले. **लोकसत्ता कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७.
**महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५ /२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४ . दूरध्वनी : ०२०-६७२४१०००. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. नं. ३८, ऑडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७.
■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार ■ संपादक : गिरीश कुबेर ■ निवासी संपादक : सिद्धार्थ खांडेकर* (* पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) R. N. I. Reg. No. 1591/57 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई. ■ कोलकाता, दिल्लीसाठी प्रत्येकी १० रुपये.